| अनुक्रमणिका | | |
|---|---|---|
| **भाग १** | | ४ |
| अ | परिचय | ४ |
| **भाग २** | | ५ |
| ब | निर्यातीसाठी सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्व | ५ |
| ब.१ | जीआर घोषित करण्यातून सूट | ५ |
| ब.२ | प्राप्ती आणि प्रदानाच्या पध्दती | ५ |
| ब.३ | निर्यात उत्पन्नाची वसुली व प्रत्यावर्तन ( रियलायझेशन व रिपॅट्रिएशन) | ७ |
| ब.४ | विदेशी चलन खाते | ७ |
| ब.५ | डायमंड डॉलर खाते (डी डी ए) | ८ |
| ब.६ | विनिमय मिळविणाऱ्याचे विदेशी चलन(इइएफसी) खाते एक्सचेंज अर्नर्स फॉरिन करंसी (इइएफसी) खाते | ८ |
| ब.७ | विदेशात कार्यालये स्थापन करणे किंवा विदेशातील कार्यालयांसाठी स्थावर मालमत्ता संपादन करणे | ९ |
| ब.८ | निर्यातीसमक्ष आगाऊ प्रदान | १० |
| ब.९ | विदेशातील ट्रेड फेअर/प्रदर्शने ह्यासाठी मंजुरी | १० |
| ब.१० | पुनर्आयात करावायच्या मालाची निर्यात करण्यासाठी जीआर मंजुरी | ११ |
| ब.११ | अंशतः रक्कम काढणे/न काढलेली शिल्लक | ११ |
| ब.१२ | मालप्रेष निर्यात | ११ |
| ब.१३ | विदेशात वेअरहाऊसेस उघबणे/भाब्याने घेणे | १२ |
| ब.१४ | निर्यातदाराद्वारे कागदपत्रांची थेट रवानगी | १२ |
| ब.१५ | सॉफ्टवेअरच्या निर्यातीचे बीजक तयार करणे | १३ |
| ब.१६ | थांबवलेले आऊट नौप्रेष आणि अपूर्ण नौप्रेष | १४ |
| ब.१७ | प्रति-व्यापार करार | १४ |
| ब.१८ | भाबेपट्ट्याने, भाब्याने वगैरे मालाची निर्यात | १५ |
| ब.१९ | विस्तारित कर्ज अटींवर निर्यात | १५ |
| ब.२० | स्पेशल इकॉनॉमिक झोनस (बसईझेबस) व्दारा मालाची निर्यात | १५ |
| ब.२१ | प्रकल्प निर्यात आणि सेवा निर्यात | १५ |
| ब.२२ | चलनाची निर्यात | १६ |
| ब.२३ | जप्त करणे | १६ |
| ब.२४ | रस्ता, रेल किंवा नदीमार्गे शेजारच्या देशाना निर्यात | १६ |
| ब.२५ | म्यानमारशी सीमाव्यापार | १७ |
| ब.२६ | स्टेट क्रेबीटची परतफेब | १७ |
| ब.२७ | रोमानियाबरोबर प्रति-व्यापार व्यवस्था | १७ |
| **भाग ३** | | १८ |
| क | एडी वर्ग १ बँका बँकांसाठी प्रचालनीय मार्गदर्शक तत्त्वे | १८ |
| क-१ | १विशिष्ट ओळख क्रमांक देणे | १८ |
| क-२ | जीआर/एसडीएफ/पीपी/सॉफ्टेक्स कार्यपद्धती | १८ |
| क-३ | जीआर प्रपत्रे | १८ |
| क-४ | एसडीएफ | १९ |
| क-५ | पीपी फॉर्म्स | १९ |
| क-६ | यादृच्छिक पडताळणी | २० |
| क-७ | इइएफसी क्रेडीटसाठी प्रमाणीकरण | २० |
| क-८ | एअर कार्गो एकत्रित करणे / समुद्र कार्गो | २१ |
| क-९ | निर्यातदारांकडून नौप्रेष कागदपत्र सादर करण्यातील दिरंगाई | २१ |
| क-१० | एडी बँकांद्वारे प्रपत्रांच्या छाननीसाठी तपासणी-सूची | २१ |

| | | |
|---|---|---|
| क-११ | निर्यातदारांना कागदपत्रे परत करणे | २२ |
| क-१२ | बिल ऑफ लेडिंगची वाटाघाटीयोग्य प्रत मास्टर ऑफ व्हेसलला/व्यापारी प्रतिनिधीला सुपूर्द करणे | २२ |
| क -१३ | निर्यात बिल नोंदवही | २२ |
| क -१४ | तारीख उलटून गेलेल्या बिलांचा पाठपुरावा | २३ |
| क -१५ | युजन्स बिलांच्या पूर्वप्रदानामुळे इनव्हाईस मूल्यातील घट | २३ |
| क-१६ | इतर प्रकरणात बीजक मूल्य कमी करणे | २३ |
| क-१७ | निर्यात दावे | २४ |
| क-१८ | खरेदीदारात/मालप्रेषितीत बदल | २४ |
| क-१९ | कालावधीचा विस्तारआणि निर्यातदारांकडून स्वयंनिर्लेखन | २४ |
| क-२० | कालावधीचा विस्तारआणि निर्यातदारांकडून स्वयंनिर्लेखन | २५ |
| क-२१ | एडी वर्ग-१ बँकांव्दारे राईटऑफ केले जाणे | २६ |
| क-२२ | इसीजीसी आणि इन्सुअरन्स रेग्युलेटरी व डेवलपमेंट ऑथोरिटी व्दारा (आयआरडीए) विनियमित खाजगी विमा कंपन्याव्दारे दाव्यांचे प्रदान राईटऑफ केले जाणे | २८ |
| क-२३ | इतर प्रकरणांमधील राईट ऑफ केले जाणे | २८ |
| क-२४ | राईट ऑफ – शिथिलता/सवलत | २८ |
| क-२५ | प्रवासात हरवलेले नौप्रेष | २९ |
| क-२६ | आयातीच्या प्रदानासमक्ष निर्यात प्राप्यांचे “नेटिंग ऑफ”-विशेष आर्थिक क्षेत्रातील युनीट्स | २९ |
| क-२७ | निर्यातीवर एजन्सी कमिशन | २९ |
| क-२८ | निर्यातदारांना कागदपत्रे परत देणे | ३० |
| क-२९ | निर्यातदारांची सावधगिरी सूची | ३० |
| भाग -४ | | ३२ |
| परिशिष्ट -१ | विदेशी विनिमय व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम, २००० | ३२ |
| जोडपत्र -२ | अधिसुचना क्र. फेमा २३/ २००० आरबी दि. ३ मे २००० | ३९ |
| जोडपत्र -३ | अधिसूचना क्र. फेमा १४ / २००० आरबी. दि.,३ मे २००० ९७ | ८१ |
| जोडपत्र -४ | | ८४ |
| जोडपत्र -५ | | ८५ |
| जोडपत्र -६ | | ८६ |
| जोडपत्र -७ | | ८८ |
| परिशिष्ट | | ९१ |

## भाग १

### अ. परिचय

१.विदेश व्यापार महासंचालनालय (डीजीएफटी) आणि त्यांची व्यापार आणि उद्योग मंत्रालय, व्यापार विभाग, भारत सरकार यांच्य अधीन काम करणारी विभागीय कार्यालये यांच्याद्वारे निर्यात व्यापाराचे नियमन केले जाते. भारतातून निर्यात करण्यासाठी अनुसरण्याची धोरणे आणि कार्यपध्दती डिजीएफटी द्वारे जाहीर केली जातात.

२. अधिकृत डिलर वर्ग - १ बँका प्रचलित विदेश व्यापार धोरण भारत सरकारने आखलेले नियम आणि रिझर्व बँकेने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश यानुरूप निर्यात व्यवहार करू शकतात. (१) एडी बँका येऊ घातलेल्या विदेशी व्यापार धोरणाच्या आणि भारत सरकारने निर्गमित तयार केलेल्या नियमांच्या आणि रिझर्व बँकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार निर्यात व्यवहार करू शकतात. विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४२) कलम ७ च्या उपकलमाच्या खंड (१), आणि उपकलम (३) आणि कलम ४७ च्या उपकलम (२) द्वारे प्राप्त झालेल्या अधिकारात, रिझर्व बँकेने भारतातून माल आणि सेवांच्या निर्यातीच्या संबंधात इथून पुढे 'निर्यात नियमने' अशी संदर्भित केलेली विदेशी विनिमय व्यवस्थापन (मालाची आणि सेवांची निर्यात) नियमने २००० अधिसूचीत केली आहेत. ही नियमने अधिसूचना क्र. एफइएमए २३/२०००-आरबी दिनांक मे ३, २०००,अन्वये अधिसूचीत केली आहेत.

३. या परिपत्रकात समाविष्ट असलेले आदेश भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाने अधिसूचना क्र. जी.एस.आर.३८१ (इ) दिनांक मे ३, २००० (परिशिष्ट -१) अन्वये अधिसूचीत केलेल्या नियमांबरोबर त्याचप्रमाणे वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे रिझर्व बँकेने अधिसूचना क्र. एफइएमए २३/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० (परिशिष्ट -२) सह वाचावे.

(४) विदेशी मुद्रा व्यवस्थापन (हमी ) विनियम, २००० च्या विनियम ४ अनुसार व अधिसूचना क्र.फेमा ८/२०००-आरबी दि. मे ३, २००० अनुसार अधिसुचित केल्यानुसार, एडी वर्ग - १ बँकांना भारताबाहेर केलेल्या निर्यातींसाठी, त्यांच्या ग्राहकांना, त्या निर्यातदार ग्राहकांच्या वतीने पुढील अटींवर हमी देण्यास परवानगी देण्यात आली आहे.

५. विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम १९९९ अधीन तयार केलेले नियम, नियमने आणि अधिसूचना यांच्यानुसार भारतीय रुपयात निर्यातीचे बीजक तयार करण्यावर कोणतेही बंधन नाही. त्याशिवाय, विदेशी व्यापार धोरण (ऑगस्ट २७, २००९ -मार्च ३१, २०१४), च्या परिच्छेद २.४० नुसार "सर्व निर्यात कंत्राटे एकतर मुक्तपणे परिवर्तनीय विदेशी चलनात किंवा भारतीय रुपयात अभिधानित असावीत पण निर्यातीच्या उत्पन्नाची वसूली मात्र मुक्तपणे परिवर्तनीय चलनात असावे. तथापि, विशिष्ट निर्यातीसमक्ष निर्यातीचे उत्पन्न जर, एसीयू चे सदस्य किंवा नेपाळ किंवा भूतान व्यतिरिक्त कोणत्याहि देशात स्थित असलेल्या बँकेतील अनिवासीच्या मुक्तपणे परिवर्तनीय वोस्त्रो खात्यातून असेल तर रुपयात वसूल करता येईल.

६. रिझर्व्ह बँकेला काहीहि संदर्भित करताना ते प्रथम, अन्यथा दर्शविले नसेल तर, विदेशी विनिमय विभागाच्या ज्या विभागीय कार्यालयाच्या आधिकारितेत व्यक्ति रहात असेल किंवा फर्म/कंपनी कार्यरत असेल त्यांच्याकडे केले पाहिजे. काही विशिष्ट कारणासाठी ते विदेशी विनियम विभागाच्या वेगळ्या कार्यालयाशी व्यवहार करू इच्छित असतील तर, आवश्यक त्या परवागीसाठी त्यानी त्या विभागाच्या विभागीय कार्यालयात भेटावे.

७. व्यापार-संबंधातील प्रश्नांसंबंधित असलेल्या सर्व व्यवहारांसाठी "आर्थिक वर्ष" (एप्रिल ते मार्च) हेच पायाभूत धरले जाते.

## भाग २

**ब निर्यातीसाठी सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्वे**

**ब.१ जीआर घोषित करण्यातून सूट**

**जीआर सूट**

माल आणि सॉफ्टवेअरच्या निर्यातीची घोषणा विहीत नमुन्यात करणे, अधिसूचना क्र. एफइएमए २३/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० च्या नियमन ४ मध्ये दर्शविलेल्या प्रकरणात आवश्यक नाही(परिशिष्ट- २). परंतु निर्यातदार निर्यातीचे उत्पन्न एफइएमए नियमनांनुसार वसूल करण्यास आणि प्रत्यावर्तित करण्यास जबाबदार आहेत.

**जीआर सोडून देण्यास मंजूरी**

(१) एडी वर्ग - १ बँका निर्यातीच्या प्रवर्तनासाठी अर्जदाराच्या आधीच्या तीन आर्थिक वर्षातील वार्षिक सरासरी निर्यातीच्या २ टक्कयांपर्यंत आणि कमाल रु. ५ लाखांच्या मर्यादेच्या अधीन, निर्यातदारांकडून मालाच्या विनामूल्य निर्यातीसाठी जीआर सोडून देण्याच्या विनंतीचा विचार करतील. स्थिती धारक निर्यातदारांसाठी विद्यमान विदेशी व्यापार धोरणानुसार मर्यादा रु. १० लाख किंवा आधीच्या तीन आर्थिक वर्षातील(एप्रिल ते मार्च) सरासरी वार्षिक निर्यातीच्या वसूलीच्या २ टक्के यांपैकी जी अधिक असेल ती असेल.

(२) विदेशी चलनातील कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष व्यवहार समाविष्ट नसलेल्या मालाच्या निर्यातीसाठी रिझर्व्ह बँकेच्या जीआर/पीपी कार्यपध्दतीची गरज असेल.

**ब.२ प्राप्ती आणि प्रदानाच्या पध्दती**

(१) निर्यात केलेल्या मालाच्या पूर्ण निर्यात मूल्याचे प्रतिनिधीत्व करणारी रक्कम, अधिसूचना क्र. एफइएमए १४/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० अन्वये अधिसूचीत केलेल्या विदेशी विनिमय व्यवस्थापन (प्राप्ती आणि प्रदानाच्या पद्धती) नियमने, २००० मध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या पध्दतीत खालील प्रकारे एडी बँकांमार्फत प्राप्त केली जाईल.

ए) बँक धनाकर्ष. प्रदानादेश, बँकर्स किंवा व्यक्तिगत धनादेश.
बी) खरेदीदाराच्या भारत भेटी दरम्यान विदेशी चलनातील नोटा/विदेशी चलनातील प्रवासी धनादेश.
सी) खरेदीदाराने ठेवलेल्या एफसीएनआर/एनआरइ खात्यात धारण केलेल्या निधीतून प्रदान.
डी) खरेदीदाराचे आंतरराष्ट्रीय क्रेडीट कार्ड.

**टीप :** जेव्हा समुद्रपार खरेदीदाराला त्याच्या भेटीदरम्यान विकलेल्या मालासाठी प्रदान अशा पद्धतीने प्राप्त होते तेव्हा एडी वर्ग - १ बँकेने त्यांच्या नोस्त्रो खात्यात निधी प्राप्त झाल्यानंतर किंवा जर संबधित एडी वर्ग - १ बँक क्रेडीट कार्ड सर्विसिंग शाखा नसेल तर भारतातील क्रेडीट कार्ड सर्विसिंग बँकेकडील तिला विदेशी चलनात सममूल्य रक्कम प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र निर्यातदाराने हजर केल्यानंतर, जीआर / एसडीएफ मुक्त करावेत. जेथे कार्ड निर्गमित करणाऱ्या बँकेकडून/ संघटनेकडून विदेशी चलनात प्रतिपूर्ती प्राप्त होईल, एडी वर्ग - १ बँका भारताबाहेर निर्यात केलेल्या मालासाठी प्रदान आयातदाराच्या कार्डावरील वजावटीद्वारे सुद्धा प्राप्त करू शकतील.

(२) व्यापारी व्यवहार खालील पध्दतीने सुध्दा पूर्ण करता येतीलः

ए) भारतातील निवासी व्याक्ति आणि नेपाळमधील निवासी व्यक्ति यांच्या मधील सर्व व्यवहार भारतीय रुपयात पूर्ण करता येतील. परंतु, नेपाळला मालाच्या निर्यातीच्या बाबतीत, जेथे नेपाळच्या राष्ट्रीय बँकेने निर्यातदाराला मुक्त विदेशी चलनात प्रदान करण्याची परवानगी दिली आहे, अशी प्रदाने एसीयू यंत्रणेमार्फत मार्गस्थ करावीत.

बी) एसइझेड आणि इओयु मधील युनीटसद्वारा मूल्यवान धातूंच्या म्हणजेच सोने/चांदी/प्लॅटिनम, बाबतीत विक्रीच्या करारात त्यासाठी तरतूद असेल तर आणि संबंधित जीआर/एसडीएफ/पीपी नमुन्यात मूल्यवान धातूंची अंदाजे किंमत दर्शविली असेल तर निर्यात केलेल्या दागिन्यांच्या मूल्याची सममूल्य.

(३) ऑनलाईन पेमेंट गेटवे सर्व्हिस प्रोव्हायडर्स ( ओपीजीएसपी ) मार्फत निर्यात-संबंधित आवक-रकमांवर (रिसीट्स) प्रक्रिया करणे – प्राधिकृत डीलर वर्ग-१ बँकांना, ह्या ऑनलाईन पेमेंट गेटवे सर्व्हिस प्रोव्हायडर्स (ओपीजीएसपी ) बरोबर स्थायी व्यवस्था करुन, निर्यात-संबंधीच्या प्रेषणांचे प्रत्यावर्तन सुविधेसाठी, पुढील अटींवर परवानगी देण्यात आली आहे. –

(अ) ही सुविधा देऊ करणाऱ्या एडी वर्ग - १ बँकांनी अशा ओपीजीएसपी बाबत पूर्ण चौकशी करावी

(ब) ही सुविधा केवळ युएसडी ५०० ( युएस डॉलर पाचशे ) पर्यंतच्या मूल्याची, माल व सेवा ह्यांच्या निर्यातीसाठीच लागु असेल

(क) अशा सुविधा देणाऱ्या एडी वर्ग - १ बँकांनी, अशा व्यवस्थांद्वारा आलेल्या निर्यात संबंधीची प्रदाने मिळविण्यासाठी एक नोस्ट्रो कलेक्शन खाते उघडावे. ह्या सुविधेचा लाभ घेणाऱ्या निर्यातदारांना ओपीजीएसपीकडे संकल्पनात्मक खाते उघडण्याची आवश्यकता असते तेथे खात्री करुन घेण्यात यावी की अशा खात्यांमध्ये कोणतेही निधी ठेवण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि सर्व आवक ( रिसीट्स ) त्या एडी वर्ग - १ बँकेने उघडलेल्या नोस्ट्रो कलेक्शन खात्यात आपोआपच जमा केला जाऊन एकत्रित केला जाईल

(ड) प्रत्येक ओपीजीएसपीसाठी एक वेगळे नोस्ट्रो कलेक्शन खाते उघडले जावे किंवा प्रत्येक ओपीजीएसपीच्या नोस्ट्रो खात्यातील व्यवहार बँकेद्वारा स्पष्ट/आखीवपणे दाखविता आले पाहिजेत

(ई) ह्या व्यवस्थेखाली उघडलेल्या नोस्ट्रो कलेक्शन खात्यात केवळ पुढील डेबिट्स करण्यासच परवानगी आहे –

(१) निर्यातदाराच्या खात्यात जमा करण्यासाठी भारतात निर्यात केलेल्या मालाच्या उत्पन्नाचे/निधीचे प्रत्यावर्तन

(२)(ब) पूर्वीच ठरविलेल्या दराने/वारंवारतेने/व्यवस्थेनुसार ओपीजीएसपीला केलेले शुल्क/कमिशनचे प्रदान आणि

(३)(क) विक्री-कराराखाली निर्यातदाराने त्याचे दायित्व पूर्ण केले नसल्यास त्याने द्यावयाचा चार्ज बँक

(फ) नोस्ट्रो खात्यात ठेवलेली शिल्लक, आयातदाराकडून दुजोरा मिळाल्यावर ताबडतोब आणि कोणत्याही बाबतीत नोस्ट्रो कलेक्शन खात्यात क्रेडिट केल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत, संबंधित निर्यातदाराच्या भारतामधील खात्यात जमा केली जाईल

(ग) एडी वर्ग - १ बँका व्यवहारांच्या खरेपणाबाबत समाधान करुन घेतील व ऑनलाईन प्रदानामध्ये रिझर्व बँकेला कळविलेले परपज कोड्स सुयोग्य असल्याची खात्री करुन घेतील

(ह) ह्या व्यवस्थेखाली केलेल्या कोणत्याही व्यवहारासंबंधीची सर्व माहिती, रिझर्व बँकेने मागणी केल्यानुसार, एडी वर्ग - १ बँक सादर करील

(आय) प्रत्येक नोस्ट्रो खात्याचे दर तीन महिन्यांनी रिकंसिलिएशन व ऑडिट केले जाईल

(ज) भारतामधील निर्यातदारांच्या प्रदान संबंधीच्या सर्व तक्रारींचे निवारण करणे ही संबंधित ओपीजीएसपीचीच जबाबदारी असेल

(क) रिझर्व बँकेने दिलेल्या विशिष्ट होल्डिंग ऑन मंजुरीनुसार अशा सेवा देणाऱ्या, ओपीजीएसपी, रिझर्व बँकेकडून मंजुरी मिळवून व एडी वर्ग - १ बँकांबरोबरच्या व्यवस्था निश्चित करुन, नोव्हेंबर १६, २०१० पासून

तीन महिन्यांच्या आत भारतामध्ये त्यांचे संपर्क कार्यालय स्थापन करतील. सर्व नव्या व्यवस्थांबाबत, अशी व्यवस्था कार्यान्वित करण्यापूर्वी, ती ओपीजीएसपी, संपर्क कार्यालय स्थापन करण्यापूर्वी त्यासाठी रिझर्व बँकेची मंजुरी प्राप्त करील. अशी व्यवस्था ठेवण्यास इच्छुक असलेल्या एडी वर्ग - १ बँकांनी रिझर्व बँकेकडून त्यासाठी एकदाच परवानगी घ्यावी व त्यानंतर प्रत्येक वेळी अशी व्यवस्था ठेवतेवेळी त्याबाबतची सविस्तर माहिती रिझर्व बँकेला कळवावी.

(४) एसीयु यंत्रणेखालील तडजोड प्रणाली

(अ) जानेवारी ०१,२००९ पासून व्यवहार/तडजोडी करण्यास मदत व्हावी म्हणुन, एशियन क्लियरिंग युनियनमध्ये भाग घेणारांसाठी त्यांचे व्यवहार एसीयु डॉलर किंवा एसीयु युरोमध्ये करण्याचा पर्याय उपलब्ध असेल. त्यानुसार, एसीयु मोनेटरी युनिट (एएमयु) ला "एसीयु डॉलर" व "एसीयु युरो" समजले जाईल व त्यांचे सममुल्य अनुक्रमे एक युएस डॉलर व एक युरो धरले जाईल. ह्याशिवाय, एडी वर्ग-१ बँकांना इतर सहभागी देशातील त्यांच्या कॉरेस्पॉंडंट बँकांमध्ये एसीयु डॉलर व एसीयु युरो खाती उघडता व चालविता येतील. संबंधित बँकांनी ह्या खात्यांमधुनच सर्व पात्र व्यवहारांची तडजोड करणे आवश्यक आहे.

(ब) एसीयु यंत्रणेपासून सूट/सवलत - म्यानमारबरोबर केलेले इंडो - म्यानमार व्यापार, एसीयु यंत्रणेव्यतिरिक्त इतर कोणत्याही मुक्त परिवर्तनीय चलनातून करता येऊ शकतील.

(क) एसीयु यंत्रणेपासून सवलत – इंडो-म्यानमार व्यापार – एसीयु यंत्रणेव्यतिरिक्त म्यानमारबरोबर केलेल्या व्यापारी व्यवहारांची तडजोड/हिशेबपूर्ती, कोणत्याही मुक्तपणे परिवर्तनीय चलनात केली जाऊ शकते.

(ड) इराणला द्यावयाच्या/इराणकडून घ्यावयाच्या प्रदानांमध्ये आयातकार/निर्यातदार ह्यांना होणाऱ्या अडचणींचा विचार करता असे ठरविण्यात आले आहे की, डिसेंबर २७, २०१० पासून, इराण बरोबर व्यापारी व्यवहारांसह केलेल्या अर्हतायुक्त अशा सर्व चालु खात्यांच्या व्यवहारांची तडजोड, पुढील सूचना दिली जाईपर्यंत, एसीयु बाहेरील कोणत्याही चलनात करण्यास परवानगी आहे.

## ब. ३ निर्यात उत्पन्नाची वसुली व प्रत्यावर्तन ( रियलायझेशन व रिपॅट्रिएशन)

निर्यात केलेल्या मालाची किंवा सॉफ्टवेअरची संपूर्ण रक्कम, निर्यातीच्या तारखेपासून निर्धारित कालावधीमध्ये वसूल करुन तिचे भारतात प्रत्यावर्तन करणे ही निर्यातदारांची जबाबदारी आहे
(१) स्पेशल इकॉनॉमिक झोनमधील (एसईझेड) एककांसाठी कोणताही विशिष्ट कालावधी ठरविण्यात आलेला नाही.
(२) विदेश व्यापार धोरणात व्याख्या केलेल्या स्टेट्स होल्डर (मानांकित) निर्यातदारांसाठी- निर्यात केल्याच्या तारखेपासुन बारा महिन्यांच्या आत.
(३) १००% निर्यात- प्रणव एककांसाठी (ईओयु) व इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर टेकनॉलॉजी पार्क (ईएचटीपी) , सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स (एसटीपी) व बायोटेक्नॉलॉजी पार्कस (बीटीपी) योजनाखाली स्थापन केलेल्या एककांसाठी सप्टेंबर ०१, २००४ रोजी किंवा त्यानंतरच्या निर्यात तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीत.
(४) भारताबाहेर स्थापन केलेल्या वेअरहाउसला निर्यात केलेल्या मालासाठी ती रक्कम झाल्याबरोबर व कोणत्याही परिस्थितीत तो माल पाठविल्याच्या (शिपमेंट) तारखेपासून पंधरा महिन्यांच्या आत.
(५) इतर सर्व बाबतीत - जून ३, २००८ पासून, हा वसूली व प्रत्यावर्तनाचा कालावधी पुढील आढावा घेईपर्यंत, निर्यातीच्या तारखेपासुन १२ महिन्यांच्या वाढविण्यात अला आहे.

## ब.४ विदेशी चलन खाते

(१) आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात/व्यापारी मेळ्यात सहभागी होणाऱ्यांना अधिसूचना क्र. एफइएमए १०/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० द्वारे अधिसूचित करण्यात आलेल्या विदेशी विनिमय व्यवस्थापन (भारतातील निवासी व्यक्तिद्वारे विदेशी चलन खाते) नियमने, २००० च्या नियमन ७(७) अन्वये विदेशात तात्पुरते विदेशी चलन खाते उघडण्यास सर्वसाधारण परवानगी देण्यात आलेली आहे. निर्यातदार आंतरराष्ट्रीय

प्रदर्शनात/व्यापारी मेळ्यात मालाच्या विक्रीतून प्राप्त झालेले विदेशी चलन त्यांच्या भारताबाहेरील निवासाच्या काळात खात्यात जमा करून खात्याचे प्रचालन करू शकतात जर खात्यातील शिल्लक प्रदर्शन/व्यापारी मेळा संपल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत सामान्य बँकिंग वाहिन्यांमार्फत भारतात प्रत्यावर्तित करण्यात आले आणि संबंधित अधिकृत डिलर बँकेला पूर्ण तपशील सादर करण्यात आला.

(२) चांगली पूर्व कामगिरी केलेल्या निर्यातदारांकडून, भारतामधील व भारताबाहेरील बँकांमध्ये विदेशी मुद्रा खाते उघडण्यासाठी, काही विशिष्ट अटी व शर्तींवर, रिझर्व बँक, फॉर्म ईएफसी (जोडपत्र ६) मधील अर्जांचा विचार करु शकते. एखादी एडी वर्ग - १ बँकेच्या शाखेत असे खाते उघडण्यासाठी करावयाचा अर्ज, ते खाते ज्या शाखेत उघडावयाचे आहे त्या शाखेमार्फतच सादर केला जावा. असे खाते विदेशात उघडावयाचे असल्यास, निर्यातदाराने, जेथे खाते ठेवले जाणार असेल त्या बँकेची सविस्तर माहिती देऊन अर्ज केला जावा.

(३) एखादे भारतीय भारताबाहेरील बँकेत, त्याच्या समुद्रपार कार्यालयाच्या/शाखेच्या नावे, सदर कार्यालयाच्या/शाखेच्या किंवा प्रतिनिधीच्या सामान्य व्यावसायिक प्रचलनाच्या हेतूने वित्तप्रेषण करून अधिसूचना क्र. एफइएमए १०/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० च्या नियमन ७ मध्ये ठरवून दिलेल्या आणि वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे अटींच्या अधीन विदेशी चलन खाते उघडू शकते, धारण करू शकते आणि ठेवू शकते.

(४) स्पेशल इकॉनॉमिक झोन (एसईझेड) मध्ये असलेले एकक भारतामधील एडी वर्ग - १ बँकेच्या विदेशी मुद्रा खाते उघडू, ठेवू व चालू शकते. मात्र त्यासाठी वेळोवेळी सुधारित केलेल्या, अधिसूचना क्र. फेमा १०/ २००० आरबी दि. मे ३, २००० च्या विनियम ६ (अ) मधील अटी लागु होतील.

(५) भारतात रहिवासी असलेली व प्रकल्प /सेवा निर्यात करणारी व्याप्ती भारताबाहेर असलेल्या किंवा भारतातील बँकेत विदेशी मुद्रा खाते उघडु व चालवू शकते. मात्र त्यासाठी मेमोरँडम पीईएममधील प्रमाणित अटी व शर्ती लागु होतील.

**ब.५ डायमंड डॉलर खाते (डी डी ए)**

१) भारत सरकारच्या योजनेखाली, खडबडीत/कापलेले व पॉलिश केलेले हिरे/मूल्यवान धातूंचे साधे, मिनाकारी केलेले आणि/किंवा खडे/हिरे जडावलेले/न जडावलेले दागिने ह्यांची खरेदी/विक्री करणाऱ्या व हिरे/रंगीत रत्ने/हिरे व रंगीत रत्नांचे जडाव कामाचे दागिने ह्यांची आयात/निर्यात करणाऱ्या, व गेल्या तीन परवाना वर्षात रु. ३ कोटींपेक्षा अधिक उलाढाल केली असणाऱ्या (परवाना वर्ष एप्रिल ते मार्च) व त्यात किमान दोन वर्षांची यशस्वी कामगिरी केलेल्या संस्था व कंपन्या ह्यांना डायमंड डॉलर खात्याद्वारे त्यांचे व्यवहार करण्यास परवानगी आहे.

(२) त्यांना त्यांच्या बँकेत पाचपेक्षा अधिक नसलेली डायमंड डॉलर खाती उघडण्याची परवानगी देण्यात येईल.

(३) अर्हताप्राप्त संस्था व कंपन्यांनी, परवानगी मिळविण्यासाठी, विहित नमुन्यात त्यांच्या एडी वर्ग - १ बँकांकडे अर्ज करावेत.

**ब ६ विनिमय मिळविणाऱ्याचे विदेशी चलन(इइएफसी) खाते एक्सचेंज अर्नर्स फॉरिन करंसी (इइएफसी) खाते**

(१) भारतातील निवासी व्यक्ति, भारतातील एडी बँकांत, वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे अधिसूचना क्र. एफइएमए १०/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० अधीन अधिसूचित केलेल्या विदेशी विनिमय व्यवस्थापन (भारतातील निवासी व्यक्तिद्वारे विदेशी चलन खाते) च्या नियमन ४ नुसार एक्स्चेंज अर्नर्स फॉरिन करंसी खाते नावाचे विदेशी चलनातील खाते उघडू शकते.

(२) विदेशी चलन कमावणाऱ्यांच्या सर्व प्रवर्गांना त्यांच्या इइएफसी खात्यात त्यांच्या विदेशी चलनातील कमाईच्या १०० टक्क्यांपर्यंत जमा करण्याची परवानगी आहे.

(३) ही खाती केवळ बिनव्याजी चालू खात्याच्या स्वरूपात ठेवली जातील आणि कोणतीहि निधी-आधारित किंवा न-निधी-आधारित, क्रेडिट सुविधा अधिकृत डिलर बँकातील इइएफसी खात्यात धारण केलेल्या शिलकीसमक्ष अनुज्ञेय असणार नाही. असे खाते केवळ बिनव्याजाचे चालु खाते म्हणूनच ठेवता येईल एडी वर्ग-१ बँकांकडुन कोणत्याही कर्जसुविधा (निधी आधारित किंवा नसलेल्या) देण्यास परवानगी नाही

(४) पात्र असलेली कर्जे म्हणजे

(अ) रिझर्व बँकेला दिलेल्या हमीपत्रानुसार मिळालेले प्रेषण, किंवा भारताबाहेरुन घेतलेले विदेशी कर्ज किंवा मिळालेली गुंतवणुक किंवा खातेदाराचे विशिष्ट दायित्व पूर्ण करण्यासाठी घेतलेले वरीलप्रमाणे कर्ज / गुंतवणुक सोडल्यास नेहमीच्या बँकिंग वाहिन्यांमार्फत मिळालेले अंतर्गत प्रेषण.

(ब) डोमेस्टिक टॅरिफ एरिया (डीटीए) मधील एखाद्या एककाल विदेशी मुद्रेमध्ये, स्पेशल इकॉनॉमिक झोनमधील एखाद्या एककाला, माल पुरविण्यासाठी त्या एककाच्या विदेशी मुद्रा खात्यामधून मिळालेली, विदेशी मुद्रेतील प्रदाने.

(५) एडी वर्ग - १ बँका, त्यांच्या निर्यातदार ग्राहकांना, कोणत्याही मर्यादेशिवाय, त्या ग्राहकांच्या ईईएफसी खात्यातील शिल्लकेमधून व्यापार संबंधित कर्जे / आग्रिम राशी देण्याची परवानगी देउ शकतात. मात्र त्यासाठी, वेळोवेळी सुधारित केलेल्या, अधिसूचना क्र. फेमा ३/२००० - आर बी, दि. मे. ३,२००० मधील तरतुदींचे पालन केले असले पाहिजे.

(६) प्रत्यक्ष निर्यात झाली असल्यास, एडी वर्ग - १, बँका निर्यातदारांना, रुपयाच्या स्वरुपात घेतलेली किंवा त्यांच्या ईईएफसी खात्यामधील शिल्लकेमधून विदेशी मुद्रेच्या स्वरूपातील आणि / किंवा रुपयांच्या स्रोतांमधील पॅकिंग क्रेडिट अग्रिम राशीची रक्कम पुनर् प्रदान (रि-पे) करण्यास परवानगी देऊ शकतात.

**ब.७ विदेशात कार्यालये स्थापन करणे किंवा विदेशातील कार्यालयांसाठी स्थावर मालमत्ता संपादन करणे**

(१) कार्यालय स्थापन करण्याच्या वेळी, एडी बँका, गत दोन आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक विक्री/उत्पन्नाच्या किंवा उलाढाल यांच्या पंधरा टक्के किंवा एकूण नक्त उत्पन्नाच्या २५ टक्के यापैकी जे अधिक असेल त्याच्या वित्तप्रेषणासाठी प्रारंभिक खर्चाच्या पोटी परवानगी देऊ शकतात.

(२) त्यानंतरच्या खर्चासाठी, खाली अटी आणि शर्तींच्या अधीन भारताबाहेरील कार्यालय(व्यापारी/बिगर-व्यापारी)/शाखा किंवा प्रतिनिधी कार्यालय यांच्या सामान्य व्यावसायिक प्रचालनाच्या हेत्वर्थ गत दोन आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक विक्री/उत्पन्न किंवा उलाढालीच्या दहा टक्क्यांपर्यंत वित्तप्रेषण करता येईल.

ए) भारतीय एककाचे सामान्य व्यावसायिक व्यवहार करण्यासाठी समुद्रपार शाखा/कार्यालय स्थापन करण्यात आले असेल किंवा प्रतिनिधीची नियुक्ती केली असेल.

बी) समुद्रपार शाखा/कार्यालय त्याखाली केलेल्या अधिनियमांचे, नियमांचे किंवा नियमनांचे उल्लंघन करून कोणताही करार किंवा कंत्राट करणार नाही.

सी) असे कि समुद्रपार कार्यालय (व्यापारी/अव्यापारी) /शाखा/प्रतिनिधी भारतातील कार्यालयासाठी आकस्मिक किंवा अन्यप्रकारचे आर्थिक दायित्व निर्माण करणार नाही किंवा रिझर्व्ह बँकेच्या पूर्वानुमतिविना अधिकांश निधीची विदेशात गुंतवणूक करणार नाही. अधिकांश ठरलेला कोणताही निधी भारतात प्रत्यावर्तित करण्यात यावा.

(३) समुद्रपार उघडलेल्या बँक खात्यांचा तपशील तत्परतेने एडी बँकांना कळविला पाहिजे.

(४) एडी वर्ग - १ बँका, समुद्रपार कार्यालय असलेल्या, भारतात अंगीकृत झालेल्या कंपनीलासुद्धा, तिच्या व्यवसायाच्या हेत्वर्थ आणि तिच्या कर्मचाऱ्यांच्या निवासाच्या हेत्वर्थ भारताबाहेर मालमत्ता संपादन करण्यासाठी, प्रारंभिक आणि नंतरच्या खर्चासाठी, उक्त मर्यादेच्या अधीन वित्तप्रेषणासाठी परवानगी देतील

(५) सॉफ्टवेअर निर्यातदार कंपनी/फर्मचे समुद्रपार कार्यालय/शाखा प्रत्येक 'ऑफ-साइट' कंत्राटाचे १०० टक्के कंत्राट मूल्य भारतात प्रत्यावर्तित करू शकेल.

६) "ऑनसाईट"कंत्राटे कंपन्या घेत असल्यास, अशी कंत्राटे पूर्ण झाल्यावर त्यांनी अशा "ऑनसाईट"कंत्राटांच्या नफ्याचे प्रत्यावर्तन करावे

(७) समुद्रपार कार्यलयानी हाती घेतलेल्या 'ऑफ-साइट' आणि 'ऑन-साइट' कंत्राटातील प्राप्ती, त्यावरील खर्च आणि प्रत्यावर्तन दर्शविणारे लेखापरिक्षित वार्षिक विवरणपत्र एडी बँकाना पाठवावे.

## ब.८ निर्यातीसमक्ष आगाऊ प्रदाने

**(१)** अधिसुचना क्र. एफइएमए २३/२०००-आरबी दिनांक मे ३, २००० च्या नियमन १६ नुसार, जेथे निर्यातदाराला भारताबाहेरील खरेदीदाराकडून आगाऊ प्रदान प्राप्त होते (सव्याज किंवा विनाव्याज), तेथे निर्यातदाराने खात्री करून घेणे हे कर्तव्य आहे कि –

(१) आगाऊ प्रदानाच्या प्राप्तीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत मालाचे नौप्रेषण केले जाईल,

(२) आगाऊ प्रदानावर देय असलेला व्याजाचा दर, काही असल्यास, लंडन इंटर-बँक ऑफर्ड रेट(लिबॉर)+१०० बेसिस पॉइंट पेक्षा अधिक नसेल, आणि

(३) नौप्रेष समाविष्ट असलेली कागदपत्रे ज्या बँकेमार्फत आगाऊ प्रदान प्राप्त झाले असेल त्या एडी बँकेमार्फत मार्गस्थ केली जातील. एडी वर्ग - १ बँक

परंतु जर निर्यातदार आगाऊ प्रदानाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत नौप्रेष करण्यास पूर्णतः किंवा अंशतः असमर्थ ठरला, रिझर्व्ह बँकेच्या पूर्वानुमतिविना सदरहू एक वर्षाच्या कालावधीच्या समाप्तीनंतर व्याजाच्या प्रदानापोटी आगाऊ प्रदानाच्या विनियोग न केलेल्या भागापोटी कोणतेहि वित्तप्रेषण करू नये.

**(२)** जेथे आगाऊ प्रदानाच्या तारखेपासून एक वर्षाच्या वरील काळात मालाचे नौप्रेष करण्याची तरतूद करारात केली असेल, निर्यातदाराला रिझर्व बँकेच्या पूर्वानुमतिची गरज असेल.

**(३)** विविध शाखात/बँकात ठेवलेल्या निर्यातदाराच्या इइएफसी कात्यांमध्ये धारण केलेल्या संपूर्ण शिलकीचा विनियोग केल्यानंतरच एडी बँका एडी वर्ग - १ बँक इइएफसी खात्यात जमा केलेल्या आगाऊ प्रदानाच्या परताव्यासाठी बाजारातून विदेशी चलन खरेदी करण्यास परवानगी देतील.

टीप - एडी वर्ग - १ बँकांना, डीबीओडीने दिलेल्या, गॅरंटीज् व को - ॲक्सेप्टन्सेसवरील महापत्रिकाचे मार्गदर्शन घेता येईल.

## ब ९ विदेशातील ट्रेड फेअर/प्रदर्शने ह्यासाठी मंजुरी

परदेशातील व्यापार जत्रा/ प्रदर्शने ह्यात भाग घेणाऱ्या संस्था/कंपन्या त्यांचा माल, रिझर्व बँकेच्या पूर्व परवानगी प्रदर्शनासाठी बाहेर नेऊ/निर्यात करु शकतात व भारताबाहेर विकूही शकतात. विक्री न झालेल्या वस्तु त्याच देशात किंवा तिसऱ्या देशात व्यापार जत्रा/ प्रदर्शनाच्या बाहेर विकता येऊ शकतात. सवलतीच्या दरात केलेल्या अशा विकरिलाही परवानगी आहे. प्रति प्रदर्शन/ व्यापार जत्रेसाठी, प्रति निर्यातदारासाठी

युएसडी ५००० पर्यंत मूल्याचा न खपलेला माल "देणगी" म्हणून देण्यासही परवानगी आहे. एडी वर्ग १ बँक, भारताबाहेरील व्यापारजत्रा/प्रदर्शनांमध्ये प्रदर्शीत किंवा प्रदर्शन व विक्रीसाठी निर्यात करावयाच्या मालाबाबतचा जीआर फॅर्म पुढील अटींवर मंजूर करु शकतात.
(१) निर्यातदाराने न विकलेल्या गेलेल्या मालाचे संबंधित बिल ऑफ एंट्री ,तो माल भारतात पुनरायात केल्याच्या एक महिन्याच्या आत सादर करावा

(२) विकलेल्या मालाचे उत्पन्न, फॉरिन एक्सचेंज मॅनेजमेंट (रियलायझेशन रिपॅट्रिएशन अँड सरेंडर ऑफ फॉरिन एक्सचेंज) विनियम, २००० अनुसार भारतात प्रत्यावर्तित करावे.

(३) निर्यातदाराने, एडी वर्ग-१ बँकेकडे निर्यात केलेल्या सर्व वस्तुंची बासलान करण्याची व भारतात प्रत्यावर्तन करण्याची रीत कळवावी

(४) एडी वर्ग-१ बँकांनी मंजुर केलेल्या अशा व्यवहारांचे १०० टक्के ऑडिट अंतर्गत निरीक्षक / ऑडिटर्सनी करावे.

## ब-१० - पुनर्आयात करावायच्या मालाची निर्यात करण्यासाठी जीआर मंजुरी

(१) जेथे रिपेअर्स/मेंटेनन्स/टेस्टिंग/कॉलिब्रेशन इत्यादिसाठी माल निर्यात करुन त्यानंतर तो पुनर्आयात करावयाच्या आहे अशा बाबतीत, निर्ततदारांनी केलेले जीआर मंजुरी चे अर्ज एडी वर्ग-१ बँक विचारात घेऊ शकतात. मात्र त्यासाठी, भारतातुन निर्यात केलेल्या वस्तुबाबत ती पुनर्आयात केल्यावरचे संबंधित बिल ऑफ एंट्री, निर्यातदाराने पुनर्आयातीनंतर एक महिन्याच्या आत सादर करावे.

(२) जेथे परीक्षण/टेस्टिंग करण्यासाठी निर्यात केलेला माल टेस्टिंग करतेवेळी नष्ट झाला असेल तेव्हा एडी वर्ग-१ बँक बँकांनी तो पुनर्आयात करतेवेळी बिल ऑफ एंट्री ऐवजी, तो माल टेस्टिंगदरम्यान नष्ट झाल्याचे, टेस्टिंग एजन्सीने दिलेले प्रमाणपत्र मिळावावे.

## ब.११ अंशतः रक्कम काढणे/न काढलेली शिल्लक

**(१)** निर्यात व्यापाराच्या काही पध्दतीत, मालाच्या विश्लेषणानंतर किंवा माल निरीक्षणासाठी आल्यानंतर ठरविण्यात येणाऱ्या वजनातील, दर्जातील फरकापोटी वगैरे समायोजनानंतर प्रदानासाठी बीजक मूल्याचा काही भाग न काढता ठेवून देंण्याची पद्धत आहे. अशा बाबतीत, एडी बँकांनी बिलांच्या वाटाघाटी कराव्यात जरः

(अ) न काढलेल्या शिलकीचा रक्कम निर्यात व्यापाराच्या विशिष्ट पद्धतीत, संपूर्ण निर्यात मूल्याच्या कमाल १० टक्क्यांपर्यंत सामान्य समजण्यात येईल.

(ब) जीआर/एसडीएफ/पीपी प्रपत्रांच्या स्थळ प्रतीवर निर्यातदाराकडून वसूलीसाठी विहीत कालावधीच्या आत तो नौप्रेषाचे बाकी उत्पन्न तो आणून देईल/हिशोब देईल असे वचनपत्र घेण्यात यावे.

**(२)** एडी बँकांच्या सर्वतोपरी प्रयत्नांनंतरही निर्यातदार न काढलेल्या रकमेच्या प्रत्यावर्तनाची व्यवस्था करू शकला नसेल तर अशा प्रकरणात, प्रकरणाच्या सत्यतेविषयी समाधान झाल्यानंतर, खात्री करावी कि निर्यातदाराने किमान ज्यासाठी आरंभी बिल काढले होते त्या मूल्याची किंवा जीआर/एसडीएफ/पीपी प्रपत्रात घोषित केलेल्या मूल्याच्या ९० टक्के यांपैकी जी अधिक असेल ती वसूली केली आहे आणि नौप्रेषाच्या तारखेपासून एक वर्षाचा काळ गेला आहे.

## ब.१२ मालप्रेष निर्यात

(१)जेव्हा माल मालप्रेष तत्त्वावर न्र्यात केलेला असेल, एडी बँकानी, त्यांच्या समुद्रपार शाखांना/प्रतिनिधीने नौप्रेष कागदपत्रे पाठविताना त्याना ती केवळ निर्यातीच्या उत्पन्नाच्या वसूलीसाठी विहीत कालावधीच्या आत

विनिर्दिष्टीत तारखेपर्यंत विक्रीचे उत्पन्न पोचविण्याच्या वचनपत्रासमक्ष/ट्रस्ट रीसीटसमक्ष पोचविण्याच्या सूचना द्याव्यात. काही व्यापारातील पध्दतीनुसार अंदाजित मूल्याच्या भागासाठी निर्यातीच्या समक्ष बिले काढण्याच्या बाबतीतही ही कार्यपध्दती अनुसरण्यात यावी. एजन्टस/मालप्रेषिती मालाच्या प्राप्तीसाठी, आणि साठविण्यासाठी आणि विक्रीसाठी साधारणपणे येणारा उतरवून घेण्याचा आकार, वेअरहाऊसचे भाडे, हाताळणी आकार वगैरेसारखा खर्च मालाच्या उत्पन्नातून वळता करून घ्यावा आण निर्यातदाराला नक्त उत्पन्न वित्तप्रेषित करावे.

(२) एजन्टस/मालप्रेषिती यांच्याकडून प्राप्त झालेला अकाउंट सेल्स एडी बँकांनी पडताळून घ्यावा. अकाउंट सेल्स मधील वजावटींसाठी पोस्टेज/केबल आकार, मुद्रांक शुल्क अशा किरकोळ बाबी वगळता मूळ बिलांचे/रीसटसचे समर्थन असावे.

(३) मालप्रेष तत्त्वावर निर्यात केलेल्या मालाच्या बाबतीत, फ्रेट आणि सागरी विम्याची व्यवस्था भारतात केली पाहिजे.

(४) चांगला पूर्वेतिहास असणाऱ्या निर्यातदारानी अर्ज केल्यास, रिझर्व बँक त्याना सीआयएस देशाना आणि कोणत्याहि अनुज्ञेय चलनात वित्तपुरवठा केलेल्या पूर्व युरोपीय देशाना मालप्रेष तत्त्वावर केलेल्या निर्यातीसाठी निर्यातीच्या उत्पन्नाच्या वसूलीसाठी १२ महिन्याप्रयंतच्या अधिक दीर्घ कालावधीसाठी परवानगी देईल.

मालप्रेष तत्त्वावरील पुस्तकांच्या निर्यातीच्या बाबतीत, एडी बँका असे प्रस्ताव नौप्रेषाच्या तारखेपासून ३६० दिवसांपर्यंचत निर्यातीच्या उत्पन्नाची वसूली करण्याची परवानगी देऊन मंजूर करतील. विक्रीच्या कराराच्या समाप्तीनंतर न विकली गेलेली पुस्तके सोडून देण्यास निर्यातदाराना परवानगी देण्यात येईल. त्यानुसार, निर्यातदाराना विकल्या न गेलेल्या पुस्तकांचे मूल्य अकाउंट सेल्समध्ये निर्यातीच्या उत्पन्नातून वजा करून दाखविता येईल.

### ब.१३ विदेशात वेअरहाऊसेस उघडणे/भाड्याने घेणे

एडी-१ बँका, विदेशात वेअरहाऊसेस उघडण्यासाठी/भाड्याने घेण्यासाठी निर्यातदारांकडून प्राप्त झालेले अर्ज खालील अटींच्या अधीन विचारात घेईलः

(१) अर्जदाराची निर्यातीची थकबाकी आधीच्या वर्षात केलेल्या निर्यातीच्या ५ टक्क्यांपेक्षा अधिक नसेल.

(२) गेल्या आर्थिक वर्षात निर्यातदाराची यूएस डॉलर १००,०००/-ची किमान निर्यात उलाढाल असेल.

(३) वसुलीसाठी असलेला कालावधी लागु असेल त्याप्रमाणे असावा

(४) सर्व व्यवहार एडी बँकेच्या नियुक्त शाखेमार्फत मार्गस्थ केले जावेत.

(५) निर्यातदाराला उक्त परवानगी आरंभी एक वर्षाच्या कालावधीसाठी मंजूर करता येईल आणि उक्त गरजांच्या पूर्ततेच्या अधीन नूतनीकरणाचा विचार केला जाईल.

(६) अशी परवानगी/मंजूरी देणाऱ्या एडी बँकेने मंजूऱ्यांची योग्य नोंद ठेवावी.

### ब.१४ निर्यातदाराद्वारे कागदपत्रांची थेट रवानगी

१) एडी वर्ग-१ बँकानी सामान्यपणे त्यांच्या समुद्रपार शाखाना/प्रतिनिधीना नौप्रेष कागदपत्रे तातडीने रवाना करावीत. तथापि, माल पोचण्याच्या अंतिम ठिकाणाच्या देशातील निवासी प्रतिनिधीना किंवा मालप्रेषितीना त्या नौप्रेष कागदपत्रे थेट रवाना करू शकतात जेथेः

ए) निर्यात नौप्रेषाच्या संपूर्ण मूल्यासाठी आगाऊ प्रदान किंवा परत न घेता येणारे पतपत्र प्राप्त झाले आहे आणि त्याखालील विक्रीच्या करारात/पतपत्रात मालप्रेषितीला किंवा माल पोचण्याच्या अंतिम ठिकाणच्या देशातील त्याच्या निवासी एजन्टला कागदपत्रे थेट रवाना करण्याची तरतूद आहे.

बी)एडी वर्ग-१ बँका, निर्यातदारांची विनंती मान्य करु शकतात मात्र त्यासाठी, निर्यातदार हा नियमित ग्राहक असला पाहिजे, व त्याची पत व पूर्वकामगिरी ह्यांच्या आधारावर तसेच निर्यात- उत्पन्नाच्या वसुलीसाठी योग्य व्यावस्था करण्यात आली आहे ह्याबाबत बँकेचे समाधान झाले असले पाहिजे.

सी) ते रु. २५,०००/- पेक्षा अधिक मूल्याचे नाही आणि जीआर/एसडीएफ/पीपी/सॉफ्टेक्स प्रपत्रात घोषित केलेले नाही असे निर्यातदाराचे घोषणापत्र जोडलेल्या माल किंवा सॉफ्टवेअर यांच्या संबंधातील कागदपत्रांच्या बाबतीत.

(२) एडी बँका खालील अटी आणि शर्तींच्या अधीन 'स्टेटस धारक निर्यातदाराना' (विदेशी व्यापार धोरणात केलेल्या व्याख्येनुसार), आणि विशेष आर्थिक क्षेत्रातील (एसइझेड) युनीटसना भारताबाहेरील मालप्रेषितीला कागदपत्रे थेट रवाना करण्याची परवानगी देऊ शकतीलः

ए) निर्यातीचे उत्पन्न जीआरमध्ये नाव दिलेल्या एडी बँकेमार्फत प्रत्यावर्तित केले आहे.

बी) निर्यातीच्या तारखेपासून २१ दिवसांच्या आत निर्यातदाराने संनियंत्रणाच्या हेतूने जीआर प्रपत्राची दुसरी प्रत एडी बँकेला सादर केली असेल.

(३) निर्यातदाराने शिपिंग डॉक्युमेंटस थेट अडत्या कडे किंवा माल ज्या देशात पाठवयाचा आहे त्या देशातील त्याच्या एजंटाकडे पाठविण्याची, युसडी १ दशलक्ष किंवा त्याच्या सममुल्य, प्रति निर्यात शिपमेंटबाबतची प्रकरणे एडी वर्ग-१ बँका नियमित करु शकतात. मात्र त्यासाठी पुढील अटी लागु आहेत.

(अ) निर्यातीच्या संपूर्ण रकमेची/उत्पन्नाची वसुली झाली असावी.

(ब) निर्यातदार हा त्या एडी वर्ग-१ बँकेचा किमान सहा महिने नियमित ग्राहक असावा.

(क) निर्यातदाराचे त्या एडी वर्ग-१ बँकांमधील खाते, रिझर्व बँकेने दिलेल्या केवायसी / एएमएल मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन असेल.

(ड) एडी वर्ग-१ बँकेचे त्या व्यवहाराच्या खरेपणाबाबत समाधान झाले असले

ह्याबाबत काही शंका निर्माण झाल्यास, एडी वर्ग-१ बँक, एफआययु आयएनडी कडे (फायनान्शीयल इंटेलिजन्स युनिट इन इंडिया) संशयास्पद व्यवहार अहवाल (एसटीआर) दाखल करण्याचा विचार करु शकते.

**ब.१५ सॉफ्टवेअरच्या निर्यातीचे बीजक तयार करणे**

(१) पारेषणांच्या मालिका समाविष्ट असलेल्या दीर्घकालीन करारांसाठी, निर्यातदाराने त्याच्या समुद्रपार ग्राहकाला नियतकालाने म्हणजेच महिन्यातून किमान एकदा किंवा समुद्रपार ग्राहकाबरोबर केलेल्या कंत्राटीतूल तरतूदीप्रमाणे 'मैलाचा दगड' गाठल्यावर बिल द्यावे आणि शेवटचे बीजक/बिल कंत्राट पूर्ण केल्याच्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा उशिरा काढू नये. विशिष्ट समुद्रपार ग्राहकावर काढलेल्या सगळ्या बीजकांचे, महिन्याभरात प्राप्त झालेल्या आगाऊ वित्तप्रेषणासहित, एकत्रित सॉफ्टेक्स प्रपत्रे सादर करणे निर्यातदारासाठी योग्य ठरेल.

(२) ‘केवळ वन शॉट’ प्रचालन समाविष्ट असलेल्या कंत्राटांची बीजके/बिले पारेषणाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत काढावीत.

(३) निर्यातदाराने वर दर्शविल्याप्रमाणे बीजकाच्या तारखेपासून/महिन्यात काढलेल्या शेवटच्या बीजकाच्या तारखेपासून ३० दिवसांपेक्षा उशिरा नाही अशा प्रकारे एसटीपीआय/इपीझेड/एफटीझेड/एसइझेड येथील भारत सरकारच्या संबंधित अधिकाऱ्याकडे कॉंप्यूटर सॉफ्टवेअर आणि ऑडिओ/व्हिडीओ/टेलिव्हीजन सॉफ्टवेअर यांच्या संबधातील सॉफ्टेक्स प्रपत्रातील घोषणापत्र मूल्यांकनासाठी/प्रमाणीकरणासाठी तीन प्रतीत सादर करावे. नियुक्त अधिकारी त्यांच्याकडे नोंदणी असलेल्या इओयूजची सॉफ्टेक्स प्रपत्रेसुद्धा प्रमाणित करू शकतात.

(४) उक्त (१) आणि (२) वर समुद्रपार ग्राहकावर काढलेली बीजके सॉफ्टेक्स प्रपत्रावर घोषित केलेल्या निर्यातीच्या भारत सरकारच्या संबंधित नियुक्त अधिकाऱ्याद्वारे केलेल्या मूल्यांकनाच्या आणि आवश्यक असल्यास, त्यानंतर बीजक मूल्यात केलेल्या सुधारणेच्या अधीन असतील.

## ब.१६ थांबवलेले आऊट नौप्रेष आणि अपूर्ण नौप्रेष

(१) कस्टम्सकडे आधीच दाखल केलेल्या जीआरमध्ये समाविष्ट असलेले नौप्रेष जेव्हा अपूर्ण केले जात, तेव्हा निर्यातदाराने विहीत केलेल्या प्रपत्रात आणि पद्धतीने अपूर्ण नौप्रेषाची सूचना कस्टम्सला दिली पाहिजे. कस्टम्सकडून अपूर्ण नौप्रेषाची प्रमाणित सूचना मिळण्यातील दिरंगाईच्या बाबतीत, निर्यातदाराने एडी बँकेला त्याने कस्टम्सकडे अपूर्ण नौप्रेषाची सूचना दाखल केली आहे आणि ती प्राप्त होताक्षणी ती तो सादर करी अशा अर्थाचे वचनपत्र द्यावे.

(२) जेथे नौप्रेष पूर्णपणे थांबवण्यात आले आहे आणि पुन्हा नौप्रेषाची व्यवस्था करण्यात उशीर होत आहे, निर्यातदार विहीत केलेल्या प्रपत्रात आणि पद्धतीने त्याच्या बरोबर न वापरलेल्या जीआर प्रपत्राची दुसरी प्रत आणि नौप्रेष बिल जोडून कस्टम्सला दोन प्रतीत सूचना देईल.कस्टम्स पडताळणी करील कि नौप्रष प्रत्यक्षात थांबवण्यात आले आहे, सूचनेची प्रत बरोबर म्हणून प्रमाणित करील आणि न वापरलेल्या जीआर प्रपत्राच्या दुसऱ्या प्रतीसह रिझर्व्ह बँकेकडे पाठवील. या बाबतीत, कस्टम्सकडून पूर्वी प्राप्त झालेले जीआर प्रपत्र रद्द करण्यात येईल. त्यानंतर नौप्रेष करण्यात आले तर जीआर प्रपत्रांचा नवीन संच पूर्ण करावा.

## ब.१७ प्रति-व्यापार करार

भारतीय पार्टी आणि समुद्रपार पार्टी यांच्या दरम्यान भारतात यूएस डॉलरमध्ये उघडलेल्या एस्क्रो खात्यातून, भारतातून निर्यातकेलेल्या मालासमक्ष भारतात आयात केलेल्या मालाचे मूल्य समायोजित करण्यासाठी स्वेच्छेने केलेल्या व्यवस्थेचा समावेश असलेल्या प्रस्तावांचा रिझर्व्ह बँक विचार करील.

(१) व्यवस्थेखालील सर्व आयात आणि निर्यात विदेश व्यापार धोरण आणि विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ नुसार आणि त्याखाली केलेल्या नियम आणि नियमनांनुसार आंतरराष्ट्रीय किंमतीला असावी.

(२) एस्क्रो खाते उघडण्याच्या परवानगीसाठी समुद्रपार निर्यातादराला/संघटनेला त्याच्या एडी बँकेमार्फत रिझर्व्ह बँकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाकडे अर्ज करता येईल. एस्क्रो खात्यात असलेल्या शिलकीवर कोणतेही व्याज देय नसेल, परंतु तात्पुरता अधिकांश निधी एका वर्षात(म्हणजेच १२ महिन्यांच्या एका गटात) एकूण तीन महिन्याच्या कालावधीसाठी अल्पमुदत ठेवीत धारण करता येईल आणि बँका लागू असलेल्या दराने व्याज देतील.३ एस्क्रो खात्यात असलेल्या शिलकीसमक्ष कोणतीही निधी-आधारित /ना-निधी-आधारित सुविधा अनुज्ञेय असणार नाही.

(४) विदेशी निर्यातदार / संस्था ह्यांना, त्यांच्या एडी वर्ग -१ बँकेमार्फत, च्या रिझर्व बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडे एस्क्रो खाते उघडण्याच्या परवानगीसाठी अर्ज करता येईल.

## ब.१८ भाडेपट्ट्याने, भाड्याने वगैरे मालाची निर्यात

भाडेपट्ट्याचे भाडे/भाडे आकार गोळा करण्यासमक्ष समुद्रपार पट्टेदाराशी केलेल्या कराराच्या आधारावर भाडेपट्टयाने, भाड्याने वगैरे यंत्रसामग्री, उपकरणे वगैरेंची निर्यात आणि शेवटी पुनर्आयात यासाठी रिझर्व्ह बँकेच्या पूर्वनुमतिची आवश्यकता आहे. आवश्यक त्या परवानगीसाठी निर्यातदारानी, एडी बँकेमार्फत, निर्यात करायच्या मालाचा तपशील देऊन, रिझर्व्ह बँकेच्या संबधित विभागीय कार्यालयाकडे अर्ज करावा.

## ब.१९ लांबवलेल्या क्रेडीटच्या अटीवर निर्यात

लांबवलेल्या क्रेडीटच्या अटीवर मासल निर्यात करू इच्छिणारे निर्यातदार त्यांच्या बँकेमार्फत संपूर्ण तपशील देऊन त्यांचे प्रस्ताव रिझर्व्ह बँकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाला विचारार्थ सादर करू शकतात.

## ब.२० विशेष आर्थिक क्षेत्रांद्वारा(एसइझेडस्) मालाची निर्यात

एसइझेडमधील युनीटसना विदेशात जॉब वर्क हाती घेण्यास आणि त्याच देशातून निर्यात करण्यास खालील अटींच्या अधीन परवानगी आहेः

(१) निर्यातीच्या किंमतीत प्रक्रियेच्या/निर्मितीच्या खर्चाचा भार उचित प्रकारे टाकण्यात आलेला असेल आणि तो अंतिम खरेदीदाराने उचलला असेल.

(२) निर्यातदाराने सामान्य जीआर कार्यपध्दतीच्या अधीन संपूर्ण निर्यात मूल्याच्या वसूलीसाठी समाधानकारक व्यवस्था केली असेल.

एडी बँका डीटीएजमधील युनीटसना, त्यांना एसइझेडमधील युनीटसनी पुरवलेल्या मालाचे प्रदान करण्यासाठी विदेशी चलन खरेदी करण्याची परवानगी देऊ शकतात.

## ब.२१ प्रकल्प निर्यात आणि सेवा निर्यात

विदेशातील टर्नकी प्रकल्प आणि नागरी बांधकाम कंत्राटे यांची कार्यवाही आणि स्थगित प्रदानावर अभियांक्रिकी मालाची निर्यात याना एकत्रितपणे 'प्रकल्प निर्यात' असे संबोधले जाते. समुद्रपार खरेदीदारांना स्थगित प्रदान प्रस्ताव देऊ करणाऱ्या भारतीय निर्यातदारानी आणि विदेशात टर्नकी/बांधकाम कंत्राटे हाती घेण्यासाठी जागतिक निविदामध्ये सहभागी होणाऱ्यानी अशा कंत्राटांची कार्यवाही हाती घेण्यापूर्वी कंत्राट-प्राप्तीच्या पायरीवर एडी बँका/एक्झिम/कार्यकारी गटाची मंजूरी प्राप्त करणे आवश्यक आहे. 'प्रकल्प निर्यात' आणि 'सेवा निर्यात' यांच्या संबंधातील नियमने सुधारित प्रकल्प निर्यातीच्या नियमावलीत (पीइएम-ऑक्टोबर २००३ वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे)ठरवून दिलेली आहेत.

प्रकल्प निर्यातदार व सेवा निर्यातदारांना त्यांचे विदेशातील व्यवहार करताना आधिक लवचिकता उपलब्ध करुन देण्यासाठी, पीईएमच्या परिच्छेद ब.१० (१) (फ), क.१(२), ड.३, आणि ड.४ मधील मार्गदर्शन तत्वे खाली दिल्याप्रमाणे सुधारित करण्यात आलि आहेत. (ब.१०(१)(फ) व ड ४ (४))मध्ये दिल्यानुसार, प्रकल्प/सेवा निर्यातदारांना तात्पुरता कॅश बॅलन्स ठेवण्याची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे.प्रकल्प /सेवा ह्यांच्या निर्यातदारांना, खाली दिल्याप्रमाणे, तात्पुरत्या रोख शिल्लकेचा उपयोग करण्याची सुविधा देऊ करण्यात येत आहे.

१) यंत्रसामुग्रीचे आंतर - प्रकल्पिय हस्तांतरण (ब १० (१) (फ) आणि ५ ४ (४))

हस्तांतरण केलेल्या प्रकल्पापासून यंत्रसामुग्री इत्यादीचे बाजार मूल्य (बुक) व्हॅल्यूपेक्षा कमी नसलेले) वसूल/परत मिळवण्याबाबतची वैधानिक अट काढून टाकण्यात आली आहे. ह्याशिवाय, ह्या यंत्रसामुग्री / साधने ह्यांचा उपयोग ते निर्यातदार त्यांनी कोणत्याही देशामध्ये मिळविलेल्या अन्य कंत्राटासाठी करु शकतात. मात्र त्यासाठी, प्रायोजक

एडी वर्ग - १ बँक/ एक्झिम बँक/ कार्यकारी गट ह्यांचे त्याबाबत समाधान झाले असले पाहिजे तसेच कळविण्याचा / अहवाल पाठविण्याच्या आवश्यकतांचे पालन केले पाहिजे व त्यावर एडी वर्ग - १ बँक / बँका एक्झिम बँक / कार्यकारी गट ह्यांची देखरेख असेल.

(२) निधीचे आंतर - प्रकल्पीय हस्तांतरण (ड १(१) व ड ३)

एडी वर्ग १ बँक (बँका/ एक्झिम बँक / कार्यकारी गट, निर्यातदारांना, कोणत्याही चलनात किंवा देशात निधीच्या आंतर - प्रकल्पीय हस्तांतरणसह, त्यांच्या पसंतीच्या चलनामध्ये एक किंवा अधिक विदेशी मुद्रा खाते चालविण्याची परवानगी देऊ शकतात. आंतर - प्रकल्पीय निधी हस्तांतरण, एडी वर्ग - १ बँक (बँका) / एक्झिम बँक / कार्यकारी गट ह्यांची देखरेख असेल.

(३) तात्पुरत्या अधिकतर रोकड रकमेचा उपयोग

प्रकल्प / सेवा निर्यातदार त्यांनी भारताबाहेर मिळविलेली अधिकतर रोख रक्कम पुढील संलेख / उत्पादांसाठी वापरु शकतात. मात्र त्यावर एडी वर्ग - १ बँक (बँका) / एक्झिम बँक / कार्यकारी गट ह्यांची देखरेख असेल.

(अ) एक वर्ष किंवा त्यापेक्षा कमी परिपक्वता किंवा शेष परिपक्वता असलेले किंवा मूडीव्दारा किमान ए - १/ एएए दर्जा असलेले किंवा मूडीव्दारा पी -१ / एएए दर्जा किंवा आयबीसीएइत्यादी व्दारा एफ - १ एएए दर्जा असलेले नाणेविषयक संलेख.

(ब) भारतामधील एडी वर्ग - १ बँकांच्या भरताबाहेरील शाखा / उपकंपन्यामधील ठेवी.

(४) ऑन साईट सॉफ्टवेअर काँट्रक्ट्सच्याबाबत निधीचे प्रत्यावर्तन

सॉफ्टवेअर निर्यात करणाऱ्या कंपनी / संस्थेव्दारा ऑन - साईट कॉंट्रक्ट्सच्याबाबत, कंत्राट मूल्याचा ३० टक्के रकमेचे प्रत्यावर्तन करण्याची आवश्यकता काढून टाकण्यात आली आहे. तथापि यांनी अशा ऑनसाईट कॉंट्रेक्टचा नफा, ते कंत्राट संपल्यावर प्रत्यावर्तित करावा.

**ब.२२ चलनाची निर्यात**

वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे अधिसूचना क्र. एफइएमए ६/आरबी-२००० दिनांक ३ मे २००० अन्वये अधिसूचित केलेल्या विदेशी विनिमय व्यवस्थापन (चलनाची आयात आणि निर्यात) नियमने २००० नुसार, नियमानांच्या अधीन मंजूर केलेल्या कोणत्याहि सर्वसाधारण परवानगीअधीन परवानगी दिलेल्या मर्यादेपर्यंतच्या व्यतिरिक्त रु. ७५००/- च्या वरील मूल्याच्या भारतीय चलनाच्या कोणत्याहि निर्यातीसाठी रिझर्व बँकेची पूर्वानुमति आवश्यक असेल.

**ब.२३ जप्त करणे**

निर्यात प्राप्त्यांना वित्तपुरवठा करण्यासाठी एक्स्पोर्ट-इंम्पोर्ट बँक इंडिया (एक्झिम बँक) आणि एडी बँकाना जप्तत करणे हाती घेण्याची परवानगी देण्यात आली आहे. एक्झिम बँकेने/संबंधित एडी बँकेने मंजूर केल्याप्रमाणे निर्यातदाराला देय असलेल्या बांधीलकी शुल्क/सेवा आकार वगैरेंचे वित्तप्रेषण एखाद्या एडी बँकेमार्फत केले जाऊ शकते. अशी वित्तप्रेषणे संबंधित प्राधिकाऱ्यानी मंजूर केल्याप्रमाणे आक रकमी आगाऊ किंवा मासिक अंतराने करता येतील.

**ब.२४ रस्ता, रेल किंवा नदीमार्गे शेजारच्या देशांना निर्यातः**

जेथे शेजारच्या देशाना रस्ता, रेल किंवा नदीतील वाहतूकीच्या मार्गाने निर्यात केली जात असेल तेथे जीआर/एसडीएफ प्रपत्रांच्या मूळ प्रती दाखल करण्यासाठी निर्यातदारानी पुढील कार्यपध्दती स्वीकारावीः

अ. पडाव/देशी होडी/रस्ता वाहतूक., याद्वारे निर्यातीच्या बाबतीत, निर्यातदाराने किंवा त्यांच्या एजन्टने विदेशात पार होण्यापूर्वी ज्या सीमेतून जहाज किंवा वाहनाला जावे लागेल त्या ठिकाणी कस्टम्सला प्रपत्रे द्यावीत. या हेत्वर्थ, निर्यातदार जहाजाच्या किंवा वाहनाच्या प्रभारी व्यक्तिकडे प्रपत्र सुपूर्द करण्याची व्यवस्था करील किंवा त्याच्या सीमेवरील एजन्टकडे कस्टम्सला सादर करण्यासाठी पाठवून देईल.

ब. रेलद्वारा निर्यातीच्या बाबतीत, काही ठराविक रेल्वे स्थानकांवर कस्टम्सच्या औपचारिकता पूर्ण करण्यासाठी कस्टम कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते या स्थानकांवर भरलेल्या मालासाठी जीआर/एसडीएफ प्रपत्रे जमा करतील जेणेकरून सीमेवर कोणत्याही अधिक औपचारिकतांविना माल थेट विदेशात रवाना होईल. या ठराविक स्थानकांव्यतिरिक्त अन्य स्थानकांवर भरलेल्या मालासाठी, निर्यातदाराने, जेथे कस्टम्स औपचारिकता पूर्ण केल्या जातात अशा सीमा क्षेत्र कस्टम्स स्थानकावरील कस्टम आधिकाऱ्याकडे जीआर/एसडीएफ प्रपत्रे सादर करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

### ब.२५ म्यानमारशी सीमाव्यापार

हा भारत आणि म्यानमारमधील सीमाव्यापारावरील कराराने शासित आहे. भारत-म्यानमार सीमेच्या दोन्ही बाजूंना राहणाऱ्या लोकांना देवाण-घेवाण व्यापारी व्यवस्थेअधीन काही स्थानिक स्तरावर विनिर्दिष्टीत वस्तूंची देवाण घेवाण करण्याची परवानगी आहे. ते परिवर्तनीय चलनात सुध्दा मुक्तपणे व्यापार करू शकतात. एडी बँकानी एपी.डीआयआर (मालिका) परिपत्रक क्र. १७ दिनांक ऑक्टोबर १६, २००० मध्ये घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे.

### ब.२६ स्टेट क्रेडीटची परतफेड

पूर्वाश्रमींच्या यूएसएसआरने मंजूर केलेल्या स्टेट क्रेडीटच्या परतफेडीसमक्ष मालाची आणि सेवांची निर्यात वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे रिझर्व बँकेने निर्गमित केलेल्या अस्तित्वातील आदेशाप्रमाणे चालूच राहतील. त्याशिवाय, संबंधित पार्ट्यांनी स्वेच्छेने केलेल्या करारानुसार भारतात केलेल्या आयातीच्या मूल्यासमक्ष भारतातून केलेल्या निर्यातीचे मूल्य समायोजित करण्याचा समावेश असलेल्या रोमानिया बरोबरच्या प्रतिव्यापाराचे भारतीय निर्यातदारांचे प्रस्ताव रिझर्व्ह बँक, इतर बाबींबरोबरच, भारतीय निर्यातदाराने उघडण्यात येणाऱ्या एक्स्रा खात्यात जमा झाल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत रोमानियातून भारतात आयातीसाठी निधीचा विनियोग करण्याच्या अटीच्या अधीन विचारात घेईल. गतकालीन युएसएसआरने दिलेल्या राज्य कर्जांच्या प्रदानाविरुध्द माल व सेवांची निर्यात ही, रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसारच नियंत्रित होत राहील.

### ब.२७ रोमानियाबरोबर प्रति-व्यापार व्यवस्था

संबंधित पक्षांमधील स्वेच्छेने स्वीकारलेल्या अटींनुसार, भारतात केलेल्या आयातींच्या मुल्यांच्या विरुध्द, भारतामधुन केलेल्या निर्यातदारांचे प्रति-व्यापार प्रस्ताव विचारात घेईल. मात्र त्यासाठी, इतर बाबींसह, भारतीय निर्यातदाराने एस्क्रौ अकाउंटमध्ये रक्कम जमा सहा महिन्यांच्या आत, तो निधी रोमानियामधुन भारतात आयात करण्यासाठी वापरला पाहिजे.

**खंड ३**

## क - एडी वर्ग १ बँका बँकांसाठी प्रचालनीय मार्गदर्शक तत्त्वे

### क.१ विशिष्ट ओळख क्रमांक देणे

(१) रिझर्व बँकेकडे केलेल्या सर्व अर्जात/पत्रव्यवहारात, जीआर, पीपी, आणि सॉफ्टेक्स प्रपत्रात उपलब्ध असलेला विशिष्ट ओळख क्रमांक न चुकता द्यावा. एसडीएफ प्रपत्रावर केलेल्या घोषणेचे प्रकरण, बंदर संकेतांक आणि नौप्रेष बिल क्र. द्यावा.

(२) एसडीएफ फॉर्मवर केलेल्या घोषणापत्राच्या बाबतीत पोर्ट कोड नंबर व शिपिंग बिल नंबर दिला जावा

### क.२ जीआर/एसडीएफ/पीपी/सॉफ्टेक्स कार्यपद्धती

अधिसूचना क्र. एफइएमए.२३/२०००-आरबी दिनांक ३ मे २००० अन्वये अधिसूचित केलेल्या आणि वेळावेळी दुरुस्त केल्याप्रमाणे विदेशी विनिमय व्यवस्थापन (मालाची आणि सेवेची निर्यात) नियमाने २००० नुसार निर्यात घोषणापत्रांची विल्हेवाट खालीलप्रमाणे लावावीः

### क.३ जीआर प्रपत्रे

(१) निर्यातदाराने जीआर प्रपत्रे दोन प्रतीत पूर्ण करावीत आणि दोन्ही प्रती नौप्रेषाच्या बिलासमवेत नौप्रेषाच्या बंदरावर कस्टम्सला सादर कराव्यात.

(२) तदनुरुप नोप्रेष बिल स्वीकारल्यानंतर कस्टम्स दोन्ही प्रतींवर धावता अनुक्रमांक देईल. कस्ट्म्सचा अनुक्रमांकात नौप्रेषाच्या बंदराचा संकेतांक, दिनदर्शिका वर्ष आणि ६-अंकी धावता अनपुक्रमांक दर्शविणारे दहा अंक असतील.

(३) निर्यातदाराने जीआरच्या दोन्ही प्रतींवर घोषित केलेले मूल्य कस्ट्म्स त्यासाठी असलेल्या जागेत प्रमाणित करील आणि निर्धारित मूल्याचीहि नोंद करील.

(४) प्रपत्राची दुसरी प्रत ते निर्यातदाराला परत देतील आणि मूळ प्रत रिझर्व्ह बँकेला पारेषित करण्यासाठी ठेवून घेतील.

(५) निर्यातदाराने नौप्रेष करायच्या मालाबरोबर जीआर प्रपत्राची दुसरी प्रत कस्टम्सला परत सादर करावी.

(६) मालाची पाहणी केल्यानंतर आणि दुसऱ्या प्रतीवर मंजूर केलेली राशी प्रमाणित करून कस्ट्म्स ती निर्यातदाराला वाटाघाटी करण्यासाठी एडी बँकेला सादर करण्यासाठी किंवा निर्यात बिलांच्या वसूलीसाठी परत देतील.

(७) निर्यातीच्या तारखेपासून एकवीस दिवसांच्या आत, निर्यातदाराने संबंधित नौप्रेष कागदपत्रांसमवेत दुसरी प्रत आणि बीजकाची अतिरिक्त प्रत जीआर प्रपत्रात नमूद केलेल्या एडी बँकेकडे जमा करावी.

(८) कागदपत्रांच्या वाटाघाटी केल्यानंतर/वसूलीला पाठविल्यानंतर, एडी बँकेने उचित आर-सप्लीमेंटरी विवरणपत्राखाली इएनसी विवरणपत्रात व्यवहार रिझर्व्ह बँकेला कळवावा.

(९) बीजकाच्या प्रतीसह दुसरी प्रत एडी बँकेने ठेवून घ्यावी आणि रिझर्व बँकेला सादर करू नये.

(१०) स्थगित प्रदान व्यवस्थेच्या अधीन किंवा समभागतील सहभागासमक्ष विदेशातील संयुक्त साहसाना किंवा रुपया क्रेडीट व्यवस्थेअधीन केलेल्या निर्यातीच्या बाबतीत, रिझर्व बँकेच्या मंजूरीचा क्रमांक आणि तारीख

आणि/किंवा संबंधित आरबीआय परिपत्रकाची तारीख आणि क्रमांक जीआर प्रपत्रावर योग्य ठिकाणी नमूद करावा.

(११) जेथे जीआर प्रपत्राची दुसरी प्रत हरवली असेल किंवा गहाळ झाली असेल, एडी बँका कस्टम्सने उचित प्कारे प्रमाणित केलेली जीआर प्रपत्राची दुसरी प्रत स्वीकारू शकतील.

सुचनाः सध्या निर्यातदार जीआर फॉर्म्स, (प्रत्यक्ष स्वरुपातील सॉफ्टवेअरच्या निर्यातीसह म्हणजे, मॅग्नेटिक टेप्स/डिस्कस व पेपर मिडिया) पोस्टाने सोडल्यास अन्य रीतीच्या निर्यातीसाठी दिन प्रतींमध्ये संपूर्ण भरावयाचे) रिझर्व बँकेच्या प्रादेशिक कार्यालयांमधुन मिळ्वू शकतात. कार्यरीती सुलभ करण्याचा एक भाग म्हणुन आता हे जीआर फॉर्म्स रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही (www.rbi.org.in) ऑनलाईन उपलब्ध करण्यात आले आहेत.
(लिंक- नोटिफिकेशन ▫ फेम ▫ फॉर्म्स ▫ जीआर फॉर्म्स प्रिंट करण्यासाठी)

त्यानुसार निर्यातदारांना आता ऑनलाईन जीआर फॉर्म्स वापर्ण्याचा पर्यायही उपलब्ध आहे.

**क.४ एसडीएफ**

एसडीएफच्या बाबतीत खालील कार्यपध्दतीचे अनुसरण करता येईल.

(१) एसडीएफ दोन प्रतीत (संबंधित नौप्रेष बिलाला जोडून) संबंधित कस्टम्स आयुक्तांना सादर करावी.

(२) पडताळणीनंतर आणि एसडीएफमधील घोषणापत्राचे अधिप्रमाणन केल्यानंतर, कस्टम्स आयुक्त निर्यातदाराला, निर्यातीच्या तारखेपासून २१ दिवसांच्या आत एडी बँकेला सादर करण्यासाठी ज्यात प्रपत्र एसडीएफ जोडलेले आहे त्या ‘विनिमय नियंत्रण प्रत’ चिन्हांकित केलेली नोप्रेष बिलाची दुसरी एक प्रत सुपूर्द करतील.

(३) एडी बँकानी निर्यातदाराने नौप्रेष बिलाच्या वसूलीसाठी/वाटाघाटीसाठी सादर केलेली नौप्रेष बिल आणि एसडीएफ प्रपत्र जोडलेली विनयम नियंत्रण(इसी) प्रत स्वीकारावी.

(४) शिपिंग बिलाच्या ईसी कॉपीची (व त्याला जोडलेला फॉर्म एसडीएफ)वासलात लावण्याची रीत जीआर फॉर्म्स प्रमाणेच आहे. त्या फॉर्मची दुसरी प्रत व इनव्हॉईस इत्यादींची प्रत, एडी वर्ग-१ बँकेकडुन स्वतःकडे ठेवण्यात येईल व ती रिझर्व बँकेकडे पाठविली जाईल असे नाही.

ईसीजीसी व इन्शुअरन्स रेग्युलेटरी ऑथोरिटी (आयआरडीए) द्वारा विनियमित केलेल्या विमा कंपन्यांद्वारे जेथे त्यांच्याकडे विमा उतरविणाऱ्या निर्यातदारांच्या निर्यातीसंबंधाने असलेल्या दाव्यांची/हक्कांची तडजोड केली जाते व नंतर त्यांच्या प्रयत्नांमुळे खरेदीदार/खरेदीदाराचा देय ह्यांच्याकडून निर्यातीची रक्कम मिळविली जाते, तेथे, अशा मिळालेल्या रकमेचा निर्यातदारांचा हिस्सा, शिपिंगचे कागदपत्र हाताळणाऱ्या बँकेद्वारा दिला जातो. अशा बाबतीत, ईसीजीसी व आयआरडीएद्वारा विनियमित केलेल्या खाजगी विमा कंपन्या, निर्यातीची संपूर्ण रक्कम मिळाल्यावर, शिपिंगचे कागदपत्र हाताळणाऱ्या संबंधित बँकेला एक प्रमाणपत्र देतील. ह्या प्रमाणपत्रात, घोषणापत्राच्या फॉर्मचा क्रमांक, निर्यातदाराचे नाव, एडी वर्ग - १ बँकेचे नाव, निगोशिएशनची तारीख, देयक क्रमांक, इनवॉईसचे मूल्य, आणि ईसीजीसी व आयआरडीएद्वारा नियंत्रित खाजगी विमा कंपन्यांना प्रत्यक्ष मिळालेली रक्कम निर्देशित केली जाईल

**क.५ - पीपी फॉर्म्स**

पीपी फॉर्म्स विनियोग (डिसपोजल) करावयाची रीत जीआर फॉर्म्स प्रमाणेच आहे. फॉर्मची मुळ (ओरिजिनल) प्रत एखाद्या एडी वर्ग-१ बँकेने काउंटर-साईन केली असल्यासच पोस्टाचे प्राधिकरण पोस्टाने माल निर्यात

करण्यास परवानगी देतील. ह्यासाठी निर्यातदाराने पीपी फॉर्म्स आधी एडी वर्ग-१ बँकेकडे काउंटर सही करण्यासाठी पाठवावेत.

(१) ते पार्सल, आयात करण्याऱ्या देशातील तिच्या शाखेच्या कॉरेस्पॉडंट बँकेच्या पत्त्यावर पाठविण्यात येत आहे ह्याची खात्री करुन घेतल्यावरच एडी वर्ग-१ बँके त्या फॉर्म्सवर काउंटर करील. आणि मूळ प्रत निर्यातदाराला परत करील व त्याने तो फॉर्म पार्सलसह पोस्ट ऑफिसात सादर करावा.

(२) पीपी फॉर्मची दुसरी प्रत, निर्यातदाराने, विहित केलेल्या २१ दिवसांच्या आत, संबंधित कागदपत्र, निगोशिएशन/कलेक्शन साठी इनव्हाईसची अतिरिक्त प्रत ज्या बँकेला सादर करावयाची असतात ती एडी बँके स्वतःकडे ठेवुन घेईल.

(३) विदेशातील संबंधित शाखेला किंवा कॉरेस्पॉडंट बँकेला सुचना दिल्या जाव्यात की संबंधित बिलाची रक्कम प्रदान केल्यावर ते पार्सल अडत्याकडे पाठविण्यात यावे.

(४) तथापि, एडी वर्ग-१ बँका थेट अडत्याकडे पाठविण्याच्या पार्सलांबाबत पीपी फॉर्म्सवर काउंटरसही करु शकतात- मात्र त्यासाठी-

(अ) निर्यातीच्या संपुर्ण मुल्याएवढ्या रकमेचे रद्द न करता येणारे पतपत्र निर्यायदाराच्या नावे उघडले गेले असावे व त्याबाबत संबंधित एडी वर्ग-१ बँकेमार्फत कळविले गेले असावे.

किंवा

(ब) त्या शिपमेंटचे संपुर्ण मुल्य एडी वर्ग-१ बँके मार्फत त्या निर्यातदाराला अग्रिम मिळाले असावे

किंवा

(क) निर्यातदाराची पत, त्याची पुर्व कामगिरी व निर्यात उत्पन्नाच्या वसुलीसाठी त्याने केलेल्या व्यावस्था ह्यांच्या आधारावर तो तसे कर शकेल ह्याबाबत एडी वर्ग-१ बँकेचे समाधान झाले असावे.

अशा बाबतीत, आग्रिम प्रदान/पतपत्र/ एडी वर्ग-१ बँकेने निर्यातदाराच्या पतसंबंधित प्रमाणपत्र इत्यादींचा तपशील योग्य त्या साक्षांकनासह त्या फॉर्म्सवर नमुद करण्यात यावा.

(५) पीपी फॉर्मवर अडत्याचे नाव व पत्त्यामध्ये बदल झालेला असल्यास, तो बदल, एडी वर्ग-१ बँकेने तिच्या सही शिक्क्यासह साक्षांकित करावा.

### क.६ यादृच्छिक पडताळणी

उक्त सर्व कार्यपध्दतीत, एडी बँकानी, त्यांच्या अंतर्गत/समवर्ती लेखापरिक्षकांद्वारे संबंधित प्रपत्राच्या दुसऱ्या प्रती यादृच्छया तपासून खात्री करावी कि, कोणतीही न झालेली किंवा कमी झालेली वसूली अनुज्ञेय केली असल्यास, ती त्याना प्रत्यायुक्त केलेल्या अधिकाराच्या मर्यादेत आहे किंवा जेव्हा केव्हा आवश्यक असेल तेव्हा रिझर्व बँकेने योग्य प्रकारे मंजूर केलेली आहे.

### क.७ इइएफसी क्रेडीटसाठी प्रमाणीकरण

जेथे निर्यातीच्या उत्पन्नाचा काही भाग इइएफसी खात्यात जमा केला जातो, निर्यातीचे घोषणापत्र (दुसरी प्रत) खालीलप्रमाणे प्रमाणित करता येईलः

“निर्यातीच्या वसूलीचे ..........टक्के प्रतिनिधीत्व करणारे .........रकमेचे उत्पन्न निर्यातदाराने ...........मध्ये ठेवलेल्या इइएफसी कात्यात जमा करण्यात आले आहे.”

### क.८ एअर कार्गो एकत्रित करणे / समुद्र कार्गो

(अ) एअर कार्गो एकत्रित करणे

(१) जेथे एअर कार्गो एकत्रितपणे नौप्रेष केला, एअरलाइन कंपनीचे मास्टर्स एअरवे बिल कन्सॉलिडेटिंग कार्गो एजन्टला निर्गमित केले जाईल. कार्गो एजन्ट नंतर त्याचे स्वतःचे हाऊस एअरवे बिल (एचएडब्ल्यूबीज) प्रत्येक नौप्रेषकाला निर्गमित करील.

(२) संबंधित पतपत्रात जर एअरलाइन कंपनीने निर्गमित केलेल्या बिलांच्या बदल्यात या कागदपत्रांच्या वाटाघाटींची तरतूद असेल तरच एडी बँका एचएडब्ल्यूबीजच्या वाटाघाटी करतील.

(ब) समुद्र कार्गो एकत्रित करणे

(१) पतपत्राने समर्थित निर्यात व्यवहाराच्या नौप्रेष कागदपत्रांच्या वाटाघाटी/वसूलीसाठी बिल्स ऑफ लेडिंगच्या बदल्यात, जहाज कंपन्यानी किंवा त्यांच्या एजन्टसनी(आयएटीए मान्यताप्राप्त एजन्टऐवजी) निर्गमित केलेल्या फॉरवर्डर्स कार्गो रीसीट(एफसीआऱ)सुद्धा त्या स्वीकारू शकतील, पण जर पतपत्रात बिल्स ऑफ लेडिंगच्या बदल्यातया कागदपत्रांच्या वाटाघाटींसाठी तरतूद असेल तरच.

(२) त्याशिवाय, समुद्रपार खरेदीदाराबरोबरच्या संबंधित विक्रीच्या करारातसुद्धा नौप्रेष कागदपत्र म्हणून बिल ऑफ लेडिंगच्या बदल्यात एफसीआर स्वीकारण्याची तरतूद असावी.

### क.९ निर्यातदारांकडून नौप्रेष कागदपत्र सादर करण्यातील दिरंगाई

ज्या प्रकरणात, निर्यातदार निर्यातीच्या तारखेपासून विहीत एकवीस दिवसांच्या कालावधीनंतर निर्यातीच्या संबधातील कागदपत्रे हजर करतात, एडी वर्ग - १, बँका रिझर्व बँकेच्या पूर्वानुमतिविना ती हाताळू शकतात, जर दिरंगाईच्या कारणांबाबत त्यांचे समाधान झाले असेल.

### क.१० प्रपत्रांच्या छाननीसाठी तपासणी-सूची

एडी बँकांद्वारे

(१) त्याना सादर केलेल्या जीआर प्रपत्राच्या प्रतीवरील क्रमांक साधारणपणे बिल ऑफ लेडिंग/नौप्रेष बिलावर नोंदण्यात येणाऱ्या मूळप्रमाणेच आहे आणि दुसरी प्रत कस्टम्स अधिकाऱ्यानी उचित प्रकारे पडताळली आहे आणि अधिप्रमाणित केली आहे.

(२) एसडीएफवरील नौप्रेष बिल क्रमांक बिल ऑफ लेडिंगवर असल्याप्रमाणेच असावा.

(३) सी.आय.एफ. आणि सी. अँड एफ. कंत्राटांच्या वगैरे बाबतीत, जेथे फ्रेट पोचण्याच्या ठिकाणी प्रदान करण्याची अपेक्षा असते, केलेली वजावट जीआर/एसडीएफ प्रपत्रावर घोषित केलेल्या फ्रेटइतकीच किंवा बिल ऑफ लेडिंग/एअरवे बिलावर दर्शविलेल्या प्रत्याक्ष फ्रेटच्या रकमेइतकी, यापैकी जी कमी असेल, तेवढीच आहे.

(४) सादर केलेल्या कागदपत्रात निर्यात मालाच्या वर्णनात, निर्यातीच्या मूल्यात किंवा पोचविण्याच्या देशाच्या वर्णनात काही म्हणण्यासारखी विसंगति दिसून येत नाही.

(५) खरेदीदाराच्या वतीने जेथे निर्यातदाराने सागरी विमा घेतला आहे, तेथे प्रत्यक्ष प्रदान केलेली रक्कम बीजक आणि बिलामार्फत खरेदीदाराकडून प्राप्त झाली आहे.

(६) जेथे विक्रीचा करार एफ.ओ.बी., एफ.ए.एस तत्त्वावर आहे तेथे फ्रेटची रक्कम बीजक आणि बिलात समाविष्ट केली असेल तर 'फ्रेट प्रीपेड' तत्त्वावर निर्गमित केलेली बिल ऑफ लेडिंग/एअरवे बिले स्वीकारणे.

(७) संबधित निर्यात मालप्रेषासाठी जीआर/पीपी/एसडीएफ/सॉफ्टेक्स प्रपत्रावर निर्यातदाराव्यातिरिक्त अन्य व्यक्तिद्वारा कागदपत्रांच्या वाटाघाटी केस्या जात असतील तर, दिेशी विनिमय व्यवस्थापन (मालाची आणि सेवांची निर्यात) नियमने २००० च्या नियमन १२ च्या पूर्ततेची खात्री करून घेतल्यानंतर, कागदपत्रांच्या वाटाघाटी करणे.

(८) कस्टम्स अधिकाऱ्यांकडे घोषित केलेल्या मूल्यातील बदल स्वीकारणे आणि हिशोवाची अंकगणितीय अचूकता पडताळल्यानंतर आणि त्याखालील कराराशी अनुरुपता निश्चीत केल्यानंतर कागदोपत्री पुरावा हजर केल्यावर, कराराच्या अटीतून उद्‌भवणाऱ्या निर्यात कागदपत्रामध्ये ते प्रतिबिंबीत होतील. अशा काही घटना (जेथे कस्टम्सकडे घोषित केलेले आणि कादपत्रात दर्शविलेले मूल्य यात अंतर आहे) येछे खाली नमूद केल्या आहेतः

ए) सी.आय.एफ किंवा सी.अँड एफ. करारात जेथे करार पूर्ण झाल्यानंतर होणारी फ्रेटमधील कोणतीहि वाढ अंशतः किंवा संपूर्णपणे खरेदीदाराने उचलण्याचे मान्य केले जाते किंवा कराराच्या चलनाच्या नंतर होणाऱ्या अवमूल्यनाच्या परिणामी, खरेदीदाराने किंमतीत वाढ करण्याचे मान्य केलेले असते अशा काही प्रसंगात, कस्टम्सकडे जीआर/एसडीएफ प्रपत्रात मुळात घोषित केलेल्या/कस्टम्सने मान्य केलेल्यापेक्षा निर्यातीचे मूल्य अधिक असू शकते.

बी) निर्यात व्यापाराच्या काही पद्धतीत, किंमतीची अंतिम तडजोड नौप्रेषाच्या वेळी काढलेल्या नमुन्यांच्या विश्लेषणावर अवलंबून असू शकते, पण अशा विश्लेषणांचे निष्कर्ष नौप्रेष केल्यानंतरच उपलब्ध होतात. काही वेळा, करारात संबंधित वस्तूच्या बाबतीतील व्यापारी पद्धतीला अनुसरून मालाच्या उशिरा नौप्रेषासाठी दंडाच्या प्रदानाची तरतूद असते. या प्रकरणात, निर्यातदार करारातील किंमतीच्या आधारावर निर्यातीचे पूर्ण मूल्य कस्टम्सला घोषित करतो तर, वाटाघाटी/वसूली करण्यासाठी सादर केलेली नौप्रेष कागदपत्रे, नमुन्यांच्या विश्लेषणांचे परिणाम किंवा उशिरा नौप्रेषासाठी दंड. जसे प्रकरण असेल तसे, विचारात घेतल्यानंतर काढलेले वेगळे मूल्य प्रतिबिंबीत करतात.

सी) निर्यातदाराने संबधित जीआर/एसडीएफ प्रपत्रावर नौप्रेषाच्या वेळीच सवलत घोषित केलेला असेल आणि कस्टम्सने तो मान्य केला असेल तरच, व्यापाराखाती जीआर/एसडीएफ प्रपत्रात घोषित केलेल्या मूल्यापेक्षा कमी मूल्य, समुद्रमार्गे किंवा हवाईमार्गे निर्यातीसाठी बिलांच्या वाटाघाटी किंवा वसूलीसाठी स्वीकारणे.

### क.११ निर्यातदारांना कागदपत्रे परत करणे

एडी बँकाना एकदा सादर केलेल्या जीआर/एसडीएफ प्रपत्रांच्या दुसऱ्या प्रती किंवा नौप्रेष कागदपत्रे साधारणपणे, चुकांची दुरुस्ती करून परत सादर करण्याव्यतिरिक्त अन्य कारणाने निर्यातदाराना परत करू नयेत.

### क.१२ बिल ऑफ लेडिंगची वाटाघाटीयोग्य प्रत मास्टर ऑफ व्हेसलला/व्यापारी प्रतिनिधीला सुपूर्द करणे

एडी बँका बिल ऑफ लेडिंगची एत प्रत वाहतूक करणाऱ्या जहाजाच्या मास्टरला किंवा व्यापारी प्रतिनिधीला काही भूमी-बंदिस्त देशांना निर्यातीसाठी पोचवू शकतात जर, नौप्रेष परत न घेता येणाऱ्या पतपत्राने संरक्षित असेल आणि कागदपत्रे पतपत्रातील अटीनुसार असतील, जे इतर बाबींबरोबरच, अशा पोचवणीची तरतूद करीत असेल.

### क.१३ निर्यात बिल नोंदवही

(१) एडी बँकानी भौतिक आणि इलेक्ट्रॉनिक स्वरुपात निर्यात बिसृल नोंदवही ठेवावी. जीआर/एसडीएफ/पीपी प्रपत्रांच्या क्रमांकांचा तपशील, प्रदानाची देय तारीख, ज्याच्या बरोबर व्यवहार समाविष्ट असणारे इएनसी विवरणपत्र रिझर्व बँकेला पाठविले त्या आर सप्लिमेंटरी विवरणपत्राचा कालावधी उपलब्ध असावा.

(२) एडी बँकानी खात्री करावी कि सर्व प्रकारचे निर्यात व्यवहार निर्यात नोंदवहीत नोंदले जातील आणि त्याना आर्थिक वर्षाच्या आधारावर (म्हणजेच एप्रिल ते मार्च) बिल क्रमांक दिले जातील.

(३) बिल क्रमांक रिझर्व बँकेला सादर केलेल्या इएनसी विवरणपत्रात अन्य संबधित विवरणपत्रात नोंदवावेत.

## क.१४ तारीख उलटून गेलेल्या बिलांचा पाठपुरावा

(१) एडी बँकानी बिलांच्या वसूलीवर बारीक लक्ष ठेवावे आणि ज्या प्रकरणात प्रदानाच्या देय तारखेच्या पलिकडे किंवा निर्यचातीच्या तारखेपासून सहा १२ महिने बिले थकित राहतील, ती तातडीने संबंधित निर्यातदाराकडे उपस्थित करावीत. निर्यातदार सहा महिन्यांच्या आत उत्पन्नाच्या पोचवणीची व्यवस्ता करण्यात असमर्थ ठरला किंवा त्याने सहा १२ महिन्यापेक्षा अधिक मुदतवाढ मागितली तर, प्रकरण जेथे शक्य असेल तेथे उत्पन्नाच्या वसूलीतील उशिराचे कारण नमूद करून, रिझ्रव बँकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाला कळवावे.

(२) जीआर/एसडीएफ/पीपी/ सॉफ्टेक्स प्रपत्रांच्या दुसऱ्या प्रती, न काढलेल्या शिलकीव्यतिरिक्त, निर्यातीच्या उत्पन्नाची संपूर्ण वसूली होईपर्यंत एडी बँकानी ठेवून घ्याव्यात.

(३) एडी बँकानी निर्यात थकित रकमांचा निर्यातदाराकडे पद्धतशीरपणे आणि जोमाने पाठपुरावा करावा जेणेकरून कसूरदार निर्यातदारांविरुद्ध कारवाईला विलंब होणार नाही. एडी बँकांकडून निर्यातीच्या वसूलीतील कोणत्याहि ढिलाईकडे रिझर्व बँक गंभीरपणे पाहील, परिणामी एफइएमए १९९९ अधीन दंडात्मक तरतूदींचा वापर केला जाईल.

(४) स्पेशल इकॉनॉमिक झोनमधील (एसई झेड) एककांना, निर्यातीचे उपन्न वसूल करण्याची बारा महिने किंवा विस्तारित कालाची वैधानिक अट लागु नाही. तथापि, एसईझेड मधील एकके, वर दिलेल्या जीआर/ एसडीएफ/पीपी/सॉफ्टेक्स निर्यात कार्यरीतींचे अनुसरण करत राहतील.

(५) एडी वर्ग - १ बँकांनी, रिझर्व बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडे, सहामही धर्तीवर फॉर्म एक्सओ एसमध्ये (जोडपत्र ७) एकत्रित वितरणपत्र पाठवावे. व त्यात, प्रत्येक वर्षाच्या जून व डिसेंबर अखेरीस निर्यातीच्या तारखेपासून सहा महिन्यानंतरही थकित असलेल्या निर्यात बिलांचा तपशील द्यावा. संबंधित सहामाही संपल्याच्या पंधरा दिवसांच्या आत हे विवरणपत्र तीन प्रतींमध्ये पाठविले जावे.

## क.१५ युजन्स बिलांच्या पूर्वप्रदानामुळे इनव्हाईस मूल्यातील घट

उपयोग बिलांच्या पूर्वप्रदानाखाती बीजक मूल्य कमी करणे – प्रसंगवशात, उपयोग बिलांच्या पूर्वप्रदानासाठी समुद्रपार खरेदीदाराना रोख सूट देण्यापोटी बीजक मूल्य कमी करण्यासाठी निर्यातदार एडी बँकेकडे जाऊ शकतात. एडी बँका उपयोग कालावधीच्या समाप्त झालेल्या कालावधीवरील व्याजाच्या प्रमाणातील रकमेपर्यंत, निर्यात करारात ठरवून दिलेल्या व्याज दराने किंवा जेथे व्याजाचा दर करारात ठरवून दिलेला नाही तेथे बीजकाच्या चलनाच्या मुख्य दराने/लिबॉरने हिशोब केलेली सूट अनुज्ञेय करू शकतात.

## क.१६ इतर प्रकरणात बीजक मूल्य कमी करणे

(१) जर, बिलाच्या वाटाघाटीनंतर किंवा वसूलीला पाठविल्यानंतर, कोणत्याही कारणाने त्याची रक्कम कमी करायची असेल तर, विनंतीच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांची खात्री झाल्यास एडी बँका अशी घट मंजूर करू शकतात जरः

ए. घट बीजक मूल्याच्या २५ टक्क्याहून अधिक नसेल.

बी. फ्लोअर प्राइस नियमांच्या अधीन असलेल्या वस्तूंच्या संबंधात ती नसेल.

सी. निर्यातदार रिझर्व्ह बँकेच्या सावधगिरी सूचीवर नसेल, आणि

डी. निर्यातदाराला त्याच प्रमाणात प्राप्त केलेली निर्यात प्रोत्साहने, काही असल्यास, परत करायला सांगणे

(२) जे निर्यातदार तीन वर्षाहून अधिक काळ निर्यात व्यवसायात आहेत त्यांच्या बाबतीत टक्केवारीच्या कोणत्याहि मर्यादेविना बीजक मूल्यातील घट उक्त अटींच्या अधीन त्याचप्रमाणे त्यांचा पूर्वेतिहास समाधानकारक असेल तर म्हणजेच, निर्यातीची थकित रक्कम आधीच्या तीन आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक निर्यात वसूलीच्या ५ टक्कयाहून अधिक नसेल तर अनुज्ञेय करता येईल.

(३) आधीच्या तीन आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक वसूलीशी निर्यात बिलांच्या थकित रकमेची टक्केवारी ठरविण्यासाठी, खरेदीदाराने स्थानिक चलनात प्रदान केले असेल तर एक्स्टर्नलायझेशन समस्या भेडसावणाऱ्या देशांना केलेली निर्यातीची थकित रक्कम वगळता येईल.

**क.१७ निर्यात दावे**

(१) एडी बँका अर्ज केला असता निर्यात दावे मुक्त करतील, जर संबंधित निर्यातीची रक्कम आधीच वसूल झाली असेल आणि भारतात प्रत्यवर्तित केली असेल आणि निर्यातदार रिझर्व्ह बंकेच्या सावधगिरी सूचीवर नसेल.

(२) वित्तप्रेषणाच्या अशा सर्व प्रकरणात, निर्यातदाराला त्याने काही निर्यात प्रोत्साहने प्राप्त केली असतील तर ती परत करण्यास सांगावे.

**क.१८ खरेदीदारात/मालप्रेषितीत बदल**

माल नौप्रेष केल्यानंतर, नंतरच्याने कसूर केल्याच्या घटनेत, मूळ खरेदीदाराव्यतिरिक्त अन्य खरेदीदाराला हस्तांतरण करायचे असेल तर, मूल्यात काही घट करायची असल्यास ती २५ टक्कयांहून अधिक नसल्यास आणि निर्यातीच्या रकमेची वसूलीत निर्यातीच्या तारखेपासून १२ महिन्यांपेक्षा अधिक उशिर झाला नसेल तर, रिझर्व्ह बँकेच्या पूर्वानुमतिची आवश्यकता नाही.

**क.१९ वेळेत वाढ आणि निर्यातदारांकडून स्वयंनिर्लेखन**

१) एखाद्या आर्थिक वर्षात विहीत कालावधीच्या आत देय असलेल्या निर्यात उत्पन्नासाठी सर्व निर्यातदारांना (स्थितीधारक निर्यातदार वगळून इतर) थकित निर्यात देये निर्लेखित करण्याची (बीजक मूल्य कमी करण्यासहित) आणि वसूलीचा कालावधी १२ महिने पुढे किंवा लागू असेल त्याप्रमाणे त्यापेक्षा अधिक वाढविण्याची परवानगी देण्यात आली आहे, जर

(१) अशा निर्लेखित केलेल्या निर्यात बिलांचे (कमी केलेल्या बीजक मूल्यासहित) आणि वसूलीसाठी कालवधी वाढवून दिलेल्या बिलांचे एकूण मूल्य आर्थिक वर्षात देय असलेल्या निर्यात उत्पन्नाच्या १० टक्क्यांपेक्षा अदिक नसेल आणि

(२) अशी निर्यात बिले अंमलबजावणी संचालनालय/केंद्रीय गुप्तचर विभाग किंवा अन्य कोणत्याहि तपासणी एजन्सीच्या तपासणीअधीन नसतील.

(२) एकापेक्षा अधिक एडी बँकांशी व्यवहार करणारे निर्यातदार ही सुविधा प्रत्येक एडी बँकेकडून प्राप्त करू शकतात म्हणजेच स्वयंनिर्लेखनासाठी (कमी केलेल्या बीजक मूल्यासहित) आणि निर्यातीच्या वसूलीसाठी वाढीव कालवधीसाठी असलेली १० टक्क्यांची मर्यादा त्या बँकांकडे वसूलीसाठी जमा केलेल्या सर्व निर्यात बिलांना लागू असेल.

(३) बँकांच्या संघांतर्गत किंवा अनेक बँकांबरोबर प्रचालन करणाऱ्या निर्यातदारांना सर्व बँकांच्याबाबतीत एकूणातीच्या आधारावर १० टक्क्याच्या मर्यादेचा हिशोब करण्याचा पर्याय असेल, जर संघाची मुख्य बँक किंवा अनेक बँकांच्या बाबतीत नोडल बँक, सर्व बँकांच्या वतीने निर्यातदाराची वार्षिक कामगिरी पडताळणे हाती घेत असेल.

(४) आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर एका महिन्याच्या आत, निर्यातदारांनी देय निर्यात उत्पन्न, वसूल झालेले आणि वसूल न झालेले यांचा तपशील देऊन संबंधित एडी बँकेला विवरणपत्र(परिशिष्ट ४) सादर करावे.

(५) एडी बँकानी त्याच्या नोंदीबरोबर विवरणपत्र पडताळून पाहणे आणि जेथे आर्थिक वर्षातील स्वयंवाढ, निर्लेखन (बीजक मूल्य कमी करण्यासहित) आणि वसूली न होणे यांच्या बाबतीतील १० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन झालेले आहे, तेथे निर्यातदाराने निर्लेखन, बीजक मूल्य कमी करणे किंवा कालमर्यादेतील वाढ, जसे प्रकरण असेल तसे, आर्थिक वर्षाच्या समाप्तीपूर्वी १० टक्क्याच्या मर्यादेच्या बाहेरच्यासाठी आवश्यक ती मंजूरी प्राप्त केली आहे हा निश्चीती करण्यासाठी आढावा घेणे आवश्यक आहे. आर्थिक वर्षात देय असलेल्या ज्या निर्यात बिलांसाठी निर्यातदाराने स्वतःच वसूलीच्या कालावधीत वाढ दिली असेल(१० टक्के मर्यादेच्या आत) किंवा एडी बँकेकडून वेळ वाढवून मागितली असेल परंतु वर्षाच्या शेवटी असल्याप्रमाणे वसूली झाली नसेल अशी बिले पुढील आर्थिक वर्षात देय निर्यात उत्पन्न म्हणून हिशोबात धरली जातील.

(६) ज्या प्रकरणात निर्यातदाराने वरील गरजांची पूर्तता करण्यात असमर्थ ठरला असेल, एडी बँका संबंधित निर्यातदाराला १० टक्के मर्यादेच्या बाहेरीलसाठी वसूली न झालेल्याच्या बाबतीत वेळेत वाढ करण्याची/बीजक मूल्य कमी करण्यासाठी/निर्लेखनासाठी परवानगी मागावी, त्याने तसे न केल्यास, एडी बँकानी एक महिन्याच्या आत, रिझर्व्ह बँकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाला माहिती देऊन निर्यातदाराला अशी स्वयं निर्लेखनाची/वेळ वाढवून देण्याची मागे घेतल्याचे कळवावे.

### क.२० वेळेत वाढ

भारतीय रिझर्व बँकेने, एडी वर्ग - १ बँकांना निर्यातीची रक्कम वसुल करण्याचा कालावधी, निर्यातीच्या तारखेपासून, एका वेळी सहा महिन्यांपर्यंत असा १२ महिन्यांपर्यंत वाढविण्याची परवानगी, (निर्यात-बिलाची रक्कम कितीही असली तरी ) पुढील अटींवर दिली आहे –

(अ) त्या इनव्हॉईसखालील केलेल्या व्यवहारांची अंमलबजावणी संचालनालय/सेंट्रल ब्युरो ऑफ इन्वेस्टिगेशन किंवा अन्य अन्वेशण एजन्सीद्वारा तपासणीखाली नसावेत

(ब) त्या निर्यात-बिलांच्या रकमेची वसुली निर्यातदाराच्या नियंत्रणापलिकडे गेल्याने होऊ शकली नसल्याबाबत एडी वर्ग १ बँकेचे समाधान झाले असावे

(क) विस्तारित कालावधीमध्ये निर्यात-उत्पन्नाची वसुली केली जाईल असे घोषणापत्र त्या निर्यातदाराने सादर केलेले असावे

(ड) निर्यातीच्या तारखेच्या एक वर्षा पलिकडे कालावधीचा विस्तार करण्याचा विचार करतेवेळी, त्या निर्यातदाराचे एकूण येणे (आऊटस्टँडिंग) युएसडी एक दशलक्ष किंवा मागील तीन आर्थिक वर्षामधील निर्यात-वसुलीच्या सरासरी मूल्याच्या ( जे अधिक असेल ते ) १० टक्के एवढे असावे

(ई) निर्यातीच्या तारखेपासून सहा महिन्यापलिकडे येणे/थकित असलेली सर्व निर्यात बिले एक्सओएस विवरणपत्राद्वारे कळविली जावीत. तथापि, जेथे एडी वर्ग - १ बँकांनी मुदतवाढ दिलेली आहे तेथे, "शेरा" ह्या स्तंभात, कोणत्या तारखेपर्यंत मुदतवाढ दिली आहे हे नमूद केले जावे

(फ) जेथे निर्यातदाराने विदेशात खरेदीदाराविरुद्ध दावा दाखल केला आहे तेथे संबंधित/ थकित रकमेचा विचार न करताही मुदतवाढ देण्यात यावी.

(२) निर्यातदाराच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे, विस्तारित कालावधीतही एखाद्या शिपमेंटच्या बिलाची वसुली करण्यात निर्यातदार असमर्थ ठरला असून, त्याला अधिक मुदतवाढ दिल्यास ती वसुली होण्याबाबत त्याची अपेक्षा असल्यास तसेच वरील परिच्छेद (१) मध्ये समाविष्ट नसलेल्या बाबतीत, त्याने त्याच्या एडी वर्ग - १ बँकेमार्फत, सुयोग्य कागदोपत्री पुराव्यांसह, ईटीएक्स फॉर्ममध्ये, त्याबाबतचा आवश्यक अर्ज ( दोन प्रतींमध्ये ) रिझर्व बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाकडे करावा.

**क.२१ एडी बँकांद्वारे निर्लेखन**

१) खूप प्रयत्नांनंतरही थकित निर्यात देये वसूल करू न शकलेला निर्यातदार, ज्या एडी वर्ग - १ बँकेने संबंधित नौप्रेष कागदपत्रे हाताळली असतील तिच्याकडे वसूल न झालेल्या भागाच्या निर्लेखनासाठी उचित समर्थक कागदपत्रांसह विनंती करू शकतो. एडी वर्ग - १ बँकांना खाली दिलेल्या अटींच्या अधीन अशी विनंती मान्य करता येईलः

ए) संबंधित रक्कम एक वर्ष किंवा त्याहून अधिक थकित राहिली असेल,

बी) एडी वर्ग - १ बँकानी एका आर्थिक वर्षात निर्लेखनासाठी अनुज्ञेय केलेली एकूण रक्कम, आधीच्या आर्थिक वर्षात संबंधित निर्यातदाराने संबधित एडी वर्ग - १ बँकेमार्फत वसूल केलेल्या निर्यातीच्या एकूण उत्पन्नाच्या १० टक्क्याच्या वर जाता कामा नये.

सी) देये वसूल करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केल्याचा कागदोपत्री पुरावा निर्यातदाराने सादर केल्यास,

डी) प्रकरण खालीलपैकी कोणत्याही एका प्रवर्गात येत असेल

१. समुद्रपार खरेदीदाराला नादार घोषित करण्यात आले असेल आणि निर्यातीच्या उत्पन्नाचीवसूली संभाव्य नाही असे दर्शविणारे अधिकृत परिसमापकाकडील प्रमाणपत्र हजर केले,
२. उचित अशा दीर्घ कालावधीसाठी समुद्रपार खरेदीदार बेपत्ता आहे,

३. आयात केलेल्या देशाच्या बंदर/कस्टम्स/आरोग्य अधिकाऱ्यानी निर्यात केलेल्या मालाचा लिलाव केला असेल किंवा नष्ट केला असेल.

४. वसूल न झालेली रक्कम भारतीय राजदूतावासाच्या, फरिन चेंबर ऑफ कॉमर्स किंवा अशाच प्रकारच्या संघटनेच्या मध्यस्थीने तडजोड केलेल्या प्रकरणातील शिल्लक देयाची प्रतिनिधीक असेल.

५. वसूल न झालेली रक्कम थकित असलेल्या निर्यात बिलाच्या न काढलेल्या(बीजक मूल्याच्या १० टक्क्यांच्या वर नाही) रकमेची प्रतिनिधीक असेल आणि निर्यातदाराने सर्वतोपरि प्रयत्न केल्यानंतरहि वसूल होणे शक्य नसल्याचे दिसून आले असेल.

६. कायदेशीर कारवाई करण्याचा खर्च वसूल न झालेल्या निर्यात बिलाच्या प्रमाणात नसेल किंवा जेथे समुद्रपार खरेदीदाराविरुद्ध न्यायालयातील दावा जिंकल्यानंतरहि, त्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे न्यायालयाच्या हुकूमाची अंमलबजावणी करणे शक्य झाले नसेल.

७. पतपत्रातील मूल्य आणि प्रत्यक्ष निर्यात मूल्य यातील किंवा तात्पुरता फ्रेट आकार आणि प्रत्यक्ष फ्रेट आकार यातील फरकापोटी बिले काढली असतील परंतु समुद्रपार खरेदीदाराने फेटाळण्याच्या परिणामी वसूली झाली नसेल आणि ती वसूल होण्याचा कोणताही संभव नसेल.

इ) प्रकरण कोणत्याही प्रलंबित दिवाणी किंवा फौजदारी दाव्याचा विषय नसेल.

एफ) निर्यातदाराला अंमलबजावणी संचालनालय किंवा केंद्रीय गुप्तचर विभाग किंवा अशाच अन्य कोणत्याहि कायद्यांची अंमलबजावणी करणाऱ्या संघटनेकडून विपरित सूचना प्राप्त झाली नसेल.

जी) निर्यातदाराने संबंधित नौप्रेषांच्या बाबतीत काही प्रोत्साहने प्राप्त केली असल्यास, ती त्या प्रमाणात परत केली असतील. एडी बँकानी संबंधित बिलांच्या निर्लेखनासाठी परवानगी देण्यापूर्वी प्राप्त केलेली निर्यात प्रोत्साहने परत केल्याचा पुरावा असलेली कागदपत्रे प्राप्त करावीत.
निर्लेखनात समाविष्ट असलेली जीआर/एसडीएफ/पीपी समक्ष वसूल होणे बाकी असलेली कोणतीहि बिले नसतील तर, एडी वर्ग - १ बँकांनी प्रपत्राच्या दुसऱ्या प्रतीवर खालीलप्रमाणे प्रमाणन करावेः

“......................च्या (रक्कम अक्षरी आणि अंकी) निर्लेखनासाठी एडी वर्ग - १ बँकेच्या अस्तित्वातील आदेशांनुसार परवानगी दिली.”

तारीख.........................

एडी वर्ग - १ बँकेचा शिक्का आणि सही

(२) विदेशी व्यापार धोरणाधीन केलेल्या व्याख्येप्रमाणे स्थितीधारक निर्यातदार आणि त्यांच्या निर्यात उत्पादनापैकी ५० टक्क्याहून अधिक निर्यात करणारे आणि तशी डीजीएफटीकडून मान्यताप्राप्त केलेल्या निर्यातदाराना, आधीच्या तीन आर्थिक वर्षातील त्यांच्या सरासरी वार्षिक वसूलीच्या ५ टक्के किंवा आर्थिक वर्षातील देय असलेल्या निर्यात उत्पन्नाच्या १० टक्के, यापैकी जे अधिक असेल, त्या मर्यादेपर्यंत थकित निर्यात देये निर्लेखित करण्यास परवानगी देता येईल. ही मर्यादा एका वर्षात संचायितपणे आणि खालील अटींच्या अधीन उपलब्ध असेलः

ए) निर्यातदाराने संबंधित एडी वर्ग - १ बँकेला चार्टर्ड अकाउंटंटचे खालील दर्शविणारे प्रमाणपत्र सादर करावे-

(१) आधीच्या तीन आर्थिक वर्षातील निर्यातीची वसूली आणि वर्षात आधीच निर्लेखन प्राप्त केलेली रक्कम, काही असल्यास.
(२) निर्लेखित करायचे संबंधित जीआर/एसडीएफ क्र., बिल क्र., बीजक मूल्य, निर्यात केलेली वस्तू, निर्यातीचा देश.
(३) निर्यातीचे लाभ, काही असल्यास, निर्यातदाराने परत केले आहेत.

(ब) “राईट ऑफ” सुविधेसाठी पुढील प्रकरणे पात्र नाहीत

१. एक्स्टर्नलायझेशनची समस्या असलेल्या देशांना केलेली निर्यात म्हणजेच जेथे समुद्रपार खरेदीदाराने स्थानिक चलनात मूल्य जमा केले आहे परंतु देशाच्या केंद्रीय बँकिंग अधिकाऱ्यानी रकमेच्या प्रत्यवर्तनाला परवानगी दिलेली नाही.

२. अंमलबजावणी संचालनालयस, महसूल गुप्तवार्ता संचालनालय, केंद्रीय गुप्तचर विभाग, वगैरेसारख्या एजन्सीजद्वारा तपासणीच्या अधीन असणारी जीआर/एसडीएफ प्रपत्रे त्याचप्रमाणे दिवाणी/फौजदारी दाव्यांच्या विषयाधीन असलेली थकित बिले.

सी. “निर्लेखना” ला परवानगी दिल्यानंतर, एडी वर्ग - १ बँकानी प्रपत्राच्या दुसऱ्या प्रतीवर खालीलप्रमाणे प्रमाणन करावे-

“..............................रकमेच्या(रक्कम अक्षरी आणि अंकी) निर्लेखनाला ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. ३० दिनांकित एप्रिल ४, २००१ नुसार परवानगी दिली आहे.”

तारीखः
शिक्का आणि एडी वर्ग - १ बँकेची सही

(३) एडी वर्ग - १ बँकानी, रिझर्व बँकेच्या ज्या विभागीय कार्यालयाच्या अधिकारितेत कार्यरत आहेत त्याला इबीडब्ल्यू प्रपत्रात, निर्लेखनाचा तपशील वगैरे देऊन ३१ मार्च आणि ३० जून रोजी संपलेल्या प्रत्येक अर्ध वर्षाच्या अखेरीस असल्याप्रमाणे विवरणपत्र संबंधित अर्ध वर्ष संपल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावे.

(४) एडी वर्ग - १ बँकानी निर्लेखित केलेल्या थकित बिलांची सरसकट नमुना तपासणी/टक्केवारी तपासणी त्यांच्या निरीक्षकांद्वारे/लेखापरिक्षकांद्वारे केली जाईल अशी पद्धत अंमलात आणावी.

**क.२२ ईसीजीसी व इन्शुअरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथोरिटी (आयआरडीए) व्दारा नियंत्रित केलेल्या खाजगी विमा कंपन्यांव्दारे, दाव्यांच्याह प्रदानांची प्रकरणे खोडून काढणे (राईट ऑफ)**

(१) इसीजीसीद्वारा थकित बिलांच्या बाबतीतील दाव्याची तडजोड करण्यात आली आहे याची पुष्टी करणाऱ्या इसीजीसीकडील कागदोपत्री पुराव्यासह निर्यातदारांकडून प्राप्त झालेल्या अर्जावर, एडी बँका संबंधित निर्यात बिल निर्लेखित करतील आणि ती एक्सओएस विवरणपत्रातून काढून टाकतील.

२) असे निर्लेखन उक्त दर्शविल्याप्रमाणे १० टक्क्यांच्या मर्यादेच्या बंधनात नसेल.

(३) अशा प्रकरणात प्रोत्साहने, काही असल्यास, परत करणे विदेश व्यापार धोरणातील तरतूदीनुसार असेल.

(४) इसीजीसीने रुपयात तडजोड केलेले दावे विदेशी चलनातील वसूली समजण्यात येणार नाही. उक्तमध्ये समाविष्ट नसलेल्या अन्य प्रकरणांतील निर्लेखनासाठी रिझर्व्ह बँकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाची पूर्वानुमति आवश्यक असेल.

**क.२३ इतर बाबतीमध्ये राईट ऑफ करणे**

वरील सूचनांमध्ये न बसणाऱ्या बाबींसाठी रिझर्व बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाची पूर्व मंजुरी घेणे आवशक आहे.
वरील सूचनांखाली न येणाऱ्या प्रकरणांसाठी, रिझर्व बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाची पूर्व-मंजुरी आवश्यक असेल.

**क.२४ राईट ऑफ – शिथिलता/सवलत**

२००९-१४ च्या विदेश व्यापार धोरणात ( एफटीपी ) घोषित केल्यानुसार, ह्या एफटीपी खालील कोणत्याही निर्यात प्रोत्साहन योजनांखाली निर्यातीच्या पैशांच्या वसुलीबाबत आग्रह धरला जाणार नाही – मात्र त्यासाठी पुढील अटी असतील

(१) रिझर्व बँक किंवा रिझर्व बँकेच्या वतीने एडी वर्ग - १ बँक ह्यांच्याद्वारे विद्यमान सूचनांनुसार गुणवत्तेच्या आधारावर राईट ऑफ करण्यास परवानगी आहे.

(२) निर्यातदाराने फॉरिन मिशन ऑफ इंडियाकडून, खरेदीदाराकडून निर्यातीचे पैसे वसुल होत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळविले असले पाहिजे.

(३) राईट ऑफ करण्याबाबत हे लागु असणार नाही. –

ही सवलत, ऑगस्ट २७, २००९ पासून केलेल्या निर्यातींना लागु आहे.

एडी वर्ग - २ बँकांना सांगण्यात येते की, वरील अटींचे पालन केले गेले असल्याशिवाय, त्यांनी ड्युटी ड्रॉबॅक योजनेखाली घेतलेला लाभ सोडून, निर्यातदाराने एफटीपी २००९-१४ खालील कोणत्याही निर्यात प्रोत्साहन

योजनांखालील निर्यातीबाबतचे इन्सेंटिव्ज त्या प्रमाणात परत करण्याचा आग्रह धरु नये. एक्सपोर्ट क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. ( ईसीजीसी ) ने दाव्याची तडजोड केलेली असली तरी किंवा रिझर्व बँकेने राईट ऑफसाठी परवानगी दिली तरीही, ड्रॉबॅकची रक्कम वसुल केली जावी.

### क.२५ प्रवासात हरवलेले नौप्रेष

ज्यासाठी बिलांच्या वाटाघाटीद्वारे किंवा पतपत्राच्या अधीन किंवा अन्य प्रकारे प्रदान प्राप्त झालेले नाही असे भारतातून नौप्रेष प्रवासात हरविते तेव्हा, एडी वर्ग - १ बँकांनी खात्री करून घेतली पाहिजे कि हरविल्याचे माहीत झाल्याक्षणी विम्याचा दावा दाखल केला पाहिजे.

ज्या प्रकरणात दावा विदेशात देय आहे, एडी वर्ग - १ बँकांनी, त्यांच्या समुद्रपार शाखेमार्फत/प्रतिनिधीमार्फत हरवलेल्या नौप्रेषाच्या दाव्याची पूर्ण गोळा करण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि जीआर/एसडीएफ/पीपी प्रपत्रांची दुसरी प्रत रक्कम गोळा केल्यानंतरच मुक्त केली पाहिजे.

दाव्याची रक्कम प्राप्त झाल्याचे प्रमाणपत्र दुसऱ्या प्रतीच्या मागच्या बाजूला द्यावे. एडी वर्ग - १ बँकानी खात्री करावी कि प्रवासात हरवलेल्या नौप्रेषावरील दाव्याच्या रकमा ज्यांची नौकानयन कंपन्यानी/एअरलाइन्सनी वाहतूकदाराच्या विदेशातील दायित्वाअधीन अंशतः थेट तडजोड केली आहे. त्यासुद्धा निर्यातदारांकडून भारतात प्रत्यवर्तित केल्या जातील.

### क.२६(अ) आयातीच्या प्रदानासमक्ष निर्यात प्राप्यांचे "नेटिंग ऑफ"-विशेष आर्थिक क्षेत्रातील युनीट्स

अधिकृत डिलर बँका खालील अटींच्या अधीन निर्यातदारांकडून प्राप्त झालेल्या विशेष आर्थिक क्षेत्रात स्थित असलेल्या युनीट्ससाठी आयातीसमक्ष प्राप्य निर्यातीच्या 'नेटिंग ऑफ'साठी विनंत्याना परवानगी देतील.

१. आयात प्रदानांसमक्ष निर्यात प्राप्यांचे 'नेटिंग ऑफ' एकाच भारतीय एककाच्या आणि समुद्रपार खरेदीदार/पुरवठादार (द्विपक्षीय नेटिंग) च्या संबंधात आहे आणि नेटिंग विशेष आर्थिक क्षेत्रातील युनीट्च्या ताळेबंद पत्रकाच्या तारखेला असल्याप्रमाणे करता येईल.

२. मालाची निर्यात जीआर(ओ) प्रपत्रात/डीटीआर मध्ये, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे कागदोपत्री आहे तर मालाची/सेवांची आयात ए१/ए२ प्रपत्रांद्वारे, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, नोंदलेली आहे. संबंधित जीआर/एसडीएफ प्रपत्रे अधिकृत डिलर बँकांद्वारे संपूर्ण उत्पन्न समायोजित/प्राप्त झाल्यानंतरच पूर्ण झाली असे समजण्यात येईल.

३. एफइटी-इआरएस अधीन 'आर' विवरणपत्रात दोन्ही व्यवहार स्वतंत्रपणे कळविले आहेत.

४. एसीयु देशांशी निर्यात/व्यापार व्यवहार या व्यवस्थेच्या बाहेर ठेवले आहेत.

५. संबंधित अशी सर्व कागदपत्रे, त्या त्या एडी वर्ग १ बँकांकडे, सादर केली जातात आणि त्या बँकांनी, त्या व्यवहारांबाबत असलेल्या सर्व विनियात्मक आवश्यक्तांचे पालन करावे.

### क. २६(ब) - निर्यात - संबंधीच्या येणे असलेल्या रकमा, आयाती-संबंधाने देणे असलेल्या रकमांबरोबर तडजोडित (सेट ऑफ) कराव्यात (नोव्हेंबर १७, २०११ पासून जारी)

निर्यात - संबंधीच्या येणे असलेल्या रकमांची आयात संबंधीच्या देणे रकमांशी तडजोड करण्याची प्रकरणे हाताळण्याचे काम, एडी वर्ग १ बँका पुढील अटी व शर्तींवर करु शकतात.

अ) ती आयात जारी असलेल्या विदेशी व्यापार धोरणानुसारच आहे.

ब)लेंडिंगच्या इन्व्हॉइसेस/बिले आणि होम कंझमशन साठी असलेल्या बिल्स ऑफ एंट्रीच्या एक्सचेंज कंट्रोल कॉपीज्, आयात करणाराने प्राधिकृत डीलर बँकेकडे सादर केली आहेत.
क)त्या आयाती साठीचे देय प्रदान, त्या आयातदाराच्या लेखा पुस्तकात अजुनही थकित(आउट्स्टँडिंग) असेच दाखविण्यात आले आहे.

ड)खरेदी व विक्री असे दोन्हीही व्यवहार 'आर' अहवालात वेगवेगळे कळविण्यांत यावेत.
ई) निर्याती संपूर्ण रक्कम मिळाल्यानंतरच / तडजोड झाल्यानंतरच एडी वर्ग १ बँकांनी संबंधित जीआर फॉर्म्स द्यावेत.
फ) निर्यातीबाबतचे येणे, आयातीबाबतच्या देण्याबरोबर तडजोडित करणे हे केवळ विदेशातील त्याच एका खरेदीदार व विक्रीदारा बाबत केले जावे आणि तसे सेट ऑफ करण्याबाबत त्याची संमती घेतली असावी.
ग) एसीयु देशांबरोबर केलेले आयात / निर्यात व्यवहार ह्या व्यवस्थेच्या बाहेर असावेत.
ह) संबंधित अशी सर्व कागदपत्रे, त्या त्या एडी वर्ग १ बँकांकडे, सादर केली जातात आणि त्या बँकांनी, त्या व्यवहारांबाबत असलेल्या सर्व विनियात्मक आवश्यक्तांचे पालन करावे.

## क.२७ निर्यातीवर एजन्सी कमिशन

(१) निर्यातदाराने अर्ज सादर केल्यावर एडी वर्ग - १ बँका वित्तप्रेषणाद्वारे किंवा बीजक मूल्यातून वजावटीद्वारे, कमिशनच्या प्रदानाला अनुमति देतील. एजन्सी कमिशनवरील वित्तप्रेषण खालील अटींच्या अधीन अनुज्ञेय असेलः

ए) कमिशनची रक्कम जीआर/एसडीएफ/पीपी/सॉफ्टेक्स प्रपत्रावर घोषित केली आहे आणि जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे कस्टम्स किंवा माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार/इपीझेड अधिकाऱ्यानी मान्य केले आहे. ज्या प्रकरणात कमिशन जीआर/एसडीएफ/पीपी/सॉफ्टेक्स प्रपत्रावर घोषित केलेले नाही, त्या प्रकरणात, निर्यातदार आणि/किंवा कमिशनच्या प्रदानाचा लाभार्थी वैध करार/लेखी सामंजस्य असेल तर, निर्यात घोषमापत्रात कमिशन घोषित न करण्यासाठी निर्यातदाराने पुढे केलेल्या कारणांच्या बाबतीत समाधान करून घेतल्यानंतर वित्तप्रेषणाला परवानगी देता येईल.

बी) संबंधित नौप्रेष आधीच केले असेल.

(२) भारतीय निर्यातदाराद्वारा, यूएस डॉलरमध्ये नियुक्त एस्क्रो खात्यामार्फत प्रति-व्यापार व्यवस्थेच्या अधीन समाविष्ट असलेल्या त्यांच्या निर्यातीच्या संबंधात, खालील अटींच्या अधीन कमिशनच्या प्रदानासाठी एडी वर्ग - १ बँका परवानगी देतील.

ए) कमिशनच्या प्रदानात उक्त परिच्छेदात (ए) आणि (बी) मध्ये ठरवून दिलेल्या अटींचे समाधान केलेले असेल.

बी) कमिशन एस्क्रो खाते धारकांना स्वतःला देय नसेल.

सी) बीजक बिलातून वजावाटीद्वारे कमिशनला परवानगी देऊ नये.

(३) एखादा समुद्रपार संयुक्त साहसातील/संपूर्ण मालकीच्या उपकंपनीतील समभागातील सहभागापोटी भारतीय भागीदारानी केलेल्या निर्यातीवर त्याचप्रमाणे चहा आणि तंबाखूच्या निर्यातीच्या बीजक मूल्याच्या १० टक्क्यापर्यंत कमिशन व्यतिरिक्त रुपया क्रेडीट मार्गाअधीन कमिशनला मनाई आहे.

## क.२८ निर्यातदारांना कागदपत्रे परत देणे

निर्यातीच्या उत्पन्नाचा परतावा ज्या एडी वर्ग - १ बँकेमार्फत मूळात निर्यातीचे उत्पन्न वसूल करण्यात आले असेल, त्या इथून पुढे, भारतातून निर्यात केलेल्या आणि निकृष्ट दर्जामुळे भारतात पुनर्आयात केलेल्या

मालाच्या निर्यातीच्या उत्पन्नाच्या परताव्यासाठी विनंतीचा विचार करतील. अशा व्यवहाराना परवानगी देताना, एडी बँकानी खाली करमे आवश्यक आहेः

१. निर्यातदारच्या पूर्वेतिहासाबद्दल योग्य ती सावधगिरी दाखवावी.
२. व्यवहाराच्या सत्यतेची पडताळणी करावी.
३. संबंधित निर्यातीच्या समक्ष निर्यातदाराने कोणतेहि प्रोत्साहन प्राप्त केलेले नाही किंवा प्राप्त केलेले प्रोत्साहन, काही असल्यास, त्याच्या प्रमाणात परत केले आहे असे डीजीएफटी/कस्टम्सकडील प्रमाणपत्र प्राप्त करावे.
४. निर्यातदाराकडून वित्तप्रेषणाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत माल भारतात पुनर्आयात केला जाईल असे वचनपत्र प्राप्त करावे. आणि
५. सामान्य आयातीला लागू असलेल्या सर्व कार्यपद्धतीचे पालन केले आहे याची खात्री करावी.

## क.२९ निर्यातदारांची सावधगिरी सूची

(१) जेव्हा जेव्हा निर्यातदाराना 'एक्स्पोर्ट रेग्युलेशन्स' च्या नियमन १७ (परिशिष्ट २) मध्ये समाविष्ट असलेल्या तरतूदींनुसार इशारा दिला जाईल तेव्हा एडी वर्ग - १ बँकांनाही कळविले जाईल. त्यानी सावधगिरी सूचीत समाविष्ट केलेल्या निर्यातदारांची जीआर/एसडीएफ/पीपी प्रपत्रे, संबंधित निर्यातदारानी प्रस्तावित निर्यातीच्या संपूर्ण मूल्य समावून घेणारे आगऊ प्रदान किंवा त्यांच्या नावे परत न घेता येणारे पतपत्र प्राप्त झाल्याचा पुरावा हजर केल्यास, मंजूर करावीत.

(२) अशी मंजूरी जेथे नौप्रेषासाठी उपयोग बिले काढण्याच्या प्रकरणात देण्यात यावी जर, संबंधित पतपत्रात निर्यातीचे पूर्ण मूल्य समवून गेतले असेल आणि अशा काढण्याला परवानगी देत असेल आणि उपयोग बिलाची नौप्रेषाच्या तारखेपासून मुदतपूर्ती होत असेल.

(३) सावधगिरी सूचीत समाविष्ट असलेल्या निर्यातदारांना हमी देण्यासाठी एडी वर्ग - १ बँकानी रिझर्व्ह बँकेची पूर्वानुमति प्राप्त करावी.

परिशिष्ट -१

## विदेशी विनिमय व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम, २०००

अधिसूचना क्र. जी.एस.आर. ३८१(इ) दिनांक ३ मे, २००० (वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे)*: विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम ५ आणि कलम ४६ च्या उपकलम (१) आणि उपकलम (२) च्या खंड (ए) अन्वये प्राप्त अधिकारात, आणि रिझर्व बँकेशी सल्लामसलत करून, केंद्र सरकारने सार्वजनिक हितासाठी आवश्यक वाटल्याने, येणेप्रमाणे पुढील नियम केले आहेतः-

**१. अर्ध शीर्षक आणि सुरुवात.**—(१) या नियमाना विदेशी विनिमय व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम, २००० असे म्हटले जाईल;
(२) ते जून २००० च्या पहिल्या दिवसापासून प्रभावी होतील.

**२. व्याख्या- या नियमात, अन्य संदर्भात आवश्यक असल्याविनाः**

(अ) 'अधिनियम' म्हणजे विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४२):

(ब) 'काढणे' म्हणजे अधिकृत व्यक्तिकडून विदेशी चलन काढणे आणि त्यात पतपत्र उघडणे किंवा आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डचा किंवा आंतरराष्ट्रीय डेबीट कार्ड किंवा एटीएम कार्ड किंवा कोणतीहि अन्य बाब जिचा परिणाम विदेशी चलनातील दायित्व निर्माण करण्यात होतो त्यांचा वापर करणे समाविष्ट आहे.

(क) 'परिशिष्ट' म्हणजे या नियमाना जोडलेले परिशिष्ट.

(ड) या नियमात व्याख्या न केलेल्या परंतु अधिनियमात व्याख्या केलेल्या शब्दांचे अर्थ अनुक्रमे त्यांच्या अधिनियमात दिलेल्या व्याख्येनुसारच असतील.

**३. विदेशी चलन काढण्यावर मनाई –** कोणात्याहि व्यक्तिद्वारे खालील हेतूने विदेशी चलन काढण्यावर येणेप्रमाणे मनाई आहेः

अ. परिशिष्ट १ मध्ये विनिर्दिष्टित केलेला व्यवहार; किंवा

ब. नेपाळ आणि/किंवा भूतानला प्रवास; किंवा

क. नेपाळचा किंवा भूतानचा निवासी असलेल्या व्यक्तिबरोबर व्यवहार.

परंतु असे कि, खंड क खालील मनाई आरबीआयद्वारे तिला आवश्यक वाटतील अशा अटी आणि शर्ती विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे घालून देण्याच्या अधीन वगळण्यात येईल.

**४. भारत सरकारची पूर्वानुमति –**

कोणतीहि व्यक्ति भारत सरकारच्या पूर्वानुमतिविना परिशिष्ट २ मध्ये समाविष्ट असलेल्या व्यवहारासाठी विदेशी चलन काढणार नाही;

परंतु हा नियम जेथे वित्तप्रेषकाच्या निवासी विदेशी चलन खात्यात(आरएफसी) धारण केलेल्या निधीतून प्रदान केले आहे तेथे लागू होणार नाही.

**५. रिझर्व्ह बँकेची पूर्वानुमति –**

कोणतीही व्यक्ति रिझर्व बँकेच्या पूर्वानुमतिविना परिशिष्ट ३ मध्ये समाविष्ट असलेल्या व्यवहारासाठी विदेशी चलन काढणार नाही;

परंतु हा नियम जेथे वित्तप्रेषकाच्या निवासी विदेशी चलन (आरएफसी) खात्यात धारण केलेल्या निधीतून प्रदान केले आहे तेथे लागू होणार नाही.

**६.** (१) नियम ४ किंवा नियम ५ मध्ये असलेले काहीहि वित्तप्रेषकाच्या एक्स्चेंज अर्नर्स फॉरिन करंसी (इइएफसी) खात्यातून काढलेल्याला लागू होणार नाही.

(२) उपनियम (१) मध्ये असलेले काहीहि विचारात न घेता नियम ४ आणि नियम ५ खाली घातलेली बंधने जेथे एक्स्चेंज अर्नर्स फॉरिन करंसी (इइएफसी) खात्यातून काढलेले विदेशी चलन परिशिष्ट २ मधील बाब क्र. १० आणि ११, किंवा परिशिष्ट ३ मधील बाबी ३, ४, ११, १६, आणि १७, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे मध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या हेतूसाठी असेल तर लागू राहतील.

**७. भारताबाहेर असताना आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डाचा उपयोग**

नियम ५ मध्ये असलेले काहीहि भारताबाहेरील व्यक्ति भारतात भेटीवर असताना झालेल्या खर्चापोटी अशा व्यक्तिने प्रदाने करण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डाचा उपयोग करण्याला लागू होणार नाही.

## शेड्युल्ड १

## मनाई असलेले व्यवहार (नियम ३ पहा)

१. लॉटरीत जिंकलेल्या रकमेचे वित्तप्रेषण

२. शर्यत/घोडेस्वारी वगैरे किंवा अन्य कोणत्याहि छंदातून उत्पन्न.

३. लॉटरी तिकीटांच्या, बंदी घातलेल्या/प्रतिबंधित मासिकांच्या, फुटबॉल पूल्सच्या, स्वीपस्टेक्सच्या वगैरे खरेदीसाठी वित्तप्रेषण.

४. भारतीय कंपन्यांच्या समुद्रपार संयुक्त साहसांत/संपूर्ण मालकीच्या उपकंपन्यात समभाग गुंतवणूकीसाठी केलेय निर्यातीवर कमिशनचे प्रदान.

५. ज्या कंपनीला लाभांशाच्या समतोलाची आवश्यकता लागू होते अशा कोणत्याही कंपनीने केलेले लाभांशाचे वित्तप्रेषण.

६. चहा आणि तंबाखूच्या निर्यातीच्या बीजक मूल्याच्या १० टक्केपर्यंत कमिशनचा अपवाद करता, रुपी स्टेट क्रेडिट मार्गाखाली निर्यातीवरील कमिशनचे प्रदान.

७. दूरध्वनीच्या 'कॉल बॅक सर्विसेस' शी संबंधित प्रदान.

८. अनिवासी विशेष रुपया (खाते) योजनेत धारण केलेल्या निधीवरील व्याजाच्या उत्पन्नाचे वित्तप्रेषण.

## शेड्युल्ड २

### केंद्रसरकारची पूर्व-परवानगी आवश्यक असलेले व्यवहार
### (नियम ४ पहा)

| **वित्तप्रेषणाचा हेतू** | **भारत सरकारचे मंत्रालय/विभाग ज्याची परवानगी आवश्यक आहे** |
|---|---|
| १. सांस्कृतिक सहली | मनुष्यबळ विकास मंत्रालय, (शिक्षण आणि संस्कृती विभाग) |
| २. राज्य सरकार आणि त्याचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांच्याद्वारे पर्यटनाचे प्रवर्तन, विदेशी गुंतवणूक आणि आंतरराष्ट्री बोली (युएस डॉलर १०.००० हून अधिक) व्यतिरिक्त अन्य हेतूने विदेशी मुद्रित माध्यमातील जाहिराती | वित्त मंत्रालय, (आर्थिक व्यवहार विभाग) |
| ३.पीएसयुने भाड्याने घेतलेल्या जहाजाच्या फ्रेटचे वित्तप्रेषण | भूतल वाहतूक मंत्रालय, (चार्टरिंग कक्ष) |
| ४. सरकारी विभाग किंवा पीएसयु द्वारा सी.आय.एफ. तत्त्वावरील (म्हणजेच एफ.ओ.बी. आणि एफ.ए.एस. व्यतिरिक्त अन्य तत्त्वावर) आयातीचे प्रदान | भूतल वाहतूक मंत्रालय, (चार्टरिंग कक्ष) |
| ५. बहु-पध्दतीय वाहतूक प्रचालक त्यांच्या विदेशातील एजन्ट्सना करीत असलेले वित्तप्रेषण | नौकानयन महासंचालनालयाकडील नोंदणी प्रमाणपत्र |
| ६. (अ) टिव्हि वाहिन्या<br>(ब) इंटरनेट सेवा प्रदाने यांच्या द्वारा ट्रांस्पॉन्डर्सच्या भाड्याचे वित्तप्रेषण | माहिती आणि प्रसारण मंत्रालय<br>दूरसंचार आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय |
| ७. नौकानयन महासंचालनालयाने विहीत केलेल्या दरापेक्षा अधिक असलेल्या कंटेनर प्रतिबध्दता आकाराचे वित्तप्रेषण | भूतल वाहतूक मंत्रालय (नौकानयन महासंचालनालय) |
| ८. वगळले आहे | |
| ९. विदेशातील क्रीडाविषयक कार्यासाठी बक्षीसांच्या रकमेचे/प्रायोजकत्वाच्या रकमेचे, अंतर्भूत असलेली रक्कम जर युएस डॉलर १००,००० हून अधिक असेल तर, आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्यस्तरीय क्रीडा संस्थांव्यतिरिक्त अन्य व्यक्तिने केलेले वित्तप्रेषण | मनुष्यबळ विकास मंत्रालय (तरुण व्यवहार आणि क्रीडा विभाग) |
| १०. वगळले आहे | |
| ११. पी अँड आय क्लबच्या सदस्यत्वासाठी वित्तप्रेषण | वित्त मंत्रालय, (विमा विभाग) |

## शेड्युल्ड ३

**(नियम ५ पहा)**

१. वगळले आहे

२. एक किंवा अधिक देशाना (नेपाळ आणि भूतान वगळून) खाजगी भेटीसाठी, एका दिनदर्शिका वर्षात युएस डॉलर १०.००० किंवा त्याच्या सममूल्यापेक्षा अधिक चलनाचे विमोचन.

३. प्रति वित्तप्रेषक/दाता प्रति वर्ष युएस डॉलर ५,००० अधिक भेट वित्तप्रेषण

४. प्रति वित्तप्रेषक/दाता प्रति वर्ष युएस डॉलर ५,००० अधिक देणगी

(४)(१) निवासी व्यक्ती सोडल्यास अन्य प्रति प्रेषक किंवा दाता ह्यांनी प्रति आर्थिक वर्षासाठी दिलेली युसडी ५००० ची देणगी

(२) मागील ३ वर्षांमध्ये कॉर्पोरेट संस्थांनी मिळविलेल्या विदेशी मिळकतीच्या एक टक्क्यापेक्षा अधिक किंवा युएसडी ५,०००,००० ह्यापैकी जे कमी असेल अशी कॉर्पोरेट संस्थांनी पुढील साठी दिलेल्या देणग्या
(अ) नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये एक उच्च पद ( चेअर ) निर्माण करण्यासाठी
(ब) शैक्षणिक संस्थांनी प्रायोजित केलेल्या निधींसाठी हा गुंतवणुक निधी नसावा.
(क) दाता कंपनीच्या कार्यक्षेत्रातील एखादी तंत्रज्ञान संस्था किंवा बॉडी किंवा संघ ह्यांना

स्पष्टीकरण – वरील बाब ३ व ४ साठी, निवासी व्यक्तींनी दिलेली देणगी व भेटवस्तु ह्या उदारीकृत प्रेषण योजनेखाली समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

५. रोजगारासाठी विदेशी जाणऱ्या व्यक्तिंसाठी युएस डॉलर १००.००० पेक्षा अधिक विनिमय सुविधा.

६. स्थलांतरासाठी युएस डॉलर १००.००० किंवा स्थलांतराच्या देशाने विहीत केलेल्या रकमेपेक्षा अधिक विनिमय सुविधा.

७. जवळच्या नातेवाईकाच्या विदेशातील देखभालीसाठी वित्तप्रेषण,

१) भारताचा निवासी परंतु कायम निवासी नसलेल्या व्यक्तिच्या नक्त वेतनापेक्षा ( कर, भविष्य निर्वाह निधीला अंशदान आणि अन्य कपाती केल्यानंतर) अधिक.

(अ) तो पाकिस्तान व्यतिरिक्त अन्य विदेशी राज्याचा नागरिक असेल; किंवा
(ब) तो भारताचा नागरिक आहे, जो अशा विदेशी कंपनीच्या भारतातील कार्यालयात किंवा शाखेत किंवा उपकंपनीत किंव संयुक्त साहसात प्रतिनियुक्तिवर आहे.
२. अन्य सर्व प्रकरणात, प्रति प्राप्तकर्ता, प्रति वर्ष युएस डॉलर १००.००० पेक्षा अधिक.

***स्पष्टीकरणः या बाबीच्या हेत्वर्थ, रोजगार किंवा विनिर्दिष्टित कालावधीसाठी प्रतिनियुक्ती (त्याची लांबी विचारात न घेता) किंवा विशिष्ट काम किंवा कार्यभार ज्याचा कालावधी तीन वर्षाहून अधिक नाही अशी भारतातील निवासी व्यक्ति, निवासी आहे पण कायम निवासी नाही.***

८. व्यावसायिक प्रवासासाठी, किंवा परिषदेला किंवा विशेष प्रशिक्षणाला हजर राहण्यासाठी, किंवा वैद्यकीय उपचारांसाठी किंवा वैद्यकीय तपासणीसाठी विदेशी जाणाऱ्या रुग्णाच्या देखभालीच्या खर्चासाठी, किंवा वैद्यकीय उपचारांसाठी/ वैद्यकीय तपासणीसाठी विदेशी जाणाऱ्या रुग्णाबरोबर मदतनीस म्हणून जाण्यासाठी. निवासाचा विचार न करता, एका व्यक्तिला युएस डॉलर २५,००० पेक्षा अधिक विदेशी चलनाचे विमोचन.

९. भारतातील डॉक्टरच्या किंवा विदेशातील रुग्णालय/डॉक्टरच्या अंदाजित खर्चापेक्षा अधिक असलेल्या वैद्यकीय उपचारांचा खर्च करण्यासाठी चलनाचे विमोचन.

१०. विदेशात शिक्षणासाठी विदेशातील संस्थेच्या अंदाजित खर्चापेक्षा किंवा युएस डॉलर १००.००० यापैकी जे उच्चतम असेल त्या चलनाचे विमोचन.

११. विदेशातील एजन्ट्सना भारतातील निवासी सदनिका किवा व्यावसायिक भूखंडाच्या विक्रीसाठी प्रत्येक व्यवहारासाठी युएस डॉलर २५,००० किंवा आवक वित्तप्रेषणाच्या ५ % यापैकी जे उच्चतम असेल.

१२. वगळण्यात आले आहे.

१३. वगळण्यात आले आहे.

१४. वगळण्यात आले आहे.

१५. भारताबाहेरून प्रापण केलेल्या कोणत्याही संमंत्रणेसाठी. प्रति प्रकल्प युएस डॉलर १.०००.००० पेक्षा अधिक वित्तप्रेषण.

(१५) पायाभूत सोयी प्रकल्पांबाबतच्या सलजगार सेवांसाठी, प्रति प्रकल्प युएसडी १०,०००,००० पेक्षा अधिक रकमेची प्रेषणे व भारताबाहेरुन मिळविलेल्या इतर सलजगार सेवांसाठी प्रति प्रकल्प युएसडी, १,०००,००० ची प्रेषणे.

**स्पष्टीकरण** :- ह्या बार्बीमधील ‘‘पायाभूत सोयी प्रकल्प’’पुढील विषयांशी संबंधित आहेत
(१) ऊर्जा ( पॉवर )
(२) टेलिकम्युनिकेशन
(३) रेल्वे
(४) रस्ते – पुलांसह
(५) बंदरे व विमानतळ
(६) इंडस्ट्रियल पार्क्स आणि
(७) नागरी पायाभूत सोयी ( पाणी पुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था व आरोग्यरक्षक व्यवस्था )

१६. वगळण्यात आले आहे.

(१७) भारतामधील संस्थेने, संस्थापनापूर्व खर्च म्हणून भारतात आणलेल्या गुंतवणुकीच्या पाच टक्क्यांपेक्षा अधिक किंवा युएसडी १,०००,००० ( ह्यापैकी अधिक असेल ते ) एवढे प्रेषण संपूर्ण वसुली झालेले

१८. वगळण्यात आले आहे.

**(सुधारणा)**

**अधिसूचना जीएसआर.६६३ (इ) दिनांक ऑगस्ट १७, २०००,**
**एस. ओ.३०१ (इ) दिनांक मार्च ३०, २००१,**
**जीएसआर.४४२ दिनांक नोव्हेंबर २, २००२,**
**जीएसआर.८३१(इ) दिनांक डिसेंबर २०, २००२,**
**जीएसआर.३३(इ) दिनांक जानेवारी १६, २००३,**
**जीएसआर.३९७(इ) दिनांक मे १४, २००३,**
**जीएसआर.७३१(इ) दिनांक सप्टेंबर ११, २००३,**
**जीएसआर.८४९(इ) दिनांक ऑक्टोबर २९, २००३,**

जीएसआर.६०८(इ) दिनांक सप्टेंबर १३, २००४.
जीएसआर.५१२ (इ)दिनांक जुलै २८,२००५.
जीएसआर.४१२(इ)दिनांक जुलै ११,२००६.
जीएसआर.५११(इ)दिनांक जुलै २८,२००६.
जीएसआर.३४९(इ)दिनांक मे २२,२००९ आणि
जीएसआर.३८२(इ)दिनांक मे ०५,२०१०.

कृपया नोंद घ्यावीः

@@ ए.पी. (डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. २६ दिनांक जानेवारी १४, २०१० या सोबत वाचले जावे.

**<u>परिशिष्ट -२</u>**

**अधिसूचना क्र. एफइएमए २३/२०००-आरबी दिनांक ३ मे २०००**

विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४२)च्या कलम ७ च्या उपकलम (१) च्या खंड (ए) आणि उपकलम (३), कलम ४७ च्या उपकलम (२) अन्वये प्राप्त अधिकारात रिझर्व बँक भारतातून माल आणि सेवाच्या निर्यातीच्या संबंधात पुढील नियमने करीत आहे:-

**१. अर्धशीर्षक आणि सुरुवात:-**

(१) या नियमनाना विदेशी विनिमय व्यवस्थापन (मालाची आणि सेवांची निर्यात) नियमने, २००० असे म्हटले जाईल.

(२) ते जून, २००० च्या पहिल्या दिवसापासून प्रभावी होतील.

**२. व्याख्या:-**

या नियमनात अन्य संदर्भ हात आवश्यक असल्याविना, -

१. 'अधिनियम' म्हणजे विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४२);

२. 'अधिकृत डिलर' म्हणजे अधिनियमाच्या कलम १० च्या उपकलम (१) अधीन अधिकृत डिलर म्हणून अधिकार असलेली व्यक्ति, आणि त्यात फॅक्टर म्हणून आणि सदरहू कलम १० अधीन अधिकृत म्हणून असा व्यवसाय करणारी व्यक्ति सुध्दा समाविष्ट आहे;

३.'एक्झिम बँक' म्हणजे एक्स्पोर्ट-इंपोर्ट बँका ऑफ इंडिया अधिनियम, १९८१ (१९८१ चा २८) अधीन स्थापन केलेली एक्स्पोर्ट इंपोर्ट बँक ऑफ इंडिया;

४.'निर्यात' मध्ये जमिन, समुद्र किंवा हवाईमार्गे, मालप्रेषिती किंवा विक्री, भाडेपट्टा, भाडे-खरेदी, किंवा ज्या कोणत्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अन्य व्यवस्थेअधीन माल घेऊन जाणे किम्वा पाठविणे समाविष्ट आहे आणि सॉफ्टवेअरच्या बाबतीत, कोणत्याहि इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पारेषणसुध्दा समाविष्ट आहे.

५. भाडेपट्टा किंवा भाडे-खरेदी किंवा अन्य कोणात्याहि अशाच प्रकारच्या व्यवस्थेमार्गे निर्यातीच्या संबंधात 'निर्यात मूल्यात' अशा भाडेपट्ट्याच्या किंवा भाडे-खरेदीच्या किंवा अशाच प्रकारच्या अन्य व्यवस्थेच्या बाबतीत देय असलेले, कोणत्याहि नावाचे, आकार समाविष्ट आहेत,

६. 'प्रपत्र' म्हणजे या नियमनाना जोडलेले प्रपत्र;

७.'परिशिष्ट' म्हणजे या नियमनाना जोडलेले परिशिष्ट

८. 'सॉफ्टवेअर' म्हणजे कोणताहि कॉम्प्यूटर प्रोग्राम, डेटाबेस, ड्राइंग, डिझाइन, ऑडिओ/व्हिडिओ सिग्नल्स, कोणतीहि माहिती, ज्या कोणत्या नावाने ओळखली जात असेल किंवा कोणत्याहि भौतिक माध्यमाव्यतिरिक्त कोणत्याहि माध्यमात किंवा माध्यमावर घेतलेली माहिती.

९. 'विनिर्दिष्टीत अधिकारी' म्हणजे अशी व्यक्ति किंवा प्राधिकरण ज्याला नियमन ३ मध्ये विनिर्दिष्टीत केल्याप्रमाणे घोषणापत्रा द्यायचे आहे.

१०. 'कार्यकारी गट' म्हणजे स्थगित प्रदान अटीवर किंवा टर्नकी प्रकल्पांच्या किंवा नागरी बांधकाम कंत्राटाच्या कार्यवाहीत माल आणि सेवांच्या निर्यातीचे प्रस्ताव विचारात घेण्याच्या हेतूने रिझर्व बँकेने स्थापन केलेला गट;

११. या नियमनात वापरलेले पण व्याख्या न केलेले शब्द आणि अभिव्यक्ति यांचा अनुक्रमे अधिनियमात त्यांना दिलेला अर्थच लागू असेल.

**३. माल आणि सेवांच्या संबंधात घोषणापत्रः-**

(१) भौतिक स्वरूपात किंवा अन्य कोणत्याहि स्वरूपात, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, नेपाळ आणि भूतान वगळता भारताबाहेर कोणत्याहि ठिकाणी माल किंवा सॉफ्टवेअर निर्यात करणाऱ्या प्रत्येकाने, परिशिष्टात नेमून दिलेल्या प्रपत्रातील एकात आणि विनिर्दिष्टीत केला जाईल त्याप्रमाणे पुराव्याने समर्थित, खालील रकमेचे प्रतिनिधीत्व करणारा साहित्याचा सत्य आणि योग्य तपशील समाविष्ट असणारे घोषणापत्र विनिर्दिष्टीत अधिकाऱ्याला द्यावे-

(१) सेवा किंवा सॉफ्टवेअरचे पूर्ण निर्यात मूल्य; किंवा

(२) पूर्ण निर्यात मूल्य निर्यातीच्या वेळी निश्चितकरणे शक्य नसेल तर, सध्याच्या बाजारातील परिस्थितीच्या संदर्भाने समुद्रपार बाजारात माल आणि सॉफ्टवेअरच्या विक्रीद्वारे निर्यातदार अपेक्षित असलेले मूल्य, आणि सदरहू घोषणापत्रात निर्यातदार अशी खात्री देत असेल कि मालाची किंवा सॉफ्टवेअरचे पूर्ण निर्यात मूल्य विनिर्दिष्ट पध्दतीने विनिर्दिष्टीत कालावधीत प्रदान केले आहे किंवा करील.

(२) घोषणापत्र विनिर्दिष्टीत केलेल्या संचांच्या संख्येत निष्पादित केले जाईल.

(३) शंका दूर करण्यासाठी हे स्पष्ट करण्यात येत आहे कि, ज्या सेवांच्या निर्यातीला या नियमनात विनिर्दिष्टीत केलेले कोणतेहि प्रपत्र लागू होत नाही, निर्यातदार अशा सेवा कोणतेहि घोषणापत्र न देता निर्यात करू शकतो, पण अशा सेवांच्या खाती देय होणारी विदेशी चलनाची रक्कम वसूल करण्यास आणि ती अधिनियमाच्या आणि या नियमनांच्या तरतूदींनुसार, त्याचप्रमाणे अधिनियमाखाली केल्या जाणाऱ्या अन्य नियम आणि नियमनांखालीसुध्दा भारतात प्रत्यावर्तित करण्यासाठी जबाबदार असेल.

**४. सवलतीः-**

नियमन ३ मध्ये असलेले काहीही विचारात न घेता, पुढील प्रकरणात घोषणापत्र दिल्याशिवाय माल आणि सेवांची निर्यात करता येईल, ती येणेप्रमाणेः

अ) मालाचे व्यापारी नमुने आणि विनाप्रदान पुरविलेले प्रसिध्दी साहित्य;

ब) प्रवाशांच्या व्यक्तिगत वस्तू, बरोबर असोत अथवा नसोत;

क) जहाजाची सामग्री, ट्रान्स-शिपमेंट कार्गो आणि केंद्र सरकार किंवा त्यांच्या वतीने केंद्र सरकारने नियुक्त केलेले अधिकारी किंवा लष्कराच्या, नौदलाच्या आणि विमानदलाच्या गरजांसाठी लष्कराच्या, नौदलाच्या किंवा विमानदलाच्या अधिकाऱ्यांच्या आदेशाने पुरवठा केलेला माल;

ड) सदर माल युएस डॉलर पंचवीस हजारापेक्षा अधिक मूल्याचा नाही अशा निर्यातदाराच्या घोषणापत्रासह असलेला माल किंवा सॉफ्टवेअर;

इ) सदर माल युएस डॉलर पाच लाखापेक्षा अधिक मूल्याचा नाही अशा निर्यातदाराच्या घोषणापत्रासह असलेला भेटीचा माल;

फ) विमाने किंवा विमानांची इंजिने आणि सुटे भाग विदेशात ओव्हरहॉलिंग आणि/किंवा दुरुस्तीसाठी, त्यांच्या निर्यातीच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, ओव्हरहॉलिंग/दुरुस्ती नंतर त्यांच्या भारतात परत आयातीच्या अधीन;

ग) परत निर्यात तत्त्वावर विनामूल्य आयात केलेला माल;

ह) केंद्र सरकार आणि म्यानमारचे सरकार यांच्यातील बार्टर ट्रेड कराराच्या अधीन प्रति व्यवहार युएस डॉलर १००० किंवा त्याच्या सममूल्यापेक्षा अधिक नसलेला माल;

य) खालील माल जो एक्स्पोर्ट प्रोसेसिंग झोन, इलेक्ट्रॉनिक हार्डवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स, इलेक्ट्रॉनिक सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स किंवा फ्री ट्रेड झोन्सच्या विकास आयुक्तानी परत-निर्यात करण्यास परवानगी दिलेली आहे, तो येणेप्रमाणेः

१. सदोष आढळलेला माल, विदेशी पुरवठादारानी/सहयोगीद्वारा तो बदलून देण्याच्या हेतूने;

२. कर्ज तत्त्वावर विदेशी पुरवठादार/सहयोगी यांच्याकडून आयात केलेला माल;

३.उत्पादन प्रचालनानंतर अधिक असल्याचे आढळून आलेला, विदेशी पुरवठादारांकडून/सहयोगींकडून विनामूल्य आयात केलेला माल.

*१(अ) विशेष आर्थिक क्षेत्रातील युनीट्सनी कलम (१)च्या बाब क्र.(१), (२) आणि (३) वर सूचीबध्द केलेला विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकास आयुक्ताना किंवा कस्टम्सच्या संबंधित सहाय्यक आयुक्ताना किंवा उपयुक्ताना माहिती देण्याअधीन परत-निर्यात करायचा माल;*

*ज) सध्या लागू असलेल्या एक्झिम धोरणाच्या तरतूदीनुसार विनामूल्य निर्यात केलेल्या मालाच्या बदली माल.*

*क) भारतात परत आयात करण्याच्या अधीन चाचणीसाठी भारताबाहेर पाठविलेला माल;*

*ल) भारताबाहेर दुरुस्तीसाठी आणि परत आयात करण्यासाठी पाठविलेला सदोष माल, जर त्यांच्या समवेत भारतातील अधिकृत डिलरचे निर्यात दुरुस्तीसाठी आणि परत आयातीसाठी आहे आणि निर्यातीत कोणताहि विदेशी चलनातील व्यवहार अंतर्भूत नाही असे प्रमाणपत्र असेल तर;*

म) रिझर्व बॅंकेकडे केलेल्या अर्जानुसार, तिने दिलेल्या परवानगीत घालून दिलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन निर्यातीला परवानगी दिलेला माल.

**५. आयातदार-निर्यातदार संकेत क्रमांक नमूद करणे :-**

विदेश व्यापार(विकास आणि नियमन) अधिनियम, १९९२ (१९९२ चा २२) च्या कलम ७ अधीन विदेश व्यापार महासंचालनालयाने दिलेला आयातदार-निर्यातदार संकेत क्रमांक निर्यातदाराने विनिर्दिष्टित अधिकाऱ्याना सादर केलेल्या सर्व घोषणापत्रांच्या प्रतींवर आणि जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, अधिकृत डिलर किंवा रिझर्व बॅंकेबरोबरच्या सर्व पत्रव्यवहारात नमूद करावा.

**६. घोषणापत्र द्यायचे आहे असे अधिकारी आणि घोषणापत्राचा व्यवहार करण्याची पध्दत अ. जीआर/एसडीएफ प्रपत्रात घोषणापत्र**

(१) जीआर/एसडीएफ प्रपत्रातिला घोषाणापत्र दोन प्रतीत कस्टाम्स आयुक्ताना सादर करावे.

(२) घोषणापत्राची योग्य प्रकारे पडताळणी आणि अधिप्रमाणन केल्यानंतर, कस्टम्स आयुक्त मूळ घोषणापत्र/ माहिती रिझर्व बँकेच्या नजीकतम कार्यालयाकडे पाठवतील आणि दुसरी प्रत अधिकृत डिलरला सादर करण्यासाठी निर्यातदाराकडे सुपूर्द करतील.

**ब. पीपी प्रपत्रातील घोषणापत्र**

(२) (१) पीपी प्रपत्रातील घोषणापत्र प्रपत्रात नाव असलेल्या अधिकृत डिलरला दोन प्रतीत सादर करावे.

(२) अधिकृत डिलर घोषणापत्रावर प्रतिस्वाक्षरी करून, घोषणापत्राची मूळ प्रत निर्यातदाराला सुपूर्द करील जो ती ज्या टपाल अधिकाऱ्यामार्फत माल निर्यात करायचा आहे त्याला सादर करील. माल रवाना झाल्यानंतर टपाल अधिकारी घोषणापत्र रिझर्व बँकेच्या नजीकतम कार्यालयाकडे पाठवतील.

**क. सॉफ्टेक्स प्रपत्रात घोषणापत्र**

३(१) कॉम्प्यूटर सॉफ्टवेअर आणि ऑडिओ/व्हिडिओ/टेलिविजन सॉफ्टवेअरच्या निर्यातीसाठी सॉफ्टेक्स प्रपत्रातील घोषणापत्र तीन प्रतीत सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया (एटीपीआयज) किंवा भारतातील फ्री ट्रेड झोन (एफटीझेडस) किंवा एक्स्पोर्ट प्रोसेसिंग झोन्स (इपीझेडस) किंवा स्पेशल इकॉनॉमिक झोन्स येथील माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार यांच्या नियुक्त अधिकाऱ्याकडे तीन प्रतीत सादर करावा.

२. सर्व तीन प्रती प्रमाणित केल्यानंतर, सदर नियुक्त अधिकारी मूळ प्रत थेट रिझर्व बँकेच्या नजीकतम कार्यालयाला पाठवील आणि दुसरी प्रत निर्यातदाराला परत देईल. तिसरी प्रत नियुक्त अधिकारी दफ्तरासाठी ठेवून घेईल.

**ड. घोषणापत्राची दुसरी प्रत अधिकृत डिलरकडे ठेवून घेणे**

**निर्यातीचे उत्पन्न वसूल झाल्यानंतर, निर्यात घोषणापत्राच्या दुसऱ्या प्रती म्हणजेच जीआर. पीपी आणि सॉफ्टेक्स आणि नौप्रेष बिलांच्या एक्स्चेंज कंट्रोल प्रती, संबंधित संविधिक घोषणापत्रांसह अधिकृत डिलरने ठेवून घ्याव्यात.**

**७. घोषणापत्राच्या पुष्ट्यर्थ पुरावा :-**

कस्टम्स आयुक्त किंवा टपाल अधिकारी किंवा माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे अधिकारी ज्यांना घोषणापत्र सादर केले जाते, त्यांना अधिनियमाच्या कलम ७ च्या आणि या नियमनांच्या पूर्ततेबाबत स्वतःचे समाधान करून घेण्यासाठी घोषणापत्राच्या पुष्ट्यर्थ खालील स्थापित करणारा पुरावा आवश्यक असेल-

अ) निर्यातदार भारतातील निवासी व्यक्ति आआहे आणि तिचे भारतात व्यवसायाचे ठिकाण आहे;

ब) घोषणापत्रात जाहीर केलेले ठिकाण हे माल निर्यात करण्याचे अंतिम ठिकाण आहे;

क) घोषणापत्रात प्रतिपादित केलेले मूल्य

१. माल किंवा सॉफ्टवेअरच्या पूर्णा मूल्याचे प्रतिनिधिक आहे; किंवा

२. जेथे निर्यातीच्या वेळी मालाचे किंवा सॉफ्टवेअरचे पूर्ण निर्यात मूल्य निश्चित करता येणे शक्य नसेल, बाजारातील सध्याच्या परिस्थितीच्या संदर्भात समुद्रपार बाजारात मालाच्या विक्रीतून निर्यातदाराला अपेक्षित असलेले मूल्य.

**स्पष्टीकरणः**

या नियमनांच्या हेतूने, 'अंतिम ठिकाण' म्हणजे अंतिमतः ज्या देशात माल आयात केला जातो आणि त्या देशाच्या कस्टम्समार्फत मोकळा केला जातो.

**८. मालाच्या निर्यात मूल्याच्या प्रदानाची पध्दत :-**

रिझर्व बँकेने अन्यथा अधिकार दिल्याविना, निर्यात केलेल्या मालाच्या पूर्ण निर्यात मूल्याचे प्रतिनिधीत्व करणारी रक्कम अधिकृत डिलरमार्फत विदेशी विनिमय व्यवस्थापन (प्राप्ती आणि प्रदानाच्या पध्दती) नियमने, २००० मध्ये विनिर्दिष्टित पध्दतीने प्रदान केले जावे.

**स्पष्टीकरणः**

या नियमनाच्या हेतूने, नियमन ३ अधीन ज्या मालाच्या संबंधात घोषणापत्र दिले आहे त्याच्या निर्यात मूल्याच्या वसूलीसाठी विनिर्दिष्टीत कालावधीच्या आत, भारतात परत आयात, अशा मालाच्या पूर्ण निर्यात मूल्याची वसूली मानण्यात येईल.

**९. ज्या कालावधीच्या आत मालाचे/सॉफ्टवेअरचे निर्यात मूल्य वसूल करायचेः-**

१. निर्यात केलेल्या मालाच्या किंवा सॉफ्टवेअरच्या पूर्ण निर्यात मूल्याचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या रकमेची वसूली करावी आणि निर्यातीच्या तारखेपासून १२ महिन्यांच्या आत भारतात प्रत्यावर्तित करावी :

**परंतु माल आणि सॉफ्टवेअर जर विशेष आर्थिक क्षेत्रातील युनीट्सद्वारा निर्यात करण्यात आला असेल तर मालाच्या किंवा सॉफ्टवेअरच्या पूर्ण निर्यात मुल्याच्या वसूलीचा आणि भारतात प्रत्यावर्तित करण्याचा नियम लागू होणार नाही.**

परंतु रिझर्व बँकेच्या परवानगीने भारताबाहेर स्थापित वेअरहाऊसला माल निर्यात करण्यात आला असेल तर निर्यात केलेल्या मालाचे पूर्ण मूल्य वसूल झाल्यावर लगेच आणि कोणत्याहि परिस्थितीत मालाच्या नौप्रेषाच्या तारखेपासून पंधरा महिन्यांच्य आत अधिकृत डिलर बँकेला प्रदान करावे.

परंतु त्याही पुढे रिझर्व बँक किंवा त्या बँकेने या बाबतीत निर्गमित केलेल्या आदेशाच्या अधीन, पुरेसे आणि योग्य कारण दाखविल्यास, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, सदरहू सहा किंवा पंधरा महिन्यांचा कालावधी वाढवीला.

*२(अ) जेथे लागू असलेल्या विदेश व्यापार धोरणात केलेल्या व्याख्येप्रमाणे, प्रतिष्ठाधारक निर्यातदाराने मालाची किंवा सॉफ्टवेअरची निर्यात केली असेल, तर उपनियमन (१) मध्ये असलेले काहीहि लक्षात न घेता, मालाच्या किंवा सॉफ्टवेअरच्या पूर्ण मूल्याचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या रकमेची वसूली करावी आणि ती निर्यातीच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या आत भारतात प्रत्यावर्तित करावी;*

*परंतु पुरेसे आणि योग्य कारण दाखविल्यास रिझर्व बँक सदरहू बारा महिण्यांचा कालावधी वाढवील.*

*(ब) पुरेशा आणि योग्य कारणासाठी रिझर्व बँक आदेश देईल कि, सदरहू निर्यातदार यापुढे उपनियमन (२) ने शासित राहणार नाहीतः परंतु युनीटला या विषयावर निवेदन करण्याची योग्य संधि दिलेली असल्याशिवाय असा आदेश दिला जाणार नाही;*

*अशा आदेशानंतर, सदरहू निर्यातदार, रिझर्व बँकेने अन्यथा आदेश देईपर्यंत उपनियमन (१) च्या तरतूदीनी शासित राहील*

**स्पष्टीकरणः**

या नियमनाच्या हेतूने, भौतिक स्वरूपाखेरीज अन्य प्रकारे सॉफ्टवेअरच्या निर्यातीशी संबंधित 'निर्यातीची तारीख' अशी निर्यात अंतर्भूत असणाऱ्या बीजकाची तारीख मानण्यात येईल.

**१०. वाढवलेल्या क्रेडिट अटीवर निर्यात :-**

कोणतीहि व्यक्ति अशा अटीवर मालाच्या निर्यातीसाठी करार करणार नाही जी निर्यात करायच्या मालाच्या मूल्याच्या प्रदानासाठी सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीची तरतूद करते :

परंतु पुरेसे आणि योग्य कारण दाखविल्यास, रिझर्व बँक अशा अटीवर करार करण्यास मंजूरी देईल.

**११. निर्यात कागदपत्रे सादर करणे :-**

निर्यातीशी संबंधित कागदपत्रे, निर्यातीच्या तारखेपासून किंवा सॉफ्टेक्स प्रपत्राच्या प्रमाणीकरणाच्या तारखेपासून, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, २१ दिवसांच्या आत संबंधित घोषणापत्रात नमूद केलेल्या अधिकृत डिलरला सादर करावेतः

परंतु रिझर्व बँकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांच्या अधीन, अधिकृत डिलर बँक निर्यातदाराच्या नियंत्रणाबाहेरील कारणासाठी, विनिर्दिष्टीत २१ दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर सादर केलेले निर्यातीशी संबंधित कागदपत्र स्वीकारील.

**१२. कागदपत्रांचे हस्तांतरण :-**

उपनियमन ३ च्या बाबतीतील कोणत्याहि पूर्वग्रहाविना, अधिकृत डिलर त्यांच्या घटकाकडून (उपनियमन ३ च्या अटीनुसार घोषणापत्रावर सही न केलेली व्याक्ति) निर्यात अंतर्भूत असणारे बीजक आणि हुंडीसहित नौप्रेष कागदपत्र वाटाघाटी आणि वसूलीसाठी स्वीकारू शकेलः

परंतु अशी कागदपत्रे वाटाघाटी किंवा वसूलीसाठी स्वीकारण्यापूर्वी अधिकृत डिलरने-

अ) जेथे घोषणापत्रात जाहीर केलेले मूल्य वाटाघाटी केल्या जाणाऱ्या किंवा वसूलीसाठी पाठविलेल्या कागदपत्रात दाखविलेल्या मूल्यापेक्षा वेगळे नसेल, किंवा

ब) जेथे घोषणापत्रात जाहीर केलेले मूल्य वाटाघाटी केल्या जाणाऱ्या किंवा वसूलीसाठी पाठविलेल्या कागदपत्रात दाखविलेल्या मूल्यापेक्षा कमी असेल,अशा घोषणापत्रावर संबंधित घटकाला सुध्दा सही करायला सांगावी अणि त्यानंतर असा घटक अशा आवश्यकता पूर्ण करण्यास बांधील असेल आणि घोषणापत्रावर सही करणारा असा घटक या नियमनांच्या हेतूसाठी वाटाघाटी केल्या जाणाऱ्या किंवा वसूलीसाठी पाठविलेल्या कागदपत्रात दाखविलेल्या पूर्ण मूल्यासाठी निर्यातदार समजला जाईल आणि त्यानुसार या नियमनानी शासित असेल.

**१३. निर्यातीसाठी प्रदान :-**

नियमन ३ अधीन घोषणापत्र आवश्यक असलेल्या कोणत्याहि मालाच्या किंवा सॉफ्ट्वेअरच्या निर्यातीच्या बाबतीत, कोणत्याहि व्यक्तिने रिझर्व बँकेच्या परवानगीविना, किंवा रिझर्व बँकेच्या आदेशाअधीन, अधिकृत डिलरच्या परवानगीविना, कोणतीहि कृती करण्यापासून दूर रहावे जिचा परिणाम-

१. मालासाठी किंवा सॉफ्टवेअरसाठी प्रदान, विनिर्दिष्टीत केलेल्या पध्दतीपेक्षा अन्य प्रकारे करण्यात होईल, किंवा

२. प्रदान या नियमनात विनिर्दिष्टित केलेल्या कालावधीच्या पलिकडे दिरंगाईने करण्यात होईल; किंवा

३. निर्यात केलेल्या मालाच्या किंवा सॉफ्टवेअरच्या विक्रीचे उत्पन्न, रिझर्व बँकेने किंवा, रिझर्व बँकेच्या आदेशाच्या अधीन, अधिकृत डिलरने अनुज्ञेय केलेल्या कपातीच्या अधीन, मालाच्या किंवा सॉफ्टवेअरच्या पूर्ण निर्यात मूल्याचे प्रतिनिधीत्व करीत नसेल.

परंतु विनिर्दिष्टीत कालावधी समाप्त झाल्याशिवाय आणि मालाच्या किंवा सॉफ्टवेअरच्या पूर्ण निर्यात मूल्याचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या, किंवा खंड (३) अधीन अनुज्ञेय कपातीनंतर मूल्याचे प्रदान, विनिर्दिष्ट पध्दतीने विनिर्दिष्ट कालावधीत केले नसल्यास या तरतूदींच्या उल्लंघनाच्या बाबतीत कारवाई केली जाऊ नये.

**१४. पूर्वानुमति आवश्यक असलेल्या काही निर्याती**

**अ. भाडेपट्ट्यावर, भाड्याने वगैरे मालाची निर्यात**

रिझर्व बँकेच्या पूर्वानुमतिविना कोणत्याहि व्यक्तिने, जमिनीवरून, समुद्र किंवा हवाईमार्गे, कोणत्याहि व्यवस्थेखाली किंवा अशा मालाची विक्री किंवा विल्हेवाटीव्यतिरिक्त अन्य कोणत्याहि प्रकारे भाडेपत्याने किंवा भाड्याने भारतातून भारताबाहेरील कोणत्याहि ठिकाणी माल पाठवू किंवा घेऊ नये.

**ब. व्यापारी करार/रुपया क्रेडिट वगैरेखाली निर्यात**

**१.** केंद्र सरकार आणि विदेशी देशाचे सरकार यांच्यातील विशेष व्यवस्थेखाली, किंवा केंद्र सरकारने विदेशी राज्याच्या सरकारला दिलेल्या रुपया क्रेडिटखाली मालाची निर्यात भारतातील व्यापार नियंत्रक प्राधीकरणाने निर्गमित केलेल्या संबंधित जाहीर सूचनांमध्ये ठरवून दिलेल्या अटी आणि शर्तींनी आणि रिझर्व बँकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनी शसित असतील.

२. भारतातून निर्यातीला वित्तपुरवठा करण्यासाठी एक्झिम बँकेने विदेशी राज्यात प्रचालन करणाऱ्या बँकेला किंवा वित्तीय संस्थेला दिलेल्या लाइन ऑफ क्रेडिटखालील निर्यात, रिझर्व बँकेने अधिकृत डिलर्सना वेळोवेळी कळविलेल्या अटी आणी शर्तींनी शासित असतील.

**क. प्रतिव्यापार**

भारतातून निर्यात केलेल्या मालाच्या मूल्यासमक्ष भारतात आयात केलेल्या मालाचे मूल्य समायोजित करण्याच्या कोणत्याहि व्यवस्थेला रिझर्व बँकेची पूर्वानुमति आवश्यक असेल.

**१५. प्रदानाच्या प्राप्तीत दिरंगाई ;**

माल किंवा सॉफ्टवेअर, ज्यांची निर्यात विनिर्दिष्टीत प्रपत्रावर घोषित करणे आवश्यक असते, त्यांच्याशी संबंधित विनिर्दिष्टीत कालवधी समाप्त झालेला असेल आणि त्याच्यासाठी वर म्हटल्याप्रमाणे प्रदान केले गेले नसेल, रिझर्व बँक, ज्याने माल किंवा सॉफ्टवेअरची विक्री केली आहे किंवा त्यापैकी माल किंवा सॉफ्टवेअरच्या विक्रीसाठी जबाबदार आहे अशा कोणत्याहि व्यक्तिला, तातडीचा आहे असा आदेश, खालील प्राप्त करण्यासाठी देऊ शकते.

(अ) माल किंवा सॉफ्टवेअर जर विकाला असेल तर त्यासाठी प्रदान आणी (ब) जर माल किंवा सॉफ्टवेअर विकले नसेल तर किंवा परिस्थितीमुळे त्याच्या भारतात परत आयात केल्यासाठी, मालाची विक्री आणि त्याचे प्रदान, यासाठी, याबाबतीत रिझर्व बँकेने विनिर्दिष्टीत केलेल्या कालावधीच्या आत प्राप्त करण्यासाठी;

परंतु रिझर्व बँकेची आदेश देण्यातील चूक व्यक्तिला तिने केलेल्या उल्लंघनातून मुक्त करीत नाही.

**१६. निर्यातीसमक्ष आगाऊ प्रदान :-**

(१) जेथे निर्यातदार, भारताबाहेरील ग्राहकाकडून आगाऊ प्रदान प्राप्त होते (सव्याज किंवा व्याजाशिवाय), निर्यातदाराचे कर्तव्य ठरते कि, त्यांने खात्री करून घ्यावी कि,

१) आगाऊ प्रदानाच्या प्राप्तीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत माल नौप्रेष केला जाईल;

२) आगाऊ प्रदानावरील व्याजाचा दर, जर काही देय असेल तर, लंडन इंटरबँक ऑफरड रेट (लिबॉर) + १०० पॉइंटसपेक्षा अधिक असणार नाही; आणि

३) नौप्रेष अंतर्भूत असणारी कागदपत्रे अधिकृत डिलरमार्फत मार्गस्थ केली जातील ज्याला आगाऊ प्रदान प्रापत झाले आहे.

परंतु आगाऊ प्रदान प्राप्त झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत निर्यातदाराच्या, अंशतः किंवा संपूर्ण नौप्रेष करण्यातील असफलतेच्या प्रसंगात, आगाऊ प्रदानाच्या न वापरलेल्या हिश्शाच्या परताव्यासाठी किंवा व्याजाच्या प्रदानापोटी, सदरहू एक वर्षाच्या कालावधीच्या समाप्तीनंतर कोणतेहि वित्तप्रेषण, रिझर्व बँकेच्या पूर्वानुमतिविना करण्यात येऊ नये.

(२) उपनियमन (१) च्या खंड (१) मध्ये असलेले काहीही लक्षात न घेता, जेथे निर्यात करारात आगाऊ प्रदानाच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधी पलिकडे मालाच्या नौप्रेषासाठी तरतूद आहे, निर्यातदाराला रिझर्व बँकेची पूर्वानुमति आवश्यक आहे.

**१७. काही प्रकरणात रिझर्व बँकेद्वारा आदेशांचे निर्गमन :-**

नियमन ३ मधील घोषित करणे आवश्यक असलेल्या मालाच्या किंवा सॉफ्टवेअरच्या संबंधातील तरतूदींविषयी कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय, मालाचे पूर्ण निर्यात मूल्य किंवा त्या वेळच्या परिस्थितीत समुद्रपार बाजारात मालाच्या किंवा सॉफ्टवेअरच्या विक्रीद्वारे निर्यातदाराला अपेक्षीत असणारे मूल्य, जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, योग्य वेळी आणि दिरंगाईशिवाय प्राप्त होण्यासाठी, रिझर्व बँक, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, वेळोवेळी आदेश देईल कि, कोणत्याहि ठिकाणी मालाच्या किंवा सॉफ्टवेअरच्या निर्यातीसाठी किंवा कोणत्याहि वर्गातील निर्यात व्यवहारासाठी किंवा कोणत्याहि वर्गातील मालासाठी किंवा सॉफ्टवेअरसाठी किंवा कोणत्याहि वर्गातील निर्यातदारासाठी, निर्यातदाराने, निर्यातीपूर्वी, येणेप्रमाणे आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अटींची पूर्तता करावी;

अ) मालाचे किंवा सॉफ्टवेअरचे मूल्य रद्द न करता येणाऱ्या पतपत्राद्वारे किंवा आदेशात दर्शविलेल्या अशा कोणत्याहि व्यवस्थेद्वारे किंवा कागदपात्राद्वारे संरक्षित असेल;

**ब) विनिर्दिष्टीत अधिकाऱ्याला द्यायचे कोणतेहि घोषणापत्र, अधिकृत डिलरला त्याच्या पूर्वानुमतिसाठी सादर करण्यात येईल, जी रिझर्व बँकेने वेळोवेळि निर्गमित केलेल्या आदेशात विनिर्दिष्टीत केलेल्या अटींच्या अधीन परिस्थितीचा विचार करून दिली जाईल अथवा राखून ठेवली जाईल.**

क) विनिर्दिष्टित अधिकाऱ्याला द्यायच्या घोषणपत्राची प्रत अशा अधिकाऱ्याला किंवा संघटनेला आदेशात दर्शविल्याप्रमाणे, घोषणापत्रात विनिर्दिष्टीत केलेले मालाचे किंवा सॉफ्टवेअरचे मूल्य त्याच्या योग्य मूल्याचे प्रतिनिधीत्व करते असे प्रमाणित करण्यासाठी सादर केली जाईल.

**(२) उपनियमन (१) खालील कोणताही आदेश रिझर्व बँकेने किंवा त्या उपनियमनाच्या खंड (२) खालील कोणतीही मंजूरी अधिकृत डिलरने, निर्यातदाराला त्या बाबतीत आपले म्हणने मांडण्याची संधी दिल्याशिवाय, राखून ठेवू नये.**

**१८. प्रकल्प निर्यात**

जेथे मालाची किंवा सॉफ्टवेअरची निर्यात स्थगित प्रदान तत्त्वावर किंवा टर्नकी प्रकल्पाच्या कार्यवाहीत किंवा नागरी बांधाकामाच्या कंत्राटात करण्याचे प्रस्तावित आहे, निर्यातदाराने, अशा निर्यातीसाठी कोणतीहि व्यवस्था करण्यापूर्वी, मंजूरी अधिकाऱ्याच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करावा, जो रिझर्व बँकेने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रस्तावाचा विचार करील.

**स्पष्टीकरण:**

या नियमनाच्या हेतूसाठी 'मंजूरी अधिकारी' म्हणजे कार्यकारी गट किंवा एक्झिम बँक किंवा अधिकृत डिलर.

**(पी. आर. गोपाल राव)**
कार्यकारी संचालक

**शेड्युल्ड**
**नियम ३ चा संदर्भ घ्यावा)**

**प्रपत्र जीआर**: भौतिक स्वरूपातील सॉफ्टवेअरच्या म्हणजेच चुंबकीय टेप्स/डिस्कस आणि कागदी माध्यमे, निर्यातीसहित टपालाखेरीज अन्य प्रकारे निर्यातीसाठी दोन प्रतीत पूर्ण करायचा.

**प्रपत्र एसडीएफः** दोन प्रतीत पूर्ण करायचा आणि नौप्रेष बिलाला जोडायचा, केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या नौप्रेष बिलांच्या प्रक्रियेसाठी इलेक्ट्रॉनिक डेटा इंटरचेंज (इडीआय) यंत्रण सुरू करणाऱ्या केंद्र सरकारद्वारे अधिसूचित केलेल्या कस्टम्स कार्यालयांकडे घोषित करायचा.

**पीपी प्रपत्रः** टपालाद्वारे निर्यातीसाठी दोन प्रतीत पूर्ण करायच.

**सॉफ्टेक्स प्रपत्र** : भौतिक स्वरूपाखेरीज अन्य प्रकारे सॉफ्टावेअरच्या म्हणजेच चुंबकीय टेप्स/डिस्कस, आणी कागदी माध्यमे, निर्यातीसाठी तीन प्रतीत पूर्ण करायचा.

अधिसूचना क्र. एफइएमए ३६/२००१-आरबी दिनांक फेब्रुवारी २७, २००१
जी.एस.आर.११९(ई)/मार्च २१,२००१ द्वारे सुधारित

अधिसूचना क्र. एफइएमए ५७/२००२-आरबी दिनांक एप्रिल १, २००२
जी.एस.आर.४७३(ई)/जुलै ८,२००२ द्वारे सुधारित

अधिसूचना क्र. एफइएमए ९९/२००३-आरबी दिनांक ऑगस्ट २७, २००३
जी.एस.आर.७७३(ई)/सप्टेंबर २९,२००३ द्वारे सुधारित

अधिसूचना क्र. एफइएमए १०७/२००३-आरबी दिनांक ऑक्टोबर २९, २००३
जी.एस.आर.९०० (ई)/डिसेंबर २२,२००३ द्वारे सुधारित

अधिसूचना क्र. एफइएमए ११४/२००४-आरबी दिनांक मार्च १३, २००४
जी.एस.आर.२७९ (ई)/एप्रिल २३,२००४ द्वारे सुधारित

अधिसूचना क्र. एफइएमए ११६/२००४-आरबी दिनांक मार्च २५, २००४
जी.एस.आर.३५२(ई)/जून ८,२००४ द्वारे सुधारित

अधिसूचना क्र. एफइएमए १७६/२००८-आरबी दिनांक जुलै २३, २००८
जी.एस.आर.५७६(ई)/ ऑगस्ट ५,२००८ द्वारे सुधारित

## फॉर्म्स – जीआर,एसडीएफ,पीपी आणि सॉफ्टेक्स

### चलन नियंत्रण घोषणापत्र (जीआर) फॉर्म क्रमांक मूळ

(ओरिजनल)

| | | |
|---|---|---|
| निर्यातदार | इनव्हॉईस क्रमांक व दिनांक | एसबी क्रमांक व दिनांक |
| | ए आर ४/ एआर ४ ए क्रमांक<br>दिनांक | |
| | क्यु/प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | इंपोर्टर एक्सपोर्टर कोड नं. |
| कनसायनी | एक्सपोर्ट ट्रेड कंट्रोल | |
| | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | च्या निर्यातीखाली असल्यास | |
| | | | डिफरड क्रेडिट | |
| | | | जॉईंट व्हेंचर | |
| | | | रुपी क्रेडिट | |
| | | | इतर | |
| कस्टम हाऊस एजंट | आय/स<br>ी<br>क्रमांक | | आरबीआयचा मंजुरी / परिपत्रक क्र. व दिनांक | |
| | | | | |
| च्या कडून प्रि-कॅरिएज | प्रि-<br>कॅरिए<br>जला<br>मिळाल<br>याचे<br>स्थळ | | शिपमेंटचा प्रकार | |
| | | | थेट (आऊटराईट) विक्री | |
| | | | कनसाईनमेंट निर्यात | |
| | | | इतर (तपशील द्यावा) | |
| | | | सी अँड एफ | |
| जहाज/उड्डाण क्रमांक | परिवल<br>ान<br>क्रमांक | | एफ/ओबी | |
| | लेडिंग<br>केल्याच<br>े पोर्ट | | | |
| | | इतर (तपशील द्यावा) | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पोर्ट ऑफ डिसचार्ज | | इष्टस्थळाच्या देशाचे नाव | चलन कायद्याच्या (सीए) कलम १४ खाली विनियमयदर इनव्हॉईसचे चलन | | |
| | | | | | | |
| अनु | खुणा व अंक | कंटेनर्स प्रकार व | पॅकेजेस प्रकार व संख्या | स्टॅटिस्टिकल कोड व | संख्या / परिमाण | एफओबी |

| क्रमांक | | संख्या | | मालाचे वर्णन | | मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | निव्वळ वजन | | | | | |
| | एकंदर वजन | | | | | |

| | एकूण एफओबी मूल्य (शब्दांमध्ये) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| निर्यात मूल्याचे विश्लेषण | | चलन | रक्कम | संपूर्ण निर्यातमूल्य किंवा असे मूल्य-निर्धारण करता येत नसल्यास, माल विकल्यानंतर निर्यातदाराला अपेक्षित मूल्य | |
| एफओबी मूल्य<br>फ्रेट<br>विमा | | | | | |
| | | | | | |
| | | | | चलन | |
| दलालीचा दर | | | | | |
| सूट/सवलत<br>इतर वजावट | | | | रक्कम | |
| | | | | | |

**चलन नियंत्रण घोषणापत्र (जीआर) फॉर्म क्रमांक**

| निर्यात एल/सी व्यवस्थेखाली आहे काय? | होय | | नाही | | कस्टमसाठी |
|---|---|---|---|---|---|
| होय असल्यास भारतामधील सल्लागार बँकेचे नाव | | | कस्टमद्वारा निर्धारणीय मूल्य. रु. - | | |
| | | | | | |
| ज्या बँकेमार्फत प्रदान मिळणार आहे तोचे नाव | | | (रुपये) | | |
| | | | निर्यातमूल्य पडताळून पाहण्यात आले आहे. | | |
| | | | | कस्टम्स अप्रेझर | |
| एसीयूच्या मार्फत प्रदान मिळणारे आहे काय - होय/नाही | | | | माल पाठविल्याचा दिनांक | कस्टम्स अप्रेझर |

विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९,खाली द्यावयाचे घोषणापत्र मी/आम्ही येथे घोषित करत आहोत की, ज्या मालाबाबत मी/आम्ही हे घोषणापत्र दिले आहे त्या मालाचे मी/आम्ही* सेलर / कन्सायनी आहे/आहोत आणि वर दिलेली माहिती सत्य आणि *(अ) खरेदीदाराबरोबरच्या कंत्राटानुसार असलेले निर्यात मूल्य हे वर घोषित केलेल्या संपूर्ण निर्यात मूमूल्याएवढएच आहे *(ब) निर्यात करतेवेळी मालाचे संपूर्ण मूल्य निश्चित करता येण्यासारखे नव्हते आणि घोषित केलेले मूल्य हे, सध्या असलेल्या बाजार परिस्थितीनुसार, विदेशी मार्केटमध्ये विक्री केल्यास मला/आम्हाला अपेक्षित असलेल्या मूल्याएवढे आहे.

मी / आम्ही जबाबदारी घेत आहोत की, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ साली तयार केलेल्या विनियमात निर्देशित केल्याप्रमाणे, वर निर्देश केलेल्या बँकेला निर्यात केलेल्या मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य विदेशी चलनामध्ये @.......................... रोजी किंवा त्याआधी पाठविले जाईल. मी/आम्ही असेही घोषित करतो की मी / आम्ही भारतामधील रहिवासी आहे / आहोत, आणि माझी /आमची भारतात धंदासाठी जागा आहे.

मी/आम्ही आहे / आहोत किंवा नाही रिझर्व्ह बँकेच्या कॉशन लिस्टवर माझे/आमचे नाव नाही.

दिनांक

| |
|---|
| (निर्यातदाराची स्वाक्षरी) |
| @ प्रदान मिळण्याचा अंदाजे दिनांक लिहावा. हा माल पाठविल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आतील असला पाहिजे. परंतु रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने भारताबाहेर स्थापित असलेल्या गोदामांना (वेअरहाऊसेस) केलेल्या निर्यातीसाठी माल दिल्याचा (डिलिव्हरी) दिनांक पंधरा महिन्यांच्या आत असणे आवश्यक आहे. |
| *लागु नसेल ते खोडा. |
| भारतीय रिझर्व बँकेला उपयोगाची जागा |

## चलन नियंत्रण घोषणापत्र (जीआर) फॉर्म क्रमांक

(डुप्लिकेट)

| निर्यातदार | इनव्हॉईस क्र. व दिनांक | एसबी क्रमांक व दिनांक |
|---|---|---|
| | ए आर ४/ एआर ४ ए क्रमांक<br>दिनांक | |
| | क्यु/प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | इंपोर्टर एक्सपोर्टर कोड नं. |
| कनसायनी | एक्सपोर्ट ट्रेड कंट्रोल | |

| | | |
|---|---|---|
| | च्या निर्यातीखाली असल्यास | |
| | डिफरड क्रेडिट | |
| | जॉईंट व्हेंचर | |
| | रुपी क्रेडिट | |
| | इतर | |
| कस्टम हाऊस एजंट | आय/सी क्रमांक | आरबीआयचा मंजुरी / परिपत्रक क्र. व दिनांक |
| | | |
| च्या कडून प्रि-कॅरिएज | प्रि-कॅरिएज ला मिळाल्याचे स्थळ | शिपमेंटचा प्रकार |
| | | थेट (आऊटराईट) विक्री |
| | | कनसाईनमेंट निर्यात |
| | | इतर (तपशील द्यावा) |
| जहाज/उड्डाण क्रमांक | परिवलन क्रमांक | |
| | लेडिंग केल्याचे पोर्ट | कॉंट्रॅक्टचे स्वरुप<br>सीआयएफ   एफ/ओबी |
| | | इतर (तपशील द्यावा) |

| पोर्ट ऑफ डिसचार्ज | इष्टस्थळाच्या देशाचे नाव | चलन कायद्याच्या (सीए) कलम १४ खाली विनियमयदर इनव्हॉईसचे चलन |
|---|---|---|

| अनु क्रमांक | खुणा व अंक | कंटेनर्स | पॅकेजेस प्रकार व संख्या | स्टॅटिस्टिकल | संख्या / परिमाण | एफओबी मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|

| | | प्रकार व संख्या | | कोड व मालाचे वर्णन | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| | निव्वळ वजन | |
| | एकंदर वजन | |

| | | |
|---|---|---|
| | एकूण एफओबी मूल्य (शब्दांमध्ये) | |

| निर्यात मूल्याचे विश्लेषण | | चलन | रक्कम | संपूर्ण निर्यातमूल्य किंवा असे मूल्य-निर्धारण करता येत नसल्यास, माल विकल्यानंतर निर्यातदाराला अपेक्षित मूल्य | |
|---|---|---|---|---|---|
| एफओबी मूल्य<br>फ्रेट<br>विमा | | | | | |
| | | | | | |
| | | | | चलन | |
| दलालीचा दर | | | | | |
| सूट/सवलत<br>इतर वजावट | | | | रक्कम | |
| | | | | | |

## चलन नियंत्रण घोषणापत्र (जीआर) फॉर्म क्रमांक

| निर्यात एल/सी व्यवस्थेखाली आहे काय? | होय | | नाही | | कस्टमसाठी | |
|---|---|---|---|---|---|---|
| होय असल्यास भारतामधील सल्लागार बँकेचे नाव | | | | | कस्टमद्वारा निर्धारणीय मूल्य. रु. - | |
| | | | | | | |
| ज्या बँकेमार्फत प्रदान मिळणार आहे तिचे नाव | | | | | (रुपये) | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | निर्यातमूल्य पडताळून पाहण्यात आले आहे. | |
| | | | | | माल/संपूर्णतः / अंशतः पाठविण्यात आला आहे. | |
| | | | | | परिमाण | |
| | | | | | मूल्य | |
| | | | | | | |
| एसीयूच्या मार्फत प्रदान मिळणारे आहे काय - होय/नाही | | | | | माल पाठविल्याचा दिनांक | |
| | | | | | | |
| | | | | | | |

विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९,खाली द्यावयाचे घोषणापत्र मी/आम्ही येथे घोषित करत आहोत की, ज्या मालाबाबत मी/आम्ही हे घोषणापत्र दिले आहे त्या मालाचे मी/आम्ही* सेलर / कन्सायनी आहे/आहोत आणि वर दिलेली माहिती सत्य आणि *(अ) खरेदीदाराबरोबरच्या कंत्राटानुसार असलेले निर्यात मूल्य हे वर घोषित केलेल्या संपूर्ण निर्यात मूमूल्याएवढएच आहे *(ब) निर्यात करतेवेळी मालाचे संपूर्ण मूल्य निश्चित करता येण्यासारखे नव्हते आणि घोषित केलेले मूल्य हे, सध्या असलेल्या बाजार परिस्थितीनुसार, विदेशी मार्केटमध्ये विक्री केल्यास मला/आम्हाला अपेक्षित असलेल्या मूल्याएवढे आहे.

मी / आम्ही जबाबदारी घेत आहोत की, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ साली तयार केलेल्या विनियमात निर्देशित केल्याप्रमाणे, वर निर्देश केलेल्या बँकेला निर्यात केलेल्या मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य विदेशी चलनामध्ये ......................... रोजी किंवा त्याआधी पाठविले जाईल. मी/आम्ही असेही घोषित करतो की मी / आम्ही भारतामधील रहिवासी आहे / आहोत, आणि माझी /आमची भारतात धंदासाठी जागा आहे.

| | |
|---|---|
| रिझर्व्ह बँकेच्या कॉशन लिस्टवर माझे/आमचे नाव नाही. | |

दिनांक

(निर्यातदाराची स्वाक्षरी)

@ प्रदान मिळण्याचा अंदाजे दिनांक लिहावा. हा माल पाठविल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आतील असला पाहिजे. परंतु रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने भारताबाहेर स्थापित असलेल्या गोदामांना (वेअरहाऊसेस) केलेल्या निर्यातीसाठी माल दिल्याचा (डिलिव्हरी) दिनांक पंधरा महिन्यांच्या आत असणे आवश्यक आहे.

| |
|---|
| *लागु नसेल ते खोडा. |

| अधिकृत डीलरच्या उपयोगासाठी |
|---|
| युनिफॉर्म कोड<br>क्रमांक |

| *लागु असेल त्या ( ) कंसात दाखवावे. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) तडजोड/सादर करण्याचा दिनांक | | (२) डीपी | | (३) देयक क्रमांक | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| देयकाचा प्रकार * (१) डीए | | (२) डीपी | | (३) इतर तपशील द्यावा | | |
| विक्री कंत्राटामधील शिपमेंटचा प्रकारः *(१) पक्का | | | | | | |
| (३) इतर (तपशील द्यावा) | | | | | | |
| -------- रोजी संपणाऱ्या पंधरवड्यासाठी, आर रिटर्नसह रिझर्व्ह बँकेला रोजी पाठविलेल्या विवरणपत्रामध्ये, हा जीआर फॉर्म समाविष्ट केला गेला होता. | | | | | | |
| आम्ही प्रमाणित करुन पुष्टि देतो की, या फॉर्ममध्ये घोषित केलेल्या निर्यात मोबदल्याची एकूण रक्कम ------------(मुद्रा) (रक्कम) खाली दिल्याप्रमाणे आम्हाला मिळाली आहे. | | | | | | |

| मिल्याचा दिनांक | मुद्रा | -----------या देशात नोस्ट्रो खात्यात जमा (क्रेडिट) | | ----- या देशातील बँकेच्या एन आर रुपी खात्यातून वजा (डेबिट) | | आरबीआयला वसुली झाल्याचे, ज्याद्वारे कळविण्यात आले होते त्या आर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आमच्या नावे | आमच्या नावे | आमचेकडे असलेली | आमचेकडे असलेली | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |
| *(संबंधित असलेल्या भारतीय अधिकृत डीलर शाखेचे नाव लिहावे) | | | | | | |

| | |
|---|---|
| मिळाल्याची अन्य रीत (तपशील द्यावा) | |
| | |
| | (अधिकृत प्रतिनिधीचा शिक्का व स्वाक्षरी) |
| दिनांक : | |
| पत्ता : | |

## आरबीआयच्या उपयोगाची जागा

| |
|---|
| |

**एसडीएफ**
(अधिनियम ३(१))
**(ड्युप्लिकेट)**

शिपिंग बिल
क्र.                                        दिनांक

**विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ खाली द्यावयाचे घोषणापत्र**

विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९,खाली द्यावयाचे घोषणापत्र मी/आम्ही येथे घोषित करत आहोत की, ज्या मालाबाबत मी/आम्ही हे घोषणापत्र दिले आहे त्या मालाचे मी/आम्ही* सेलर / कन्सायनी आहे/आहोत आणि वर दिलेली माहिती सत्य आणि *(अ) खरेदीदाराबरोबरच्या कंत्राटानुसार असलेले निर्यात मूल्य हे वर घोषित केलेल्या संपूर्ण निर्यात मूमूल्याएवढएच आहे *(ब) निर्यात करतेवेळी मालाचे संपूर्ण मूल्य निश्चित करता येण्यासारखे नव्हते आणि घोषित केलेले मूल्य हे, सध्या असलेल्या बाजार परिस्थितीनुसार, विदेशी मार्केटमध्ये विक्री केल्यास मला/आम्हाला अपेक्षित असलेल्या मूल्याएवढे आहे.

मी / आम्ही जबाबदारी घेत आहोत की, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ साली तयार केलेल्या विनियमात निर्देशित केल्याप्रमाणे, वर निर्देश केलेल्या बँकेला निर्यात केलेल्या मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य विदेशी चलनामध्ये ......................... रोजी किंवा त्याआधी पाठविले जाईल. मी/आम्ही असेही घोषित करतो की मी / आम्ही भारतामधील रहिवासी आहे / आहोत, आणि माझी /आमची भारतात धंधासाठी जागा आहे.

तारीखः

(निर्यातदाराची सही)

@ प्रदान मिळण्याचा अंदाजे दिनांक लिहावा. हा माल पाठविल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आतील असला पाहिजे. परंतु रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने भारताबाहेर स्थापित असलेल्या गोदामांना (वेअरहाऊसेस) केलेल्या निर्यातीसाठी माल दिल्याचा (डिलिव्हरी) दिनांक पंधरा महिन्यांच्या आत असणे आवश्यक आहे.
*लागु नसेल ते खोडा.

**अधिकृत डीलरच्या उपयोगासाठी**

युनिफॉर्म कोड
नंबर आणि

दिनांक
१) तडजोड/सादरीकरणाचा
२) गोळाकरण्यासाठी मिळाल्याचा
३) बिल क्रमांक

*देयकाचा प्रकार

(१) डीए ☐
(२) डीपी ☐
(३) इतर (तपशील द्यावा) ☐

शिपमेंटचे प्रकार (१) पक्के विक्री कंत्राट ☐ ☐ (२) कनसाईनमेंट धर्तीवर ☐

(३) इतर तपशील द्यावा

*लागु असलेल्या चौकटीत निदर्शित करावे.

---------------रोजी संपलेल्या पंधरवड्यासाठी, आर रिटर्नसह रिझर्व्ह बँकेला
---------------रोजी पाठविलेल्या विवरणपत्रात हा एसडीएफ फॉर्म समाविष्ट केला गेला आहे.

आम्ही प्रमाणित करतो की, या फॉर्मवर घोषित केलेली निर्यात मोबदल्याची संपूर्ण रक्कम खाली दिल्यानुसार

| मिळाल्याचा दिनांक | चलन/ मुद्रा | -----------या देशात नोस्ट्रो खात्यात जमा (क्रेडिट) | | ----- या देशातील बँकेच्या एन आर रुपी खात्यातून वजा (डेबिट) | | आरबीआयला वसुली झाल्याचे, ज्याद्वारे कळविण्यात आले होते त्या आर |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

आम्हाला मिळाली आहे.
(संबंधित असलेल्या भारतीय डीलर शाखेचे नाव लिहावे)
मिळाल्याची अन्य रीत
(तपशील द्यावा)
(अधिकृत प्रतिनिधीचा शिक्का व स्वाक्षरी)
दिनांक :
पत्ता :

| **आरबीआयच्या उपयोगाची जागा** |
|---|
| |

**फॉर्म पीपी ***

**मुद्रा नियंत्रण**
**निर्यातदाराचे घोषणापत्र**
**मूळ प्रत (ओरिजिनल)**

फॉर्म क्र.--------------
(कृपया ''निर्यातदारांसाठी सूचना'' पहा)

फॉर्म क्रमांक :
१. अ) पोस्ट ऑफिसचे नाव
ब) पार्सल मिळाल्याचा क्रमांक व दिनांक
२. निर्यातदाराचे नाव (आरबीआयच्या उपयोगासाठी)
३. इंपोर्टर / एक्सपोर्टर कोड नंबर
४. विकत घेणाराचे / अडल्याचे (कन्साईनी) नाव व पत्ता
५. माल पाठविण्याचा देश
६. कंत्राटाचा प्रकार (१) सी आय एफ
(२) सी अँड एफ (३) एफओबी/
(४) इतर (तपशील द्यावा)
७. पाठविल्याचा दिनांक
८. शिपमेंटच्या प्रकार (१) थेट विक्री
(२) कनसाईनमेंट निर्यात (३) इतर (तपशील द्यावा )
९. मालाचे वर्णन :
१०. मालाचे परिमाण : एकक
११. इनव्हॉईसचे चलन
(टन / किलोग्रॅम / लिटर/ घनमीटर / चौरस मीटर / मीटर /नग / इतर (तपशील द्यावा))

| @ | जेथे संपूर्ण निर्यात मूल्य निश्चित करण्यासारखे नसेल तेथे विदेशी मार्केटमध्ये अपेक्षित विक्रीचे मूल्य दिले जावे. | १२. निर्यात मूल्याचे विश्लेषण | | |
|---|---|---|---|---|
| | | तपशील संपूर्ण निर्यात मूल्य | चलन | रक्कम |
| | घोषित केलेल्या मूल्यामधून एजन्सी कमिशन आणि / किंवा सूट यासाठी प्रेषण / वजावट यासाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. | एफओबी मूल्य | | |

| | |
|---|---|
| (कस्टम्सच्या उपयोगासाठी)<br>निर्यात मूल्य पडताळून<br>पाहण्यात आले आहे.<br>(कस्तम्स अप्रेझर) | (१३) कस्टम्स अनुसार निर्धारीत मूल्य (रुपये) |

| | |
|---|---|
| (१४) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण परवानगीखाली निर्यात केली गेली असल्यास तिच्या मंजुरीचा क्रमांक व दिनांक | |
| (१५) एल / सी व्यवस्थेखाली निर्यात केली असल्यास भारतातील सल्लागार बँकेचे नाव | |
| (१६) एशियन क्लिअरिंग युनियन मार्फत* प्रदान मिळणार आहे काय - होय / नाही | |
| (१७) ज्या बँकेमार्फत प्रदान मिळणार आहे तिचे नाव व पत्ता | |

मी/आम्ही येथे घोषित करत आहोत की, ज्या मालाबाबत मी/आम्ही हे घोषणापत्र दिले आहे त्या मालाचे मी/आम्ही* सेलर / कन्सायनी आहे/आहोत आणि वर दिलेली माहिती सत्य आणि *(अ) खरेदीदाराबरोबरच्या कंत्राटानुसार असलेले निर्यात मूल्य हे वर घोषित केलेल्या संपूर्ण निर्यात मूमूल्याएवढएच आहे *(ब) निर्यात करतेवेळी मालाचे संपूर्ण मूल्य निश्चित करता येण्यासारखे नव्हते आणि घोषित केलेले मूल्य हे, सध्या असलेल्या बाजार परिस्थितीनुसार, विदेशी मार्केटमध्ये विक्री केल्यास मला/आम्हाला अपेक्षित असलेल्या मूल्याएवढे आहे.

मी / आम्ही जबाबदारी घेत आहोत की, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९७४ साली तयार केलेल्या विनियमात निर्देशित केल्याप्रमाणे, वर निर्देश केलेल्या बँकेला निर्यात केलेल्या मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य विदेशी चलनामध्ये .......................... रोजी किंवा त्याआधी पाठविले जाईल. मी/आम्ही असेही घोषित करतो की मी / आम्ही भारतामधील रहिवासी आहे / आहोत, आणि माझी /आमची भारतात धंदासाठी जागा आहे.

रिझर्व्ह बँकेच्या कॉशन लिस्टवर माझे/आमचे नाव नाही.

@ प्रदान मिळण्याचा अंदाजे दिनांक लिहावा. हा माल पाठविल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आतील असला पाहिजे.

*लागु नसेल ते खोडा.

| | |
|---|---|
| ए.डी.च्या उपयोगासाठी<br>अधिकृत डीलरची स्वाक्षरी<br>आणि शिक्का<br>दिनांक<br>बँकेचा युनिफॉर्म<br>कोड नंबर | (निर्यातदाराची स्वाक्षरी)<br><br>दिनांक –<br><br>पत्ता – |

**निर्यातदारांसाठी सूचना**

१. पार्सलवर हा फॉर्म चिकटवावा

२. नेपाळ आणि भूतान सोडून भारताबाहेरील सर्व प्रदेशांना पोस्टाच्या माध्यमातून निर्यात करण्यासाठी ही पीपी फॉर्म कार्यरीत लागु आहे. सर्व प्रकरणांमध्ये पीपी फॉर्म संपूर्णपणे भरला जावा.

३. विदेशी चलनामधील अधिकृत डीलरची बरोबर असल्याची सही (काउंटरसाईन) झाल्यावर त्याची मूळ प्रत (ओरीजनल) निर्यातदाराने पोस्ट ऑफिसात सादर करावी. ज्या पोस्ट ऑफिसाच्या मार्फत माल निर्यात केला गेला आहे ते पोस्ट ऑफिस , ती मूळ प्रत भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सर्वात जवळील कार्यालयाकडे पाठवील

४. भारतातून निर्यात केलेल्या मालसंबंधीचे सर्च कागदपत्र, भारतातील विदेशी चलनामधील अधिकृत डीलरच्या माध्यमातून, माल खाना केल्याच्या तारखेपासून २१ दिवसांच्या आत पाठविले जावेत.

५. निर्यात केलेल्या मालाचे संपूर्ण निर्यातमूल्य, माल पाठविल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत वसुल केले जावे (रिअलाइजड)

**सूचना :-**
भारत सरकार / भारतीय वित्तसंस्था, वेळोवेळी, इतर देशांबरोबर केलेले विशेष व्यापारी करार बंद करू शकतात. मात्र त्यासाठी इतर देशांमधून येणाऱ्या विशिष्ट भरण्याबाबतची किंवा दोन सरकारांमधील कर्जाबाबतची तडजोड / हिशेबपूर्ती नियत केलेल्या रीतींनी करण्यासाठी तरतुद केली जावी. परिपत्रके प्रसृत करुन रिझर्व्ह बँक अशा व्यवस्थेबाबत अधिकृत डीलर्सना सल्ला देईल.

प्रत्येक व्यवस्थेमध्ये निर्देशित केलेल्या धनप्रेषणाच्या रीतींचे पालन अवश्य केले जावे.

| **भारतीय रिझर्व्ह बँकेच्या उपयोगासाठी जागा** |
|---|
| |
| |

## फॉर्म पीपी

चलन नियंत्रण (एक्सचेंज कंट्रोल)
**निर्यातदाराचे घोषणापत्र**
दुसरी प्रत (डुप्लिकेट)

फॉर्म क्रमांक :
१. अ) पोस्ट ऑफिसचे नाव
ब) पार्सल मिळाल्याचा क्रमांक व दिनांक

२. निर्यातदाराचे नाव (आरबीआयच्या उपयोगासाठी)

३. इंपोर्टर / एक्सपोर्टर कोड नंबर

४. विकत घेणाराचे / अडल्याचे (कन्साईनी) नाव व पत्ता

५.माल पाठविण्याचा देश

६.कंत्राटाचा प्रकार (१) सी आय एफ
(२) सी अँड एफ (३) एफओबी/
(४) इतर (तपशील द्यावा)

७.पाठविल्याचा दिनांक

८. शिपमेंटच्या प्रकार (१) थेट विक्री
(२) कनसाईनमेंट निर्यात (३) इतर (तपशील द्यावा )

९. मालाचे वर्णन :

१०. मालाचे परिमाण : एकक

११. इनव्हॉईसचे चलन
(टन / किलोग्रॅम / लिटर/ घनमीटर / चौरस मीटर / मीटर /नग / इतर (तपशील द्यावा))

| | | | | |
|---|---|---|---|---|
| @ | जेथे संपूर्ण निर्यात मूल्य निश्चित करण्यासारखे नसेल तेथे विदेशी मार्केटमध्ये अपेक्षित विक्रीचे मूल्य दिले जावे. | १२. निर्यात मूल्याचे विश्लेषण | | |
| | | तपशील<br><br>@ संपूर्ण निर्यात मूल्य | चलन | रक्कम |
| | घोषित केलेल्या मूल्यामधून एजन्सी कमिशन आणि / किंवा | एफओबी मूल्य | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सूट यासाठी प्रेषण / वजावट यासाठी केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. | | | |
| | | वाहतूक खर्च | | |
| | | विमा | | |
| | | सूट (दर) | | |
| | | एजन्सी कमिशन (दर) | | |

(कस्टम्सच्या उपयोगासाठी)
निर्यात मूल्य पडताळून
पाहण्यात आले आहे.
(कस्तम्स अप्रेझर)

(१३) कस्टम्स अनुसार निर्धारीत मूल्य

(रुपये)

(१४) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सर्वसाधारण परवानगीखाली निर्यात केली गेली असल्यास तिच्या मंजुरीचा क्रमांक व दिनांक

(१५) एल / सी व्यवस्थेखाली निर्यात केली असल्यास भारतातील सल्लागार बँकेचे नाव

(१६) एशियन क्लिअरिंग युनियन मार्फत* प्रदान मिळणार आहे काय - होय / नाही

(१७) ज्या बँकेमार्फत प्रदान मिळणार आहे तिचे नाव व पत्ता

मी/आम्ही येथे घोषित करत आहोत की, ज्या मालाबाबत मी/आम्ही हे घोषणापत्र दिले आहे त्या मालाचे मी/आम्ही* सेलर / कन्सायनी आहे/आहोत आणि वर दिलेली माहिती सत्य आणि *(अ) खरेदीदाराबरोबरच्या कंत्राटानुसार असलेले निर्यात मूल्य हे वर घोषित केलेल्या संपूर्ण निर्यात मूमूल्याएवढएच आहे *(ब) निर्यात करतेवेळी मालाचे संपूर्ण मूल्य निश्चित करता येण्यासारखे नव्हते आणि घोषित केलेले मूल्य हे, सध्या असलेल्या बाजार परिस्थितीनुसार, विदेशी मार्केटमध्ये विक्री केल्यास मला/आम्हाला अपेक्षित असलेल्या मूल्याएवढे आहे.

मी / आम्ही जबाबदारी घेत आहोत की, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९७४, साली तयार केलेल्या विनियमात निर्देशित केल्याप्रमाणे, वर निर्देश केलेल्या बँकेला निर्यात केलेल्या मालाचे संपूर्ण निर्यात मूल्य विदेशी चलनामध्ये ......................... रोजी किंवा त्याआधी पाठविले जाईल. मी/आम्ही असेही घोषित करतो की मी / आम्ही भारतामधील रहिवासी आहे / आहोत, आणि माझी /आमची भारतात धंधासाठी जागा आहे.

रिझर्व्ह बँकेच्या कॉशन लिस्टवर माझे/आमचे नाव नाही.

@ प्रदान मिळण्याचा अंदाजे दिनांक लिहावा. हा माल पाठविल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आतील असला पाहिजे.

*लागु नसेल ते खोडा.

| | |
|---|---|
| ए.डी.च्या उपयोगासाठी<br>अधिकृत डीलरची स्वाक्षरी<br>आणि शिक्का<br>दिनांक<br>बँकेचा युनिफॉर्म<br>कोड नंबर | (निर्यातदाराची स्वाक्षरी)<br><br>दिनांक –<br><br>पत्ता – |

**सूचना** :- भारताबाहेर केलेल्या मालाच्या निर्यातीचे सर्व कागदपत्र, तो माल पाठविल्याच्या तारखेपासून २१ दिवसांच्या आत, विदेशी चलनात, भारतामधील अधिकृत डीलरच्या मार्फतच पाठविले गेले पाहिजेत.

**अधिकृत डीलरच्या उपयोगासाठी**

युनिफॉर्म कोड नंबर :-____________________

ची तारीख* (१) निगोशिएशन (२) बिल क्र. ------------- गोळा केल्याची पावती

| | |
|---|---|
| *लागु नसलेले खोडा | देयकाचा प्रकार* डीए/ (२) डीपी / (३) इतर<br>शिपमेंटचा प्रकार :<br>(१) पक्के विक्री कंत्राट (फर्म सेल कॉंट्रॅक्ट)<br>(२) कनसाईनमेंट धर्तीवर<br>(३) इतर (तपशील द्यावा)<br>...........च्या अखेर संपलेल्या पंधरा दिवसांसाठी रिझर्व्ह बँकेला आर रिटर्नसह पाठविलेल्या विवरणपत्रामध्ये पी पी फॉर्म समाविष्ट करण्यात आला होता पाठविल्याचा दिनांक |

